ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२५
वीरनिर्वाणसंवत् २५५१–५२
वर्ष ७६वे, पुष्प ३रे–४थे
आश्विन–कार्तिक शके १९४७

UGC-CARE Listed
Research Journal
(Since-Jun2019)

www.sanmatimasik.com

सन्मति प्रकाशन
स्थापना : १५ ऑगस्ट १९५०

ISSN- 2395-5503
RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07


# सन्मति


मूल्य – ४० रु.

बाहुबली विद्यापीठ व ब्रह्मचर्याश्रमाचे मुखपत्र


## जैन दृश्य वारसा परिषद विशेषांक

### सचित्र हस्तलिखिते व पट यावरील चित्रे







# शुभ दीपावली



## एक दीपावली... बहिरंगी!

तेवते देवघरात
समईने....!
सजते अंगणात रांगोळीने....!
प्रकाशते देवळीतील दिव्यांनी....!
झगमगते आकाशकंदिल
दीपमाळांनी....!
लहरते दारात
तोरणांनी....!
घमघमते फराळ मिठाईंनी....!
दरवळते सुवासिक उटण्यांनी...!
स्नेहाळते आप्तभेटींनी...!
साजरी दीपावली निरोप घेते
तृप्त मनाने....!!


## एक दीपावली...अंतरंगी!

एक दिवा देवघरात..
एक दिवा मनअंगणात..
एक दिवा मनाच्या दारात..
एक ज्ञानदीप स्वअंतरात...!
एक ज्ञानदीप लावावा स्वगृहात....
तमस फिटेल कषायांचा.. बाहेरचा...आतला
बाहेरून आत आत जाताना
एक एक मोह द्वार बंद करीत जावे आणि
उतरत जावे आत....मनाच्या गाभाऱ्यात...!
आत आत.... आपल्या...
गर्भगृहात चढावी एकेक पायरी...
शिडी....क्षपकाची!
स्वात्म्याजवळ पोचावे....वास करावा..
आत्मज्योत शांतपणे तेवणारी...
अनुभूतीत मी मला भेटताना...
आंतरिक दिवाळी अनुभवावी..!
निरामय सुखाची..अपूर्व आनंदाची !!

वंदना दर्यापूरकर, अमरावती – ९४२२८४०६०४



सत्प्रेरणा–शुभाशीर्वाद



प.पू. गुरुदेव १०८ श्री
समंतभद्र महाराज

उन्नतं मानसं यस्य, भाग्यं तस्य समुन्नतम् ।

# सन्मति

पो. बाहुबली, जि. कोल्हापूर
पिन–४१६ ११० ☎(०२३०) २५८४४२२

संस्थापक–संपादक



स्व. ब्र. माणिकचंद भीसीकर
एम्. ए., न्यायतीर्थ

## ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२५

❍ वर्ष: ७६ वे ❍ पुष्प ३रे–४थे

❑ वार्षिक वर्गणी :२५०/-

❑ द्वादशवर्षीय वर्गणी :२५००/-



❍ संपादक मंडळ ❍

❍ **डॉ. नेमिनाथ शास्त्री,** एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

❍ **सुश्री प्रज्ञाताई डोणगांवकर,** कारंजा, बी.एस्सी.

❍ **डॉ. लीना चवरे,** कारंजा, एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.


## ⊙ अनुक्रमणिका ⊙


| | | |
|---|---|---|
| ❋ संपादकीय..दीपावली अशी साजरी करा..... | –डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली | ०४ |
| ❋ माझ्यासाठी तोचि दिवाळी–दसरा | –प्रिया डाखोडे, (प्रियदर्शिका) | ०७ |
| ❋ श्रीभद्र संस्कार ( पुस्तक अभिप्राय) | – सौ. पल्लवी राहुल पाटील | ०८ |
| ❋ प्रवचनसार : जीवनस्वातन्त्र्याची कला (१३८) | –आर्यिका १०५ श्री शुद्धोऽहंश्री माताजी | ०९ |
| ❋ योगसार चिंतन (०९) | – प्रियदर्शन जैन, नागपूर | १३ |
| ❋ पट्टमहादेवी–शब्दांपलिकडील अन्वयार्थ (२५) | –विपुल खेडकर, नागपूर | १५ |
| ❋ 'सोलहकारण भावना भाय....!'(१३) | – हर्षा वेखंडे, नागपूर | २० |
| ❋ महत्त्वाचे काय...? जिंकणे की हरणे..? (बोधकथा) – | | २४ |
| ❋ भद्र – भारती | –गुरुदेवश्री समंतभद्रजी महाराज | २५ |
| ❋ जैन दृश्य वारसा : चित्रकला, मूर्तीशास्त्र, वास्तुकला आणि हस्तलिखिते – एक चिंतन (विशेष अतिथी संपादकीय) | –प्रा. गोमटेश्वर पाटील, जयसिंगपूर | २६ |
| ❋ सेमिनारविषयी....१) भूमिका व ऋणनिर्देश– | – प्रा. कीर्तीकुमार भोरे, कारंजा–लाड | ३० |
| २) भूमिका | –प्रा. रुपेश मडकर, छ. संभाजीनगर | ३१ |
| ❋ विदर्भातील दिगंबर जैन भांडारातील सचित्र पोथ्या व चित्र : एक कला ऐतिहासिक दृष्टिकोन | –प्रा. डॉ. मनीषा प्र. पाटील, नागपूर | ३२ |
| ❋ कला आणि स्थापत्यकलेतून जैन मंदिरांचे प्रकार | –डॉ. प्रणोति लाड, पुणे | ३८ |
| ❋ कहाणी दोन अंतरिक्ष प्रतिमांची | –श्री. अमलप्रभ चवरे, कारंजा लाड | ४७ |
| ❋ पंचकल्याणक पट – एक प्राचीन कला वैभव – | – प्रज्ञा डोणगावकर, कारंजा (लाड) | ५२ |
| ❋ जैन स्थलांतर आणि चित्राश्रयाचे बदलते स्वरूप : महाराष्ट्रातील एका गृह चैत्यालयाचा अभ्यास | –प्रा. रुपेश मडकर, छ. संभाजीनगर | ५६ |
| ❋ महाराष्ट्रातील जैन पुरातत्त्व : एक संक्षिप्त आढावा | –प्रा. ओशिन बंब, पुणे | ६४ |
| ❋ राष्ट्रीय परिषदेविषयी प्राप्त निवडक अभिप्राय.... | – – | ६८ |
| ❋ लेफ्टनंट प्रियंका खोत – | – श्री.जितेंद्र आणुजे, तारदाळ | ७२ |
| ❋ विशेष वार्ता व वियोग वार्ता | | ७३ |

# संपादकीय....

## दीपावली अशी साजरी करा.....

**डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली**

**उत्सवप्रियाः खलु मानवाः ।** – खरोखर मनुष्य हा उत्सव प्रिय आहे. तो सातत्याने नवनवीन सण आनंदाने व वेगवेगळ्या पद्धतीने साजरे करीत असतो. त्याचे मुख्य कारण म्हणजे मनुष्य हा समूहाने राहतो. तो एक समाजशील प्राणी आहे. समूहात राहताना कटुता, वैदुष्य, संक्लेशता सहजतेने निर्माण होते, पण त्यातून दुःखच मिळते; म्हणून परस्पर प्रेम, सहकार्य, मैत्रीभाव टिकून रहावा या सद्हेतूनेच अनेक सण साजरे केले जातात. परस्पर शुभेच्छा–शुभाशीर्वाद देऊन लोककल्याणाची भावना जोपासली जाते. त्यातही या सर्व समाजामध्ये दीपावली हा एक मोठा व दीर्घकाळ चालणारा सणांचा राजा म्हटला जातो; म्हणून अशी ही दीपावली साजरी करताना काळाच्या ओघात आलेली त्यातील विकृती टाळून पुढीलप्रमाणे साजरी करावी आणि स्वस्थ व निरोगी समाज जीवन बनवावे.

### धार्मिक दृष्टीने

हा भ. महावीर यांचा निर्वाणकल्याणक महोत्सव संपूर्ण देश–विदेशात अत्यंत उत्साहाने दीपावली म्हणून साजरी केला जात असतो. हा उत्सव साजरा करताना भक्तिभावाने पुढीलप्रमाणे पूजन, भक्तिपाठ म्हणावे, अशी एक परंपरा आहे.

* **धन्यत्रयोदशीच्या दिवशी** गुरुपूजन करावे; म्हणून गुरुपूजा किंवा प. पू. गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांचे पूजन करावे. जर घरी पूजन करीत असाल तर जिनप्रतिमा किंवा जिनवाणी समोर असावी.

* **अमावस्येच्या दिवशी सकाळी** परंपरेनुसार सिद्धभक्ती, निर्वाणभक्ती, पंचमहागुरु भक्ती व शांतिभक्ती या मुख्य चार भक्तिपाठाचे भावभक्तीने शुद्ध पाठ म्हणून भगवान महावीरांचे अष्टक करावे. तर सूर्योदयाच्या वेळी जिनेन्द्र भगवंतांचे अभिषेक, पूजन करावे. मोक्ष–कल्याणकाच्या अर्घ्यावेळी निर्वाणलाडू किंवा नारळाचे गोटे अर्पण करावे. तसेच निर्वाणकांड भाषा म्हणत जिनमंदिरास/ जिनप्रतिमेस प्रदक्षिणा द्यावी. वेळेनुसार दीपमालिका पर्वपूजन व निर्वाणक्षेत्र पूजन ही करावे.

* **अमावस्येच्या दिवशी सायंकाळी** भगवान महावीर यांचे प्रमुख शिष्य श्री इंद्रभूती गौतम गणधरांना केवलज्ञानरूपी लक्ष्मी प्रकट झाल्याने अनंत, अतींद्रिय, स्वाधीन, परम आनंद देणाऱ्या ज्ञानलक्ष्मीची पूजा करावी. म्हणून लक्ष्मीपूजन या नावाने प्रसिद्ध असणाऱ्या या परंपरेच्या वेळी श्री गौतम गणधर यांची पूजा करावी. ही पूजा सूर्यास्तापूर्वी करावी. तसेच घरी जिनवाणी समोर ठेवून पूजा केली तरी तितकेच ते पुण्यप्रदायक असते किंवा गुरुपूजा करण्याची सुद्धा पद्धती आहे.

* **दीपावली पाडवानिमित्त** वहीपूजन केले जाते, परंतु त्या ऐवजी सरस्वती पूजन म्हणजेच जिणवाणीचे पूजन करणे अधिक लाभदायक आहे.

एकंदरीत, **जिनवाणी हीच खरी सरस्वती आणि केवलज्ञान हीच खरी लक्ष्मी आहे.**

### आध्यात्मिक दृष्टीने

भगवान महावीर अमावस्येला मोक्षास गेले. तत्पूर्वी चतुर्दशीला त्यांनी पूर्णपणे मौनत्व पाळून योगनिरोध केला. त्याच्या आदल्या दिवशी म्हणजेच त्रयोदशीला त्यांनी अंतिम उपदेश दिला आणि अंतिम शुक्ल ध्यानात ते लीन झाले; म्हणून त्यास

धन्यत्रयोदशी / ध्यानत्रयोदशी किंवा धन्यतेरस / ध्यानतेरस असे म्हणतात. पण कालांतराने धनलोलुपी जनतेने त्याचा धनतेरस असा अपभ्रंश केला आणि धनाची पूजा करणे सुरू केले.

धन्यत्रयोदशीला भगवान महावीरांचा अंतिम उपदेश झाला. म्हणून त्या दिव्यध्वनीरूप शब्दब्रह्माची पूजा केली जाते, पण लोकमूढतेमुळे 'शब्दब्रह्म' यातील 'शब्द' बाजूला करून केवळ ब्रह्मपूजा असा चुकीचा अर्थ घेतला गेला आणि बहुसंख्य समाजाचा अल्पसंख्यांक समाजावर मोठा विपरीत परिणाम झालेला दिसून येतो, म्हणून जाणवते की **दीपावलीची दिव्यता व भव्यता ध्यानानेच सिद्ध होते. निज शुद्ध आत्मज्ञानाच्या ध्यानानेच दीपावली पर्वाचा प्रारंभ होतो.**

**दीपावली हा सण बाह्य उत्सवापेक्षा, बाह्य वैभवापेक्षा आत्मिक उत्सवाचा, अंतरंग वैभवाचा आहे; म्हणून आत्मज्ञानाची ज्योती प्रज्ज्वलित करणारा आणि अज्ञान, मिथ्यात्वाची जळमटे दूर करणारा आहे.**

आत्मिक उत्कर्ष साधणे, वैचारिक पातळी सुधारणे, मनोविकृतीला जाळून टाकणे, कुविचारांची जळमटे दूर करणे, वैज्ञानिक व विशुद्ध दृष्टिकोन बाळगणे, विश्वबंधुत्वाची भावना जोपासणे, आत्मिक शांती व समाधान मिळविणे, हीच खरी दिवाळीची सार्थकता आहे.

**सामाजिक दृष्टीने**

* आरोग्याच्या दृष्टीने गाईंना पुरणपोळी इत्यादी नैवेद्य म्हणून खाऊ घालणे त्यांना हानिकारक असते. तसेच वर्षातून एक वेळ प्राणीविषयी प्रेम, आपुलकी दाखविण्यापेक्षा वेळोवेळी त्यांच्याकडे लक्ष पुरविणे, हेच खरे पुण्य होय.

जैन धर्म सांगतो, पुण्य कार्य केल्याने पुण्य मिळत नाही तर त्यामागील तुमची भावना, अभिप्राय काय आहे यावरून पुण्य मिळते. म्हणून पुण्याच्या मागे न धावता आपले विचार, भावना, अभिप्राय सुधारण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी शुभ कार्यांचा आधार अवश्य घ्यावा.

* समाजात सर्वच स्तरातील लोक राहत असतात त्यामुळे स्वदेशी वस्तूंची खरेदी करून भारतीय समाजास, कारागिरास हातभार लावावा. भारतीय चलन भारतातच रहावे यासाठी प्रयत्नशील रहावे. विदेशी लाइटिंग माळ, पणत्यापासून मोठमोठ्या वाहनापर्यंतची खरेदी करणे म्हणजे आपला पैसा परदेशात पाठविण्यासारखेच आहे. त्यामुळे भारताला विकसित करण्यासाठी गोरगरीब भारतीय जनतेची आर्थिक परिस्थिती सुधारणे आवश्यक आहे. यासाठी उद्योगधंद्यांना चालना देणे आवश्यक आहे; म्हणून स्वदेशीची चळवळ सफल करण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध व्हावे.

* दिवाळीसारख्या सणात देखील अनेक पोलीस, सैनिक, वाहतूक सुविधा, आरोग्यसेवा इत्यादी क्षेत्रातील लोक संरक्षण, आरोग्य, तात्कालिक सेवा पुरविण्यात दक्ष असतात. अशा लोकांविषयी सहानुभूती बाळगून त्यांना सहकार्य करावे. विशेष करून या सर्वांना मानवंदना करून शुभेच्छा द्या.

* अनेक शहरात 'माणुसकीची भिंत' हा उपक्रम राबविला जातो. तेथे चांगली, पण जुनी कपडे दिली जातात. आपण ही यात सहभाग नोंदवा किंवा जुन्या कपड्यांचा पुनर्वापर आवश्य करावा. सर्वांनीच परिग्रह मर्यादित करावे, जेणेकरून नैसर्गिक साधनसंपत्तीचा समतोल साधला जाईल.

**आरोग्याच्या दृष्टीने**

पर्यावरणाचे संतुलन बिघडल्यामुळे पावसाचा उद्रेक दिसतो तर उन्हाळ्याचे चटके वाढले आहेत. त्यामुळे नदी नाले प्रदूषित होणार नाही याची खबरदारी बाळगावी. तसेच दिवाळीच्या वेळी मोठ्या प्रमाणात वेगवेगळे फटाके फोडले जातात. यामुळे वायुप्रदूषण, ध्वनीप्रदूषण मोठ्या प्रमाणात होते. त्यातूनच अनेक आजार देखील निर्माण होतात. या क्षणिक आनंदापासून सर्वांनी दूर रहावे. फटाके फोडल्याने सल्फर डायऑक्साईड, कार्बन

डाय-ऑक्साइड, फॉस्फरस इत्यादी विषारी धुलीकण हवेत मिसळतात. त्यामुळे पर्यावरण बिघडते, ते संपूर्ण जीवसृष्टीस घातक आहे. फटाके फोडल्याने शारीरिक अपंगत्व देखील येते. वृद्ध व लहान मुलांना विशेष त्रास होतो. त्यामुळे या फटाक्याच्या मोहापासून मुलांना लांब ठेवावे. किंबहुना **फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची प्रतिज्ञा द्यावी.**

**पारिवारिक / कौटुंबिक दृष्टीने**

सर्वच सणांचा एकमेव उद्देश असतो, परस्पर प्रेम, सहकार्य निर्माण करणे, नातेसंबंध दृढ करणे. दिवाळीच्या निमित्ताने एकमेकांना भेटून यथायोग्य आदर द्यावा. सध्याच्या सोशल मीडियावरून शुभेच्छा देत असल्याने प्रत्यक्ष भेटण्याचे प्रमाण खूप कमी होत आहे. तर सर्वांनी अवश्य वेळ काढून परस्पर प्रत्यक्ष भेटावे. वर्षभरातील जी काही कटुता, मनमुटावपणा असेल, तो दूर करावा. ज्ञानवृद्ध-तपोवृद्ध-वयोवृद्ध लोकांच्या मार्गदर्शनाने कार्य केल्याने संकटे लांब पळतात. गुरु विषयी असणारी नम्रता मनाला कणखर बनविते.

**सांस्कृतिक दृष्टीने**

दिवाळीसारख्या सणांच्या माध्यमातून भारतीय संस्कृती-परंपरा दिसून येते. ही आपली प्राचीन परंपरा जोपासण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध रहावे. पण काळाच्या ओघात आलेली त्यातील विकृती दूर सारावी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगावा.

**भारतीय संस्कृती-परंपरेतील एक महत्त्वाचा धागा म्हणजे जैन दृश्य वारसा : चित्रे, पुरातत्त्व आणि मूर्तिशास्त्र** हा होय. याला अनुसरून छत्रपती संभाजीनगर येथे एक राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आले होते. यातून जैन संस्कृती व परंपरा यांचे संरक्षण, संवर्धन व्हावे हाच एक मात्र सद्हेतू होता. प्रस्तुत दिवाळी विशेषांक या जैन दृश्य वारशासाठी समर्पित करीत आहोत. यासाठी आम्हाला विशेष करून संपादक महोदया प्रज्ञाताई डोणगावकर यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले आहे. तर प्रा. रुपेश मडकर, डॉ. मनीषा पाटील, डॉ. प्रणोती लाड, सुश्री. प्रज्ञाताई डोणगावकर, श्री. अमलप्रभ चवरे, प्रा. ओशिन बंब यांचे अनमोल विचार संग्रह प्रस्तुत अंकात घेण्यात आले आहेत. या सर्वांना विशेष धन्यवाद देत आहोत. प्रा. कीर्तिकुमार भोरे यांचे विशेष प्रयत्न सफल झाले आहेत. या वैचारिक संस्कृतीचा सर्वांनी अवश्य लाभ घ्यावा.

अशाप्रकारे ही दिवाळी एकमेकाविषयीची घृणा, द्वेष, तिरस्कार, ईर्ष्या दूर करो. आत्मिक परिणामांची उज्ज्वलता निर्माण करो. आत्मज्ञानाचा दीप प्रज्वलित होवो आणि सर्वांचे परम कल्याण होवो, या सद्भावनेने विराम घेत आहोत.

*****



*** आत्मज्योतिपर्व दीपावली हा महापर्व सर्वांच्या मनामनामधील अज्ञान अंधःकार दूर करो, अशी सर्वांना शुभेच्छा...!!!**

*** ही दीपावली घराघरामध्ये ज्ञानज्योती प्रज्वलित करो आणि मनामनामध्ये आत्मज्योती प्रकाशित करो, हीच मनोमन शुभभावना...!!!**

*** दीपावली पाडव्यापासून प्रारंभ होणारे वीरनिर्वाणसंवत् २५५२ हे नूतन वर्ष सर्वांना सुख-समृद्धीचे जावो, हीच सदिच्छा...!!!**

# माझ्यासाठी तोचि दिवाळी-दसरा

**प्रिया डाखोडे,** (प्रियदर्शिका)
९४२०११७८६५

दिवाळी, दसरा : हे शब्द ऐकताना प्रत्येकाच्या हृदयात एक गोड आनंद आणि उत्साह जागृत होतो. पण माझ्यासाठी, हा सण फक्त दिवे लावणे, मिठाई वाटणे किंवा नवीन कपडे घालणे नाही. माझ्यासाठी तोचि दिवाळी-दसरा म्हणजे मनाच्या अंतर्मनातील दिवा, आत्म्याच्या खोलीतल्या शांततेचा प्रकाश आणि जीवनातील लहान पण मोलाचे, आनंदाचे क्षण.

दिवाळी ही पर्वणी बाह्यदृष्टीने नेहमीच तेजस्वी दिसते. घरात रंगीबेरंगी दिवे, बाजारातील गर्दी आणि विविध प्रकारच्या मिठायांचा सुवास - ही सर्व दृश्ये आणि सुगंध मन मोहून टाकतात. पण माझ्यासाठी दिवाळी म्हणजे अंधारातल्या भीतीला प्रकाश देणे, स्वतःशी प्रामाणिक राहणे आणि हृदयाच्या कोपऱ्यातील सुखाचा अनुभव घेणे.

दसरा म्हणजे फक्त रावण दहन किंवा विजयाचा उत्सव नाही. माझ्यासाठी तोचि दसरा म्हणजे स्वतःच्या मनातील रावणावर विजय मिळविणे, भीती, आत्मसंशय आणि संकोच यांना जाळून आत्मविश्वास आणि धैर्याचा उत्सव साजरा करणे. जीवनातले अनेक रावण, जसे संकोच, आत्मसंशय, चिंता किंवा अज्ञान, प्रत्येकावर विजय मिळविणे म्हणजे खरा दसरा.

जेव्हा घराच्या चौकात छोटे छोटे दिवे लावले जातात, तेव्हा त्या लहानशा दीपांमध्ये मला जीवनातील सूक्ष्म आनंद दिसतो. प्रत्येक दिवा म्हणजे एक आठवण, एक स्मित, एक क्षण. बाह्य जगाचा गोंधळ, खरेदीची धावपळ आणि गर्दीला बाजूला ठेवून, माझ्यासाठी दिवाळी म्हणजे मनाच्या प्रत्येक कोपऱ्यात दिवे लावणे. हा दीप जर उजळला, तर तो फक्त घर उजळवत नाही; तो मन, आत्मा आणि विचारसरणी उजळवितो.

दसऱ्याच्या पारंपरिक रांगोळ्या, फुलांच्या माळा आणि रंगीत कागदांची सजावट माझ्यासाठी जीवनाच्या विविध रंगांचे प्रतीक आहेत. प्रत्येक रंग, प्रत्येक आकार, माझ्या आयुष्यातल्या संघर्ष, सुख, दुःख आणि समाधानाचे रूपक आहे. लाल रंग म्हणजे धैर्य, पिवळा रंग म्हणजे आनंद, निळा रंग म्हणजे शांतता आणि हिरवा रंग म्हणजे आशा. रांगोळ्या फक्त भिंतींवर नाही तर, त्या मनाच्या भिंतीवर, हृदयाच्या कोपऱ्यात, आत्म्याच्या कानाकोपऱ्यात रंग भरतात.

दसऱ्याच्या माळा, पूजेत वाजणारी घंटा आणि देव-देवतांच्या प्रतिमांतील भक्ती यांमध्ये मला अंतर्मुखी शांतता मिळते. दिवाळी-दसरा फक्त बाह्य उत्सव नाही; तो भावनेचा, विचारांचा आणि आत्म्याचा उत्सव आहे. प्रत्येक मंत्र, प्रत्येक सुवासिक धूप, प्रत्येक दीप मला आठवणींच्या प्रकाशात घेऊन जातो. लहानपणीच्या आठवणी, शाळेतील मैत्रिणींसोबतच्या गप्पा, आई-बाबांच्या प्रेमळ हसण्याचा आवाज : हे सर्व आठवणींचे दीप माझ्या मनात प्रत्येक वर्षी नव्याने उजळतात.

दिवाळी-दसरा साजरा करण्याची बाह्य पद्धत आपल्याला समाजाने शिकवली आहे, पण माझ्यासाठी हा उत्सव म्हणजे अंतर्मनातील सजावट. मनाच्या, आत्म्याच्या आणि हृदयाच्या खोलीत दिवे लावणे! त्यासाठी खरेदी किंवा मोठा खर्च आवश्यक नाही. एक शांत रात्रीचा वेळ, जुने छायाचित्र किंवा आठवणींची पुस्तकं हातात घेऊन मनाला सांत्वन दिल्यास, माझा उत्सव सजतो. त्या दिवशी मी स्वतःला भेटते... स्वतःला समजते... स्वतःच्या अंतरंगातील प्रकाशात.

नव्या आत्मविश्वासाने पुढे जाते. प्रत्येक दिवा, प्रत्येक रांगोळी, प्रत्येक मंत्र मला नवीन धैर्य आणि ऊर्जा देतो.

दिवाळी-दसरा माझ्यासाठी केवळ बाह्य साजशृंगार किंवा खरेदीपुरते मर्यादित नाही; तो म्हणजे आत्मसाक्षात्कार, मनाची शांती आणि जीवनातील लहान-छोट्या आनंदाचा दीप. एकत्र कुटुंब, मित्र आणि प्रेमळ संवाद हे या उत्सवाचे खरे रूप आहेत. मी हसते....आठवणी सांगते...गप्पा मारते आणि त्या क्षणांचा दीप मनाच्या अंतरंगात लावते.

दिवाळी-दसरा माझ्यासाठी केवळ एका दिवशी साजरा करण्याचा सण नाही; तो मनाच्या प्रत्येक क्षणात, हृदयाच्या प्रत्येक स्पंदनात, आत्म्याच्या प्रत्येक कोपऱ्यात उजळतो. जणू मी प्रत्येक दिवशी आपल्या अंतर्मनाला साजरे करते, प्रत्येक क्षणी आपल्या भीतीवर विजय मिळविते आणि प्रत्येक विचारात आनंदाचा प्रकाश पसरविते.

हा लेख फक्त व्यक्तिगत अनुभव नाही; तो प्रत्येकाच्या आयुष्यातल्या अंतर्मुखी दिवाळी-दसऱ्याचे आमंत्रण देखील आहे. बाह्य साजशृंगार कमी असला तरी, अंतर्मनात प्रकाश, शांती आणि आनंद कायम असू शकतो. प्रत्येकाने आपल्या जीवनातील 'माझ्यासाठी दिवाळी-दसरा' शोधावा आणि त्या प्रकाशाने स्वतःच्या जगाला उजळवावे.

शेवटी, माझ्यासाठी दिवाळी-दसरा म्हणजे स्वतःच्या अंतर्मनाचा साज, आत्म्याचा उत्सव, आणि जीवनाच्या प्रत्येक क्षणातील आनंदाचा दीप. हा दीप जर एकदा उजळला, तर जीवनाला कोणताही अंधार कधीही झाकू शकत नाही. त्याच दिव्यांतून मी शिकते की, खरी पूजा, खरा साजशृंगार आणि खरा विजय म्हणजे मनातील शांतता, आत्मविश्वास आणि प्रेम आहे.

*****



❊ पुस्तक अभिप्राय :-

## श्रीभद्र संस्कार

**सौ. पल्लवी राहुल पाटील** ( M.A.,B. Ed. B.J.)

श्रीभद्र संस्कार हे पुस्तक इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी धर्मज्ञान वाढविण्यास अतिशय उपयुक्त पुस्तक आहे. जैनतत्त्वज्ञानाचे संपूर्ण सार अत्यंत सोप्या व सरळ शब्दात व ओघवत्या भाषेत सुंदर व आकर्षक पद्धतीने मांडले आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ अतिशय आकर्षक पद्धतीने तयार केले आहे. पुस्तकातील समाविष्ट सर्व पाठांचे थोडक्यात चित्रण मुखपृष्ठावर आहे. तसेच लौकिक शिक्षणाबरोबर धर्माभ्यास ही महत्त्वाचा आहे, हे मलपृष्ठ पाहून लक्षात येते.

प्रथम सत्र व द्वितीय सत्र यामध्ये पाठांची विभागणी करताना समजण्यास सोपे विषय प्रथम, जसे की मंगलाचरण म्हणजे काय? ते का करावे ? इथपासून ते ऐतिहासिक सम्राट श्रेणिक इथपर्यंत पूर्वज्ञान जागृत करून थोडक्यात प्रस्तावना मांडली आहे. त्यामुळे वाचक विद्यार्थी असो अथवा अन्य कोणी, त्यांच्या आकलनास सोपी भाषा आहे. चित्रे आकर्षक असल्यामुळे दिलेली माहिती वाचण्यास उद्युक्त करतात.

पाठानंतर असणारा स्वाध्याय यामुळे विद्यार्थ्यांच्या विचारशीलता व चिंतनशीलतेस वाव मिळतो. द्वितीय सत्र यात समाविष्ट विषय थोडी काठीण्य पातळी वाढवितात. देव-शास्त्र-गुरु, तत्त्वज्ञान व वैचारिक कथा आहेत. यामुळे स्वची जाणीव होऊ लागते. सणांची माहिती, पाप म्हणजे काय ? जीवाचे भेद-प्रभेद संवाद रूपाने मांडल्यामुळे प्रश्न-उत्तरे या प्रकारामुळे विषय समजण्यास सोपा वाटतो.

पद्य, कविता, भजन यामुळे तालासुरात धर्मोपदेश देण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. एकंदर शिक्षकांना शिकविण्यास सुलभ, विद्यार्थ्यास समजून घेण्यास सोपी अशी या पुस्तकांची मांडणी आहे. शेवटी निबंध लेखन करण्यास विषय सत्रानुरूप दिले आहेत. व मूल्यमापन पद्धती व गुण विभागणी तक्ता यामुळे अध्यापनास ते उपयुक्त आहेतच, पण त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन ही करणे गरजेचे आहे हे स्पष्ट केले आहे. एकंदर हे पुस्तक जैन संस्कार करण्यास उपयुक्त आहेच, पण त्याचबरोबर नैतिक, धार्मिक, आध्यात्मिक मूल्यांची जाणीव करून देते.

*****

# प्रवचनसार : जीवनस्वातन्त्र्याची कला

(लेखांक क्र. १३८)

**आर्यिकारत्न १०५ श्री शुद्धोऽहंश्री माताजी**

विरक्त ज्ञानी पुरुष कुटुंबपरिवार आदिपासून विरक्त होऊन त्यांच्या मोहातून स्वतःला सोडवतो. गृहस्थ अवस्थेमध्ये असतानासुद्धा ज्ञानीला भेदविज्ञानाच्या बलाने सर्व कुटुंबासंबंधीचा मोह नव्हता. पण चारित्रमोहाच्या उदयवश रागादी विकल्प उत्पन्न होतात. त्याच्यावर विजय मिळविण्यासाठी गृहस्थ अवस्थेचा त्याग करून मुनी होण्याची इच्छा करतो. सर्व बंधन तोडून निर्बंध होण्यासाठी संयम धारण करण्याचा संकल्प केला आहे. घर सोडून जंगलाच्या दिशेने त्याचे गमन चालू झाले आहे. जात असताना रस्त्यामध्येच त्याचे चिंतन चालू आहे, मी काय करण्यासाठी जात आहे. आता मला काय करायचे आहे ? आता मला पाच प्रकारच्या आचाराचा आश्रय घ्यावयाचा आहे. संसार संकटातून दूर होण्यासाठी व अविनाशी सुख प्राप्त करण्यासाठी हे पंचाचार शरणभूत आहेत.

आचार पाच प्रकारचा आहे - १) ज्ञानाचार, २) दर्शनाचार, ३) चारित्राचार, ४) तपाचार व ५) वीर्याचार.

१) सम्यग्ज्ञानासाठी प्रयत्न करणे ज्ञानाचार. २) सम्यग्दर्शनाच्या विशुद्धिसाठी प्रयत्न करणे दर्शनाचार. ३) चारित्राच्या शुद्धिसाठी प्रयत्न करणे चारित्राचार आहे. ४) उपवासादी तपासाठी प्रयत्न करणे तपाचार आहे. ५) आपल्या शक्तीनुसार या सर्व आचरणामध्ये उत्साह ठेवणे वीर्याचार आहे.

**ज्ञानाचार ग्रहण करण्याचा निश्चय -**

ज्ञानी विचार करीत आहे,- हा ज्ञानाचार शुद्ध आत्म्याचा कोणी नाही. तरीसुद्धा मी त्याला ग्रहण करतो. कारण या ज्ञानाचाराच्या प्रसादाने शुद्ध आत्म्याला मी प्राप्त करतो. ज्ञानाच्या आराधनेने मी माझ्या स्वभावाचा निर्णय करतो की मी मात्र सहज ज्ञानस्वभावी आहे. पूर्वी या जीवाचा तीव्र अनुराग असल्यामुळे विषय-कषायामध्ये प्रवृत्ती होत होती. आता अनुराग मंद झाल्यामुळे व्रत व तपामध्ये प्रवृत्ती होत आहे. ज्ञानाचार ८ प्रकारचा आहे.

१) काल ज्ञानाचार - योग्य काळामध्ये स्वाध्याय करणे. काल ज्ञानाचार आहे. जसे सूर्यग्रहण, चंद्रग्रहण, संधिकाळ, पर्व दिवस, अमावस्या, पौर्णिमा, उल्कापात, दिशाराह संघातील साधूंची सल्लेखना, आचार्यांची समाधी इत्यादी काळामध्ये सूत्रग्रंथांचा स्वाध्याय करण्याचा निषेध आहे. या वेळांना सोडून अन्य समयामध्ये स्वाध्याय करणे, ज्ञान वाढविणे काल नावाचा ज्ञानाचार आहे.

२) विनय ज्ञानाचार - गुरुंचा, शास्त्राचा विनय करणे. ज्ञानी पुरुष विनयपूर्वक शास्त्राची गुरुंची उपासना करतो. ज्यांच्यापासून ज्ञान मिळाले त्यांच्या प्रती विनयपूर्ण व्यवहार करावा. शास्त्राला आपल्यापेक्षा उच्चासनावर विराजमान करून श्रुतभक्ती, आचार्यभक्तीपूर्वक शास्त्राचे अध्ययन करणे विनयाचार आहे. ज्ञानीला गर्व असत नाही.

३) उपधानाचार - कोणत्याही ग्रंथाचा स्वाध्याय सुरू करताना तो पूर्ण होईपर्यंत काहीतरी नियम घेणे अर्थात् एखाद्या फळाचा, रसाचा, धान्याचा त्याग करणे उपधानाचार आहे. पूर्वी मुनिराज महान् सिद्धान्त ग्रंथाचे अध्ययन करताना नीरस आहार करीत अथवा केवळ कांजी भक्षण करीत.

४) बहुमान - ज्ञानी पुरुषांचा बहुमान करणे, सत्कार करणे, त्यांना उच्च आदर बुद्धीने पाहणे हा बहुमान ज्ञानाचार आहे.

५) अनिह्नवाचार - ज्या गुरुंच्याकडून काही

शिकले असेल किंवा कोणत्या ग्रंथातून वाचून काही ग्रहण केले असेल त्यांचे नाव न लपविणे. त्यांचे नाव व्यक्त करणे अनिह्नव ज्ञानाचार आहे.

६) व्यंजनाचार - कोणताही ग्रंथ वाचताना, श्लोक, सूत्र किंवा स्तुती म्हणताना ऱ्हस्व, दीर्घ स्वरांचे उच्चारण शुद्ध करणे. शब्दशुद्धि आचार आहे. येथे केवळ पाठ म्हणणे आहे.

७) अर्थाचार - सूत्राचा, श्लोकाचा अर्थ करताना शुद्ध अर्थ करणे. ज्या शब्दाचा जो योग्य अर्थ असेल तो ग्रहण करणे, अर्थाचार आहे. येथे केवळ अर्थ लावणे आहे.

८) उभयाचार - श्लोक, शुद्ध उच्चारून त्याचा अर्थ पण शुद्ध करणे यास उभयाचार म्हणतात. येथे पाठ म्हणणे व अर्थ करणे दोन्ही क्रिया आहेत. दीक्षार्थी विचार करतो.

या सर्व शुभ मन-वचन-कायेच्या क्रिया आहेत व शुभरागाची प्रवृत्ती आहे. वास्तविक शुभ राग व शुभ क्रिया करणे माझा स्वभाव नाही वास्तविक मी एक शुद्ध ज्ञानस्वभावी आहे. धर्मासाठी ज्ञानाचाराची प्रवृत्ती होते, हा ज्ञानाचार सुद्धा मी नाही. म्हणून हे ज्ञानाचार तुम्ही माझे स्वरूप नाही तरीसुद्धा मी तुम्हाला तोपर्यंत ग्रहण करतो जोपर्यंत तुमच्या प्रसादाने मी शुद्ध आत्म्याला प्राप्त करीत नाही.

दर्शनाचार ग्रहण करण्याचा निश्चय - ज्ञानी विचार करतो की,

मी सम्यग्दर्शनाचाराला प्राप्त होतो. सम्यग्दर्शनाचार सुद्धा ८ प्रकारचा आहे.

१) निःशंकित, २) निःकांक्षित, ३) निर्विचिकित्सा, ४) अमूढदृष्टी, ५) अपगूहन, ६) स्थितिकरण, ७) वात्सल्य, ८) प्रभावना

**१) निःशंकित अंग -**

जिनेन्द्र भगवंतांच्या वचनामध्ये शंका न घेणे निःशंकित अंग आहे. अज्ञानी लोक आगमात सांगितलेल्या सूक्ष्म किंवा दूरवर्ती पदार्थावर विश्वास ठेवत नाहीत. कोण बघितले आहे स्वर्ग किंवा नरक, पंचमेरु, नंदीश्वर द्विप एवढे उंच असून का दिसत नाहीत इत्यादी शंका घेतात. एखाद्या सामान्य व्यक्तीने सांगितलेल्या १० गोष्टी समजल्या व २ गोष्टी समजल्या नाहीत तरी त्याच्यावर आपण विश्वास ठेवतो. ही तर सर्वज्ञ वीतराग भगवंतांची वाणी आहे. कारण ते कधीही अन्यथा बोलत नाहीत. कारण जेथे कषायाचा व अज्ञानाचा अभाव आहे. तेथे असत्य बोलण्याचे काही कारणच राहिले नाही. जिनेंद्र भगवंतांचे वचन परम सत्य आहे, असे श्रद्धान ठेवावे.

शंका शब्दाचा दूसरा अर्थ भय आहे. सम्यग्दृष्टीला इहलोकभय, परलोकभय, वेदनाभय, अरक्षाभय, अगुप्तिभय, मरणभय व आकस्मिकभय असत नाही, तो निर्भय निःशंक असतो. जो जाणतो की तिन्ही काळामध्ये ज्ञानस्वरूप लोकच माझा लोक आहे. त्यामुळे या लोकाची व परलोकाची भीती त्याला असत नाही. मी सदैव ज्ञानाचेच वेदन करतो. अन्य आगन्तुक शारीरिक वेदना माझ्या नाहीत. जे सत्स्वरूप आहे ते कधी नष्टच होत नाही तर त्याच्या अरक्षेचे भय कोठून ? वस्तूचे स्वरूप त्याची परमगुप्ती आहे. मी माझ्या ज्ञानगुंफेमध्ये स्वयं सुरक्षित आहे तर अगुप्तीभय कोठून असणार ? माझा चैतन्य प्राण कधीच नष्ट होत नाही तर मरणाचे भय पण कसे असणार ? मी अनादि अनंत अकृतक सहज ज्ञानस्वरूप आहे. तेथे आकस्मिक काही नाहीच तर आकस्मिक भय कसले ? ज्ञानी सतत सहज ज्ञानस्वभावाचे वंदन करतो.

**२) निःकांक्षित अंग -**

धर्मपालनाच्या मोबदल्यात अन्य पदार्थांची इच्छा न करणे, निःकांक्षित अंग आहे. या लोकामध्ये मला सम्पत्ती प्राप्त होवो किंवा परलोकामध्ये चक्रवर्ती, देवेन्द्र, असुरेन्द्र आदी पदाची प्राप्ती व्हावी, अशाप्रकारे इच्छेचा अभाव होणे, निःक्रांक्षित अंग आहे. ज्याच्याजवळ अमूल्य सम्यक्त्वरूपी रत्न आहे.

ज्याच्याजवळ अमूल्य सम्यक्त्वरूपी रत्न आहे त्याला सांसारिक अभ्युदय स्वयं प्राप्त होतात. त्याला त्याची इच्छा असत नाही. पुत्र, धनसम्पत्ती

इत्यादी लौकिक सिद्धीसाठी व्रतांचे पालन करणे मिथ्यात्व आहे. रागद्वेषमोहाचा नाश करण्यासाठी वीतराग प्रभूंची उपासना करावी.

**३) निर्विचिकित्सा अंग –**

हा तिसरा दर्शनाचार आहे. शरीर स्वभावाने अपवित्र आहे. असा विचार करून रत्नत्रयधारींचे मल, मूत्र वमन इत्यादी दूर करण्यामध्ये ग्लानी न करणे निर्विचिकित्सा अंग आहे. ज्याप्रमाणे मातेला आपल्या मुलावर प्रेम आहे तर मुलाचा नाकातील मल आपल्या पदराने पुसण्यामध्ये तिला घृणा वाटत नाही. त्याचे मलमूत्र साफ करण्यामध्ये ही ग्लानी वाटत नाही कारण तिला आपल्या मुलावर घनिष्ट प्रेम असते. त्याप्रमाणे सम्यग्दृष्टीला धर्मात्म्यावर घनिष्ट प्रेम असते त्यामुळे धार्मिक पुरुषांची सेवा करण्यामध्ये मनात ग्लानी उत्पन्न होत नाही.

**४) अमूढदृष्टी अंग –**

मिथ्यादृष्टींच्या ज्ञानादींची प्रशंसा सोडून प्रत्यक्ष व अनुमानाने बाधारहित जिनेंद्र भगवंतांनी सांगितलेल्या धर्मामध्ये रूची ठेवणे अमूढदृष्टी अंग आहे. लौकिक साधनेच्या बलाने कुमार्गगामीमध्ये काही चमत्कार उत्पन्न झाले तरी त्यांच्यावर मोहीत न होता सम्यग्दृष्टी जिनधर्मामध्ये अटल श्रध्दान ठेवतो.

**५) उपगूहन / उपबृंहण अंग –**

ज्याप्रमाणे आपल्या पुत्राद्वारे केलेल्या दोषांना माता झाकते, बाहेर प्रकट करीत नाही त्याप्रमाणे धार्मिक पुरूषाकडून अज्ञानाने किंवा अशक्तपणामुळे घडलेल्या दोषांना सम्यग्दृष्टी प्रकट न करता त्यांना झाकून टाकतो ते त्याचे उपगूहन अंग आहे. धर्मात्म्यामध्ये जर काही दोष आला तर तो लोकामध्ये जाहीर करू नये. कारण लोक व्यक्तीला केवळ दोष देत नाहीत तर धर्माला व धर्माचे पालन करणाऱ्या सर्वांनाच दोष देतात. या धर्माचे पालन करणारे सर्वच लोक असे असतात. असे समजून धर्माची बदनामी होते. म्हणून धर्मात्मा पुरुषाचे दोष बाहेर न व्यक्त करता ज्याच्याकडून दोष घडला आहे त्यालाच एकान्तामध्ये समजून सांगून दोष सुधारण्याचा प्रयत्न करावा.

**६) स्थितिकरण अंग –**

भूक, तहान आदी परीषंहामुळे किंवा कषायाच्या उयामुळे सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्ररूप धर्मापासून च्युत होणाऱ्या स्वत:च्या मनाला व साधर्मी पुरूषांच्या मनाला पुन्हा सन्मार्गामध्ये स्थिर करणे स्थितिकरण अंग आहे. आपल्याला प्राप्त झालेले धन केवळ कुटुंबियासाठीच खर्च करू नये तर अन्य गरीब, असहाय धर्मात्मा पुरुषांसाठी धनाचा उपयोग करून त्यांना धर्मामध्ये स्थिर करणे हे सम्यग्दृष्टीचे कर्तव्य आहे.

**७) वात्सल्य अंग –**

जिनागमामध्ये, चतुर्विध संघामध्ये उपकाराची अपेक्षा न करता प्रमोदकारिणी प्रीती वात्सल्य अंग आहे. धार्मिक लोकांना पाहून त्यांच्या गुणांना जाणून अत्यन्त प्रसन्न होऊन त्या गुणी पुरुषांवर निरपेक्ष निश्छल प्रेम करणे वात्सल्य अंग आहे. ज्याप्रमाणे गाय वासरावर निश्छल प्रेम करते, त्या वासरापासून गायीचे काही हित होत नाही तरी तिचे त्याच्यावर नि:स्वार्थ प्रेम असते त्याप्रमाणे एक धर्मात्मा पुरुष दुसऱ्या धर्मात्मा पुरुषावर कोणत्याही प्रत्युपकाराची अपेक्षा न करता निष्काम प्रेम करतो, हेच वात्सल्य आहे.

**८) प्रभावना –**

सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्चारित्राच्या द्वारे स्वत:च्या आत्म्याला प्रभावित करणे, प्रकाशित करणे प्रभावना अंग आहे. अथवा सम्यग्दर्शनादि गुणांद्वारे जिनधर्माचा उद्योत करणे प्रभावना आहे. ज्ञानाच्या द्वारे अज्ञान अंधकराचा नाश करावा. उपवासादि तपाच्या द्वारे आणि सिध्दचक्र, इन्द्रध्वज, कल्पद्रुम इत्यादी विधानांच्या द्वारे जगत्पूज्य पवित्र जगद्बंधू जिनधर्माची मोठी प्रभावना करावी.

हा आठ प्रकारचा दर्शनाचार सुध्दा व्यवहार

आहे. शुभभाव आहे. म्हणून विरक्त ज्ञानी विचार करतो की हे आठ प्रकारचे दर्शनाचार तुम्ही माझ्या आत्म्याचे कोणी नाहीत. असे मी निश्चयाने जाणतो. तरीसुध्दा मी तुमचे तोपर्यंत ग्रहण करतो की जोपर्यंत तुमच्या प्रसादाने शुध्दात्म्याला प्राप्त करीत नाही. शुध्दात्मा प्राप्त झाल्यानंतर या ८ प्रकारच्या दर्शनाचाराचे प्रयोजन नाही. परंतु प्राथमिक भूमिकेमध्ये किंवा खालच्या अवस्थेमध्ये हे हस्तावलंबन रूप आहेत.

**चारित्राचाराच्या ग्रहणाचा निश्चय –**

चारित्राचार १३ प्रकारचा आहे. ५ महाव्रत हिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य व अपरिग्रह, ५ समिति ईर्या, भाषा, एषणा, आदाननिक्षेपण व उत्सर्ग, मनवचनकाय ३ गुप्ती हे १३ प्रकारचे चारित्र मोक्षमार्गाच्या प्रवृत्तीचे कारण आहे. हा परिणाम सुध्दा शुभरागरूप आहे. हा चारित्राचार एक विशुध्द परिणमन आहे. हे आत्म्याचे ध्रुव स्वरूप नाही. हे सदा राहणारे नाही. हा ज्ञानी विरक्त पुरुष अत्यंत प्रसन्नतेने याचे पालन करण्याची इच्छा करीत आहे.

कृतज्ञतापण आहे की तुमच्या प्रसादाने माझा उध्दार होणार तरीसुध्दा अतरंगामध्ये भेदविज्ञान विद्यमान आहे म्हणून ज्ञानी विचार करतो की हे चारित्राचार, मी निश्चयाने जाणतो की तुम्ही माझ्या शुध्द आत्म्याचे कोणी नाहीत. तरीसुध्दा मी तुम्हाला तोपर्यंत प्राप्त करतो की जोपर्यंत तुमच्या प्रसादाने शुध्द आत्म्याला प्राप्त करतो.

**( क्रमशः)**

---

## सभासदांना विनम्र निवेदन....

सन्मति – मासिकाची अमृतमहोत्सवी वर्षपूर्तीकडे यशस्वी वाटचाल झालेली आहे. परमपूज्य गुरुदेव समंतभद्र महाराजांची प्रेरणा, बाहुबली संस्थेकडून मिळालेले सततचे पाठबळ आणि सर्व वाचक सभासदांकडून मिळालेले आत्मीय सहयोग यामुळे गेल्या ७५ वर्षांपासून धर्म प्रभावनेचा हा सन्मति–प्रवाह वाहता आहे. अनेक अडचणींवर मात करीत आणि प्रसंगी तोटा सहन करून सन्मति मासिक जैन साहित्यात योगदान देत आहे. जानेवारी २०१५ पासून मासिकाची वार्षिक वर्गणी रु. १५०/– आणि आजीवन (१५ वर्षाकरिता) १,५००/– रुपये अशाप्रकारे होती. परंतु वाढती महागाई प्रिंटिंग, कागद, डीटीपी व डिझाईन या सर्वच गोष्टींना प्रभावित करीत आहे. त्यामुळे **चालू महिन्यापासून वार्षिक वर्गणी रुपये २५० आणि आजीवन (१५ वर्षाकरिता) रुपये २,५००/–** अशा प्रकारे वाढ करण्यात येत आहे.

आपण सर्वांनी अनेक वर्षापासून या मासिकास जो सहयोग दिला, त्याबद्दल अनेक धन्यवाद ! या मासिकाला दीर्घजीवी बनवण्यासाठी आणि भविष्यातही ते सुचारू पद्धतीने सुरू राहण्यासाठी मासिकावर प्रेम करणारे सर्व वाचक ही अपरिहार्यता समजून घेतील आणि भविष्यातही असाच सहयोग देतील हा विश्वास वाटतो. तेव्हा सर्व सभासदांना विनंती आहे की आपण सर्वांनी लवकरात लवकर वाढीव वर्गणी पाठवून सहकार्य करावे.

**-संपादक मंडळ**

# योगसार चिंतन

(लेखांक ९)

प्रियदर्शन जैन, नागपूर

**जिण सुमिरहु जिण चिंतबहु जिण झायहु सुमणेण।**
**सो झाहंतह परमपउ लब्भइ एक्कखणेण।।१९।।**

**सुद्धप्पा अरु जिणवरहं, भेउ मी किमपि वियाणि।**
**मोक्खह कारण जोईया णिच्छइ एउ वियाणि।।२०।।**

**अर्थ–** शुद्ध भावाने जिनेश्वर भगवंताचे स्मरण, चिंतवन व ध्यान करा (जिनेंद्र अर्थात आत्मदेव), परम शुद्ध परिणामानेच परमात्मपदाची प्राप्ती होते।।१९।।

**अर्थ–** हे योगी ! आपला शुद्धात्मा व परमात्मा (जिनेंद्र देव) यामध्ये किंचितही भेद नाही. हेच श्रद्धान मोक्षाचे साधन आहे, हे तू सदा आपल्या चित्तात (ध्यानात) ठेव।।२०।।

येथे आचार्य देव सांगतात की, आपला आत्मस्वभाव व जिनेंद्र परमात्म्याचे स्वभाव यात परमार्थाने काहीच अंतर नाही. शुद्ध भावाने जिनेंद्राचे स्मरण म्हणजे वीतराग भावांच्या द्वारे आपल्या आत्मदेवाचे स्मरण–चिंतन–ध्यान करणे होय.

हे आत्मन् ! शुद्धभावाने जिनेंद्राचे स्मरण कर ! जिनेंद्र म्हणजेच परमात्मा... पदार्थ अपेक्षेने आत्मा साक्षात् जिनेंद्रासमानच आहे आणि तो तर तूच आहेस, मग त्याचेच ध्यान कर, चिंतन कर, त्यामध्येच तन्मय हो..

ज्याला खऱ्या देव–शास्त्र–गुरुचे खरे स्वरूप समजले त्याचेच ज्ञान सम्यक् म्हटले जाते.. त्याला परमार्थाने आपला निजात्मा उपादेय असतो आणि व्यवहारात जिनेंद्र देव उपादेय असतात. शुद्ध भावाने जिनेंद्र देवाचे स्मरण करा.... याचा अर्थ काय? तर जिनेन्द्र भगवंताच्या समानच माझे आत्मतत्त्व आहे याची सतत अनुभूती.. त्याचेच सदैव स्मरण!

असे स्मरण तोच करू शकतो, ज्याने आपल्या श्रध्दा आणि ज्ञानात आपल्या आत्मस्वभावाला परिपूर्ण जाणले आणि मानले. 'जिथे रुची असते तिथेच वीर्य काम करते', अशी एक म्हण आहे.. तिची प्रतीती ज्ञानी सम्यग्दृष्टी जीवास सतत येत असते..... त्याला आपल्या आत्मस्वभावाची रुची निर्माण झाल्याने त्याचे मन सतत त्यामध्येच तन्मय होते..

ज्या ज्या वेळी ज्ञानी सम्यग्दृष्टी जीव आपली अंतर्दृष्टी आपल्या निज वैभवमयी आत्मस्वरूपावर केंद्रित करतात त्या–त्या वेळेस त्यांना सहजत: अतींद्रिय आनंदाची प्राप्ती होते.. संयोगात राहूनही ते संयोग रूपाने–कर्म रूपाने–राग रूपाने किंवा दु:खरूपाने परिणमित होत नाहीत..... जेव्हा–जेव्हा त्यांना किंचित् अस्थिरतेच्या कारणाने पराश्रयरूपी विकल्प उत्पन्न होतात, तेव्हा–तेव्हा ते जिनेंद्रदेवाचा आश्रय घेऊन पुन्हा आपल्या आत्मदेवाला शरण जातात. त्यांची दृष्टी आपल्या एक अखंड ज्ञायक स्वरूपावरच केंद्रित असते.. त्याच्याच महिमेचा विचार करीत ते आपल्या अंतरंगातील पवित्र आत्मिक शक्तीचे संवेदन करतात.

सम्यग्दृष्टी धर्मात्मा जीव शुभ सोडून अशुभात प्रवर्तन करू इच्छितच नाहीत.....परंतु त्याच वेळेस ते अंतरंगातून शुभ प्रवृत्तींना सुद्धा मुळीच उपादेय मानीत नाहीत..... आपल्या आत्मदेवाच्या साक्षीने निरंतर तत्त्वाभ्यासाच्या मदतीने बाह्य प्रपंचापासून विरक्त राहण्याचा प्रयत्न करतात आणि स्वतःमधेच आपला पुरुषार्थ सुरू ठेवतात.

अर्थातच स्वभाव अपेक्षेने आपण सर्व परमात्मा आहोत.....याची दृढ प्रतीती करून अरिहंत सिद्ध परमात्मा ज्याप्रमाणे ज्ञाता-दृष्टा रूपाने परिणमित होतात, त्याचप्रमाणे आम्ही सुद्धा आपल्या ज्ञानात त्यांच्या स्वरूपाचा विचार करून ज्ञाता-दृष्टारूप राहायचा उद्यम केला पाहिजे.. यालाच खरा पुरुषार्थ म्हटले आहे.

२०) हे योगी (निज स्वरूपाचा महिमा ज्यांना भासित झाली आहे)! तू आत्मा आणि परमात्मा यांच्यात किंचितही भेद मानू नको..सर्वज्ञ देव आपल्या ज्ञानात, ज्ञानाने सर्वांना भिन्न जाणतात..... परमात्मा (सिद्ध भगवान) आपल्या सर्वज्ञ पर्यायाने जाणतात आणि तू सुध्दा आपल्या अल्पज्ञ पर्यायाने जाणण्याचेच कार्य करीत आहे.... यामुळेच वस्तुस्वभावाने तुझ्यात व सर्वज्ञांमध्ये काहीच अंतर नाही. ज्ञाता (जाणणे) स्वभावाचा स्वीकार हेच मोक्षाचे साधन आहे.

आचार्यदेव म्हणतात, 'तू पामर आहेस की प्रभू हे तर तुलाच ठरवायचं आहे. आपल्या प्रभुत्वाचा स्वीकार करताच पामरता आपोआपच विलयास पावते....ज्याच्या आश्रयाने पूज्य पदाची प्राप्ती होते अशा शुद्ध आत्मतत्त्वाची प्रतीती कर, त्याचाच अनुभव कर.....त्यामध्ये आणि परमात्म्यामध्ये काहीच अंतर नाही.'

पू. वर्णीजी आपल्या 'आत्मकीर्तन' या रचनेत म्हणतातच ना,

**मैं वह हूँ जो है भगवान, जो मैं हूँ वह है भगवान।**
**अंतर यही उपरी जान, वे विराग, मैं राग वितान।।**

ज्याप्रमाणे जिनेन्द्र परमात्मा रागरहित आहेत..ते रागाचे कर्ता नाहीत..अगदी तसेच तुझ्या पर्यायीत जरी राग असला तरी, स्वभावात रागाचा अंश मात्र नाही किंवा तू रागाचा कर्ता नाही. दोघांमधील हे अंतर वरवरचे आहे. जसे परमात्मा पूर्ण वीतरागी आहेत, अगदी तसेच परमार्थाने तू सुद्धा स्वभावाने पूर्ण वीतरागी आहेस.... संपूर्ण वीतरागता प्रकट होण्याचे सामर्थ्य तुझ्या स्वभावातच विराजमान आहे..अन्य कशातच नाही.. हीच मान्यता मोक्षाला कारणीभूत आहे.

येथे आचार्य देव आपल्याला सांगू इच्छितात की, 'संयोगांच्या भिन्नतेचे सम्यक् ज्ञानही आपल्या स्वभावाच्याच आश्रयाने प्रगट होते..याही अवस्थेत तू आपल्या स्वभावसिध्दाला ओळखू शकतो..आपल्या वीतरागी स्वभावाचा स्वीकार करून त्यामध्येच स्थिर होण्याचा, त्याचेच ध्यान करून एकाग्र होण्याचा पुरुषार्थ करू शकतो..हेच मोक्षाचे साधन आहे. पर्याय शुद्ध जरी असली ती क्षणिकच असते..तिच्या आश्रयाने मोक्षाची प्राप्ती होत नाही..' ही पर्यायमात्र म्हणजे मी नाही 'अशा भेदविज्ञानरूपी चिंतनानेच ज्ञानानुभूती (आत्म अनुभूती) होईल..... निजध्रुवाचा आश्रय आणि आराधना हेच एकमेव मोक्षाचे कारण आहे.'

कुणी म्हणेल तुम्ही असे कथन करून व्यवहाराचा लोप करीत आहात..परंतु असे नाही..आगमात अनेक ठिकाणी सांगितले आहे की, आत्म्यास ऊर्ध्व करून होणाऱ्या क्रियाच 'खरा व्यवहार' या संज्ञेस पात्र ठरतात...यासाठी आचार्यदेव कुठे कोणत्या अपेक्षेने कथन करीत आहेत, हे सम्यक् रीतीने समजणे गरजेचे आहे.....हा ग्रंथ द्रव्यानुयोगास मुख्य करून लिहिलेला आहे..म्हणूनच यास लघु समयसार असे म्हटले जाते..

एक मात्र खरे की, द्रव्यदृष्टी झाल्यावर वृत्ती (क्रिया) सुद्धा चरणानुयोगाच्या अनुसारच होतात.. त्या जबरदस्तीने कराव्या लागत नाहीत.. भूमिकेनुसार यथायोग्य व्यवहार ज्ञानीजनांना अवश्यमेव असतोच.. परंतु त्यात त्यांची उपादेय बुद्धी असत नाही.

**( क्रमशः )**





# पट्टमहादेवी–शब्दांपलिकडील अन्वयार्थ

## लेखांक (२५)

**–विपुल खेडकर,** नागपूर मोबा.८८८८८५४४३४

मुख्य मूर्तीच नव्याने घडवावी की, पूर्ण तयार असलेली आणि आता दोषरहित झालेलीच मूर्ती स्थापित करावी काय.....कारण प्राणप्रतिष्ठा उत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेला आहे.... अशा पेचात काय निर्णय होतो..... प्राणप्रतिष्ठा महोत्सवात वैष्णव मंदिर, जैन राणी यावरून काय काय वादळ उठते.... वाचू या या भागात....!

**प्रतिष्ठा की परीक्षा...?**

मूलनायक चेन्नकेशव मूर्तीच्या परीक्षणासाठी जमलेली सर्व गर्दी पांगली. मुख्य स्थपती आपली पत्नी आणि पुत्रासोबत आपल्या निवासस्थानी परतले आणि आश्चर्याने थक्क झाले! सुंदर रांगोळी आणि फुलांच्या सजावटीने प्रवेशद्वार सजले होते. दारात स्वागताला त्यांचा स्थायी सेवक वर्ग सज्ज होता...पंचपक्वान्नांचे जेवण तयार होते. पट्टमहादेवींच्या आदेशावरून सगळी सज्जता करण्यात आली होती. मनोमन सुखावलेले हे कुटुंब पट्टमहादेवींच्या आत्मीयतेचे ऋण ग्रहण करून जीवनाच्या नव्या वाटचालीवर आरूढ झाले.

प्राणप्रतिष्ठा महोत्सवाला अवघे पांच दिवस उरले होते. नव्या दमाचे शिल्पकार डंकण स्वतःसोबत आवश्यक तेवढेच सहाय्यक शिल्पी घेऊन कामाला लागले. मूळ मूर्तीप्रमाणेच हुबेहूब निर्दोष मूर्ती तीन दिवसांत तयार झाली.

सोहळा अवघ्या दोन दिवसांवर आला. तयारी पूर्ण वेगात सुरू होती. मात्र सर्वत्र हजारोंच्या संख्येने तिलकधारी वैष्णवांची गर्दी विशेष नजरेत भरण्याइतपत वाढू लागली. त्यांच्यात आपापसात सुरू असणाऱ्या गप्पांचा सारांश म्हणजे,

'पट्टमहादेवी जैन आहेत, हट्टी–जिद्दी आहेत, पतीधर्माचे पालन न करता वारंवार दिगंबर बाहुबलीची स्तुती करतात...वडिलांचा धर्म निराळा, पतीचा निराळा, स्वतःचा निराळा; म्हणजे पालन पोषण करणाऱ्यांशी प्रतारणा नव्हे कां? मात्र प्रेमात आंधळ्या असणाऱ्या महाराजांनी डोळ्यांवर पट्टी बांधली आहे, पट्टमहादेवीचे वाक्य जणू वेदवाक्य असल्याप्रमाणे ते वागतात... या मंदिर निर्माण करण्याच्या कार्यात मदत करण्याच्या बहाण्याने मुख्य शिल्पकारासोबत देखील प्रेमक्रीडा केली... मुख्य मूर्ती दोषपूर्ण बनविण्यात पट्टमहादेवींचाच हात आहे.... दोषपूर्ण मूर्ती बनवून वैष्णव धर्माला वर येऊ न देण्याचे कटकारस्थान त्यांनीच रचले असावे....' इत्यादि..इत्यादि !

'आता प्राणप्रतिष्ठेसाठी वैष्णव राजांसोबत वैष्णव राणीलाच बसायला हवे, जैन मतावलम्बी पट्टमहादेवी नकोत...!' अशा चर्चांना ऊत आला होता.

रात्री उशीरा मुख्य स्थपतींना पहाटेच राजमहालात पोहोचण्याचा सांगावा आला. सकाळची आन्हिकं आटोपून स्थपती पोहोचले तर, सर्व मान्यवर मंडळी स्थानापन्न झाली होती आणि सन्निधान पट्टमहादेवींसोबत सर्वच राण्यांना घेऊन दाखल होत होते. मुख्य प्रधान श्री गंगराज यांनी सन्निधानांच्या परवानगीने सभेला सुरुवात केली. गुप्तहेर चाविमय्यांना संपूर्ण अहवाल प्रस्तुत करायला सांगितला. नगरात घडत असणाऱ्या सर्व बातम्या सभेपुढे ठेवून पट्टमहादेवींवरील आक्षेपार्ह आरोप सांगण्यात आले. आणि...... तेवढ्यात धाकट्या राणी लक्ष्मीदेवींचे पालक पिता तिरुवरंगदास यांच्या चेहऱ्यावरील सूक्ष्म हास्यरेखा सन्निधानांनी टिपली.

बातम्या उठविणाऱ्या वैष्णव वेषधारी

लोकांना वेगवेगळ्या कारणांनी राजमहालाकडून आमंत्रण गेल्याने; सन्निधान वैष्णव आहेत, आपण आपल्या कार्यात यशस्वी होणारच; या आत्मविश्वासाने ते सभेत बसले होते. सगळ्या प्रकरणाचा शहानिशा जसजसा व्हायला लागला, तसे तसे काही जण मागच्या मागे बाहेर जाण्याचा मार्ग काढू लागले. अर्थातच त्यांच्या मागावर असलेल्या हेरांनी हे घडू दिले नाही! सगळ्या प्रकरणाचा उलगडा होत शेवटी याच्या मुळाशी परप्रांतातून आलेले मांसभक्षी, जानवे सुद्धा धारण न करणारे, स्वतःला वैष्णव म्हणविणारे हेर, तिरुवरंगदासांना हाताशी धरून राज्यात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे निदर्शनास आले.

होयसळ परंपरेनुसार सन्निधानांसोबत पट्टमहादेवीच प्राणप्रतिष्ठेला बसतील यावर सभेत एकमताने शिक्कामोर्तब झाले. धर्मदर्शी तिरुवरंगदास गळ्यापर्यंत आलेले प्रकरण झटकत स्वतःची सुटका करीत तेथून लवकरात लवकर सुटण्याच्या प्रयत्नात होतेच.... ते देखील बाहेर पडले ! राणी लक्ष्मीदेवींना पश्चात्ताप होत होता की, 'का आपण पित्याच्या शब्दांवर विश्वास ठेवून सगळ्या गोष्टी सन्निधानांना सांगितल्या आणि नेमकी परिस्थिती किती निराळी होती ! आपल्याला अजून आपल्या परंपरांचे ज्ञान नसतांना प्राणप्रतिष्ठेला बसण्याचा आग्रह का धरला ?'

**अद्वितीय वास्तूचा अद्वितीय लोकार्पण सोहोळा**

मंगल स्नानविधीने प्राणप्रतिष्ठा महोत्सवाची नांदी झाली. सन्निधान आणि पट्टमहादेवींना शास्त्रोक्त अभ्यंजन रीतीने मंगलस्नान घातले गेले. जिनमंदिर दर्शन करून मंगलवाद्यांच्या सुरात राजदाम्पत्यासहित सर्व मंडळींनी प्रतिष्ठा मंडप स्थळी प्रवेश केला. संपूर्ण वेलापुरी नगरी बन्दनवार, अल्पना आणि रंगावलीने सजली होती. नवीन  मूर्तीचा अभिषेक आदि क्रिया सुरु होत्या. फक्त भद्रपीठावर मूर्ती विराजमान करून प्राणप्रतिष्ठा क्रिया तेवढी बाकी होती. मुख्य स्थपतीने इतर काही शिल्पकारांसोबत मूर्ती मजबूत पीठावर विराजमान करून एकमुखाने प्रतिष्ठेकरिता आपली स्वीकृती प्रदान केली. सन्निधान, बिट्टीदेव आणि पट्टमहादेवींनी वेद मंत्रोच्चारात मूर्तीची स्थापना केली. नूतन प्रतिष्ठित भगवंतांचे नाव 'विजयनारायण' राहील असे जाहीर केले. गंध, अक्षत, यज्ञोपवीत, वस्त्रे, कुंकुम आदिने सजवून पुष्पार्चन, सहस्रनाम अर्चन आदि विधी यथावत् संपन्न झाले.

आता सैद्धांतिक सेवांची वेळ येऊन ठेपली होती. संगीत सेवेकरिता सारी वाद्ये तयार होती, गायक- वादक मात्र नाहिसे झाले होते. राजदम्पतीने इकडे तिकडे नजर फिरविली. आतापर्यंतचे सगळे कार्यक्रम व्यवस्थित पार पडले. नेमकेच कोयतूरचे आळंदवार दृष्टीआड कसे झाले ?..... यामागे नक्कीच काहीतरी काळेबेरे असावे, हे राजदम्पतीच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. दोघांनी एकमेकांकडे बघितले आणि जाणले. पट्टमहादेवींनी बिट्टीगाला संकेत करून जवळ बोलविले आणि तानपुरा वाजविण्यास सांगितले व स्वतः मधुर सुरात गायनाला आरंभ केला. कोण गात आहे... लोकांना कळलेच नाही, एवढे सगळे त्या गानमाधुर्यातून जणू दिव्यलोकात पोहोचले होते....! अचानक पट्टमहादेवींनी सन्निधानांना नृत्यसेवा प्रस्तुत करण्याची परवानगी मागितली आणि बघता बघता नृत्यसेवा सुद्धा प्रारंभ केली ! नृत्यसेवेकरिता उठण्याअगोदर आपल्या आसनावर बम्मलदेवींना विराजमान करण्यास त्या विसरल्या नाहीत. नृत्याला साथ देण्यास आता बिट्टिगा हजर होता, तर वाद्यांच्या साथीसाठी थोरले युवराज कुमार बल्लाल! नृत्यसेवेने विजयनारायण सुप्रीत झाले. गर्भगृहातून घुंगरूंचा ध्वनी प्रगटू लागला... भगवंतांच्या गळ्यातील पुष्पमाला त्यांच्या दक्षिण स्कंधा (खांदा) कडून खाली येऊ लागली.... पंडितांनी ती अलगद उचलली आणि नृत्यसेवा समाप्त होताच मोठ्या विनयाने महाराजांना सांगितले,

'आचार्यांनी आम्हाला सांगितले होते की, दक्षिणेकडून माला अथवा पुष्प खाली आले; तर

सर्व विधी शास्त्रोक्त पार पडले असे समजा! तेव्हा ही माला आता पट्‌महादेवींनी धारण करावी.....!!'

इतक्यात मंदिराच्या प्रवेशद्वारावर गडबड गोंधळ सुरु झाला. तिलकधारी लोकांनी आरतीसाठी झुंबड केली. सर्व व्यवस्था बिघडवून टाकण्याचा चंगच बांधला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पट्टमहादेवींनी डोळे मिटून गोम्मटेश स्तुती गायन सुरू केले. काय झाले कळेना पण प्रवेशद्वाराजवळील तिलकधारी खीळ लागल्यागत स्थिर झाले. स्वतःहून दरवाज्याबाहेर एका रांगेत लागले...! आरतीचा कार्यक्रम यथासांग पार पडला. सगळे तिलकधारी एका मागोमाग एक येऊन शिस्तीत आरती करून बाहेर पडू लागले.

सायंकाळी पालखीतून भगवंतांची नगर फेरी झाली, तर दुसऱ्या दिवशी विशेष पूजा आणि भोज संपन्न झाले. तिसऱ्या दिवशी संपूर्ण राजपरिवार सोन्याने बनविलेल्या गायीच्या उदरातून प्रवेश करून बाहेर पडला आणि महाराज बिट्टीदेवांची सुवर्ण तुला करण्यात आली. काही सुवर्ण सर्व धर्मांच्या पुरोहितांना, तर इतर सुवर्ण युद्धात प्राणांची आहुती देणारे, तसेच विशेष साहस दाखविणारे योद्धे व गुप्तचर यांच्या परिवारांना वाटण्यात आले. यानंतर विजयोत्सव संपन्न झाला. या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करतांना सन्निधान म्हणाले,

'आपले होयसळ राज्य सर्वधर्म समभाव धारण करणारे आहे. कोणावरही कोणत्याही धर्माची, धर्माचरणाची जबरदस्ती नाही. उच्चनीचता नाही. तुळुकाडू प्रदेशावर मिळालेला विजय म्हणजे आपण शत्रू संकटातून बाहेर पडलो असे नाही, तर आता चालुक्यांचे वेगवेगळे बारा सामन्त आपल्या उत्कर्षावर वाकडी नजर करून उभे आहेत, त्यामुळे माझ्या शूर वीर होयसळ रक्षकांनो ! आता आपल्याला राज्य विस्तारासाठी बाहेर पडायचे आहे, केवळ राज्यसंरक्षण करून भागणार नाही. आपल्या या शार्दूल ध्वजाखाली आपण होयसळ निष्ठेची, कन्नड राज्यात धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणाची शपथ घेऊ या, कटिबद्ध होऊ या ! याच ठिकाणी आम्ही भावी विजय यात्रेवर निघण्याची घोषणा करतो आहोत. येत्या दशमीच्या मुहूर्तावर आमची सेना राजधानीतून बाहेर पडेल ! राष्ट्रासाठी आपण सर्व तनमन-धनाने, एक मताने तयार रहा !'

**असंगाशी संग, सदाचाराचा भंग!**

प्रतिष्ठा समारोहाकरिता जमलेली मंडळी परतायला लागली होती. दुसऱ्याच दिवशी सकाळी धर्मदर्शी तिरुवरंगदास आपल्या कन्येला भेटायला आले. कालचा संपूर्ण दिवस जणू नाहिसेच झाले होते!

'आम्ही आजच यादव पुरीला निघतो आहोत!' तिरुवरंगदासांनी सांगितले.

'आपण सन्निधानांना सांगा !' लक्ष्मीदेवीने म्हटले .

' त्यांना सांगितले तर ते म्हणतील, पट्टमहादेवींना सांगून जा! मला काय पागल कुत्रा चावलाय की, मी एका जैनाकडे जाऊ ?'

' काय झाले बाबा, आपण त्यांच्यावर नाराज कां ?'

' माझ्या उन्नतीत पहिला अडसर टाकणारी तीच आहे! जोपर्यंत तिचा प्रभाव आहे पोरी, तुझे काही अस्तित्वच नाही ग ! परवा बघितले नाही कां? कोणाला तुझी पर्वा होती ? तू तर कोणाच्या खिजगिणतीतही नव्हती.... वेळ पडली तर बम्मलदेवीला महाराजांच्या बाजूला बसविले, पण तुझ्याकडे लक्ष दिले नाही....वास्तविक पूजेला बसण्याचा अधिकार तुझाच होता ! परंतु तिच्या अधिकाराने ती सगळ्यांना दाबून टाकते...!! तू माझी मुलगी आहेस, वैष्णव आहेस हे लक्षात ठेव....मी येतो!'

' सन्निधानांनी विचारले तर काय सांगू ? ते नाराज झाले तर....?'

' मला त्या अर्धवट वैष्णवाची काही भीती नाहीये ....! जास्तीत जास्त माझे धर्मदर्शी पद काढून घेतील.... माझ्या सारख्या सडाफटंग्याला कुठेही जागा मिळेल.... देशो विशालः !...'

' पण इतक्या घाईत असे सर्व का....?'

'पोरी, तुला महालाचे पाणी लागले, बदलली तू !

जेव्हा आपटशील तेव्हा कळेल....मी तर चाललो....!'

**आणखी काय?**

सन्निधान विजययात्रेवर निघण्यापूर्वी लक्ष्मीदेवी यादवपुरीकडे रवाना झाल्या, बम्मलदेवी सन्निधानांसोबत, तर पट्टमहादेवींसोबत राजलदेवी, हेग्गडे दाम्पत्य, पद्मलदेवी आदि तीन ज्येष्ठ राण्या, शांतलादेवींचे चारही पुत्र-पुत्री, मुख्य स्थपती परिवार सहित आवश्यक रक्षक दल श्रवणबेळगोळकडे निघणार होते. ठरल्याप्रमाणे यात्रा सानंद संपन्न झाली. आल्यावर चेन्नकेशवांची जी मूळ मूर्ती होती, तिच्याकरिता वेगळे मंदिर तयार करून त्यात तिची स्थापना केली आणि 'कप्पे ( बेडूक) चेन्नकेशव' असे नाव दिले गेले .

याच काळात आणखी एक आनंदाची घटना नकळत घडली. जन्माने जैन असलेली राजकुमारी हरियल देवी, जिला आचार्यांनी वैष्णव म्हणून घोषित केले होते, तिचा विवाह जैन कुटुंबात ठरविण्याचा, तसेच ज्येष्ठ राजपुत्र कुमार बिटियण्णा यांचा देखील विवाह संबंध जैन कुटुंबात ठरविण्याचा प्रस्ताव पद्मलदेवींनी ठेवला. त्याला पट्टमहादेवींनी दुजोरा दिला... अर्थात् अंतिम निर्णय सन्निधानांचाच असणार होता !

एकाच वेळी बारा सामंतांसोबत लढणे म्हणजे केवळ दमछाक ! मनुष्यबळासोबतच धन आणि धान्य दोन्हींची मागणी वाढू लागली. नुकत्याच झालेल्या युद्धाने.... त्यानंतरच्या प्रतिष्ठा समारंभाने धान्याची कोठारे रिती व्हायला आलेली.... अशात एक दिवस युद्धभूमीकडून आणि यादवपुरीहून दोन पत्रे आली. धान्य आणि शस्त्रांची मागणी युद्ध क्षेत्राकडून होती तर, यादवपुरीहून राणी लक्ष्मीदेवींच्या नावाने कोनेय शंकर दण्डनाथांनी मंदिर निर्माणाकरीता आवश्यक धन आणि शिल्पकारांची मागणी केली होती. प्रश्न मोठा गंभीर होता! युद्धभूमीकरीता सुरक्षित सोन्याची नाणी बनवून परप्रांतातून धान्य खरेदी करता येईल, परंतु नवीन मंदिराची सध्या काय आवश्यकता ? हे मात्र कळेना !

वित्त सचिव मादिराज बोलत होते, 'तुळुकाडूच्या युद्धात प्राप्त झालेला भण्डार अद्याप जशास तसा आहे. त्यात मिळालेल्या सुवर्णमुद्रा गाळून होयसळ मुद्रा तयार करायच्या आणि शेजारील प्रांतांमधून धान्य खरेदी करावी लागेल, तरच आपण आपल्या सैन्याला रसद पुरवू शकू. तसेच आवश्यक शस्त्र निर्मिती होऊ शकेल.'

' ठीक आहे! सध्या तरी हाच पर्याय उत्तम आहे. हा मानव यज्ञ पूर्ण केल्याशिवाय या होयसळ राष्ट्रात सुख शांती नांदू शकणार नाही !' विषण्ण मनाने पट्टमहादेवी उद्गारल्या.

'आपण स्वतः तर युद्ध छेडले नाही ! ना कोणाचे राज्य हडपण्याची अभिलाषा बाळगली ! स्वतःच्या रक्षणासाठी या प्रकारची हानी अनिवार्यच आहे ना !

'आत्मरक्षेसाठीची अनिवार्यता समजून संतुष्ट व्हायला हवे....परंतु रक्ताच्या तहानेने लढतात, तेव्हा शांती आणि सुख कोठे ? घराघरात युद्धाचा आतंक असतो !' शांतलादेवींचा भावपूर्ण स्वर हृदय हेलावणारा होता.

' पट्टमहादेवींची ही अधीर वाणी ? सन्निधानांच्या स्फूर्तिदेवता आपण ! आपणच अशा अनासक्त झाल्या तर कसे ?' व्याकूळ होऊन वित्तमंत्री बोलत होते.

' बाहेरच्या शत्रूंशी दोन हात करणे सोपे... पण या आंतरिक शत्रूंना कसे रोकावे? कळत नाही..!'

' आंतरिक शत्रू ?..... होयसळ राज्यात आंतरिक शत्रुत्वासाठी उपजाऊ वातावरण आहे कोठे ?'

' मी देखील याच भ्रमात होते ! सन्निधानांनी मतांतर केले, तेव्हा मी विचलित झाले... परंतु धर्म ही वैयक्तिक बाब म्हणून माझी मी समजूत घातली! मात्र वैष्णव मताच्या दबावात येऊन महाराजांनी वैष्णव कन्येसोबत विवाह केला तेव्हा विषण्णता आली..! त्यावेळी कोणीतरी म्हणाले देखील की, हा विवाह म्हणजे पट्टमहादेवींच्या पदराला लागलेली आग

आहे. त्यावेळी मी मनोमन विचार केला होता, ‘हवा मिळणार नाही तर, आग तशीच विझून राख होईल. परंतु प्रतिष्ठा महोत्सवात मतासंबंधीच्या संकुचित भावना डोके वर काढत असलेल्या बघून लक्षात आले की, आपण आगीला हवा पुरविली नाही तरी ती विझू न देण्याचे काम बाहेरून कोणीतरी करीत असते.... याचाच माझ्या मनावर आघात होतो आहे....हाच आंतरिक शत्रू होय....!’ पट्टमहादेवी स्वतःशीच बोलत होत्या .

‘आपण चिंता करू नये. अशा मत प्रसारकांवर आपण लक्ष ठेवू.’ मंत्री महोदय म्हणाले .

‘ ठीक आहे! या दुसऱ्या पत्रावर सध्या काही निर्णय घ्यायचा नाही. मी स्वतःच यादवपुरीला जाण्याचा विचार करते आहे ! परंतु ही बातमी गुप्त ठेवावी...येथे सुद्धा कोणाला कळू देऊ नका !’

‘ दण्डनाथांवर संशय ?’

‘ त्यांचे वय तरुण आहे... नुकताच धर्मबदल केला आहे... त्यांच्यात उत्साह असणे स्वाभाविक आहे. कोणीतरी त्यांचे कान भरून किंवा प्रलोभन दाखवून हे पत्र लिहून घेतलेले दिसते आहे.....’

‘आपण एकट्याच जाणार.....तेही अशा ठिकाणी जेथे वैष्णवमतींची गर्दी आहे...आपली प्रशंसा होत असली तरी आपण वैष्णव धर्म स्वीकारला नाहीय्, याबद्दल त्यांच्यात असंतोष धुमसत असतो. त्यात सन्निधान येथे नाहीत... थोडी काळजी वाटते....!’

‘ आमच्या सोबत आमचे मामा, रेविमय्या असतील, रक्षकदल असेलच.’

‘ठीक आहे !’ म्हणत वित्त सचिव मादिराजांनी निरोप घेतला. ते आपल्या कामात लागले.

दुसऱ्याच दिवशी पट्टमहादेवींनी प्रस्थान केले. जाता जाता त्या यदुगिरीला थांबल्या. नुकतेच आचार्यांचे शिष्य एम्बार दिल्लीच्या बादशहाकडून चेलुवनारायणाची मूर्ती सोडवून घेऊन मोठ्या परातभर दीनारांसोबत परतले होते! आचार्यांना परतायला अजून वेळ होता. त्यांचे क्षेमकुशल विचारून, मूर्तीचा रंजक इतिहास जाणून घेऊन पट्टमहादेवींनी विचारले,

‘ येथे आपणास काही असुविधा तर नाही ना ? आमचे नागिदेवण्णा आपली योग्य काळजी घेतात ना ? आणखी काही सुविधा ?...’

‘आपली कृपा दृष्टी असतांना कशाची कमतरता ? आम्हाला काही नकोय !’ एम्बार म्हणाले.

‘ येथे मंदिरचे काम बरेच बाकी आहे. त्यासाठी धनाची आवश्यकता आहे, असा संदेश आम्हाला प्राप्त झाला; म्हणून आम्ही विचारतो आहोत.’

‘ असे आम्ही सांगितले, मंत्रीजी ?’ एम्बारने प्रश्न केला.

‘ नाही तर ! आम्ही देखील अशी कोणतीच विनंती राजधानीकडे केलेली नाही !’ यादवपुरीचे मंत्री नागिदेवण्णा म्हणाले.

‘ याचा अर्थ असा संदेश तुमच्या मार्फत दुसऱ्याच कोणी पाठविलेला दिसतो.’

‘ असेच असावे...!’ संकोचाने मंत्री म्हणाले.

‘ राजमहालाचा आपणावर पूर्ण विश्वास आहे. म्हणून तर व्यवस्थेसाठी आम्ही स्वतः आलो. परंतु आता गोष्ट काही वेगळीच दिसत आहे. आपणास माहित न होता राजधानीपर्यंत निरोप येतो हे अनुचित आहे...!

‘ नक्कीच ! ताबडतोब कार्यवाही करून दोषींना योग्य शिक्षा व्हायलाच हवी !’

‘ शिक्षेचा विचार नंतर करू! आधी या सगळ्यामागे कोण आहे, त्यांचा काय उद्देश आहे हे यादवपुरीला जाऊन शोधावे लागेल. या संबंधी कोणतीही अफवा पसरू नये, याकडे लक्ष ठेवावे लागेल. याकरिता आपणासही आमच्या अचानक येण्याची काहीच कल्पना नव्हती असे भासवावे लागेल...’ पट्टमहादेवींनी नागिदेवण्णांना एका बाजूला बोलवून हळूच समजावून सांगितले .

पट्टमहादेवींच्या अकस्मात आगमनाचे यादवपुरीत काय पडसाद उमटतात...? जैन– वैष्णव यांच्यातील दूरी कमी होते....की वाढते....? वाचू या पुढील भागात !

**( क्रमशः )**

*****

# 'सोलहकारण भावना भाय....!'

(लेखांक १३)

हर्षा वेखंडे, नागपूर,९८२२६९०८६०

**आचार्य भक्ती भावना**

दशलक्षण पर्वानंतर चेतनाचा परिवार दरवर्षीनुसार यात्रेला निघाला. सिद्धवरकूट क्षेत्राहून गाडी निघाली. माध्यान्हाची वेळ आली. समोरून येणाऱ्या लोकांची गर्दी बघून गाडी बाजूला घेतली गेली. जयजयकार आता स्पष्टतेने कानावर पडू लागला. त्या गच्च गर्दीतून हळूहळू सामोरी आली ती हातात पिंछी-कमंडलू घेऊन जमिनीवर नजर रोखून भराभर चालणारी वयोवृद्ध दिगंबर मूर्ती....! आणि त्यांच्या मागोमाग २५-३० साधू शांततेने चाललेले.... जयजयकार करणाऱ्यांचा आवाज तेवढा दुमदुमत होता...

ही यात्रा पुढे सरकली. आवाज हळूहळू अस्पष्ट होत गेला आणि भारावलेली पावलं गाडीकडे वळली.

'फक्त एकच मुनिराज तेवढे पुढे का चालत होते?' संवेग म्हणाला.

'आचार्य आहेत ते....मुनी संघाचे अधिपती...संघाचे नायक असतात आचार्य! तुमच्या वर्गाचा कॅप्टन असतो ना..तसे.' शारदा काकू म्हणाल्या.

आचार्य पद म्हणजे गुणांची खाण! म्हणूनच तर णमोकार मंत्रात अरहंत व सिद्ध परमेष्ठींनंतर तिसरा नमस्कार आचार्य परमेष्ठींना केला जातो. कुंदकुंददेव लिखित श्री प्रवचनसार या ग्रंथाच्या मंगलाचरणात तर गणधरांना आचार्य स्थानी स्थापन केलं आहे आणि त्यांना नमस्कार केला आहे.

**किच्चा अरहंताणं सिद्धाणं तह णमो गणहराणं।**
**अज्झावयवग्गाणं साहूणं चेदि सव्वेसिं ।।४।।**

आपण शास्त्र- स्वाध्यायापूर्वी किंवा एरवीही जेव्हा मंगलाचरण करतो तेव्हा म्हणतो, पहिले मंगल भगवान महावीर आहेत, दुसरे मंगल गौतम गणधर आहेत, तिसरे मंगल कुंदकुंददेव आहेत.

**मंगलं भगवान् वीरो, मंगलं गौतमो गणी।**
**मंगलं कुंदकुंदार्यो, जैनधर्मोऽस्तु मंगलम्।।**

मंगल शब्दाचा अर्थ होतो पापांचा नाश.. सुखाची प्राप्ती..!

याचा अर्थ आम्हाला सुखाच्या रस्त्याकडे नेणारे भगवान महावीरानंतर हे आचार्य परमेष्ठी आहेत. मुख्यरूपाने आचार्य आत्मसाधनेत लीन असतात. आत्मस्वभावरमणता हेच ध्येय त्यांचं.... त्यांचा आहार-विहार सारं काही या एकाच लक्ष्यावर केंद्रित असतं. आत्मिक आनंदयात्रेत विहार करणारे आनंदयात्री ते.... आहार घेतील तेही ध्यानमग्न होण्यासाठी आणि उपवास करतील, बाराही प्रकारची तपसाधना करतील ते आत्मसुखात रमण्यासाठीच....! सारे विकल्प त्यागून निर्विकल्प आत्मस्वरूपाचा अनुभव घेणारे समर्थ आत्मसाधक म्हणजे आचार्य परमेष्ठी.

विश्वातील संपूर्ण पदार्थांचं स्वरूप जिनवाणीच्या आधारे जाणून आपल्या सम्यग्दर्शनामध्ये कुठलेही दोष लागू न देणारे तत्त्वांचे पक्के श्रद्धानी, सम्यग्ज्ञानाच्या शुद्धतेने युक्त, बारा प्रकारच्या तपांचे निरतिचार पालन करणारे, संपूर्ण शक्ती सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्चारित्र्य पालनात लावणारे श्रेष्ठ भव्यात्मा असतात आचार्य. म्हणजेच दर्शनाचार, ज्ञानाचार, तपाचार, वीर्याचार, चारित्राचार या पंचाचारांचे कठोरतेने पालन करणारे व करवून घेणारे असतात आचार्य.

आचार्य अनशन, अवमौदर्य, रसपरित्याग, वृत्तिपरिसंख्यान, विविक्त शय्यासन, कायक्लेश हे सहा बाह्य तप तसेच प्रायश्चित्त, विनय, वैयावृत्य, स्वाध्याय, व्युत्सर्ग, ध्यान हे सहा अंतरंग तप अशा

एकूण बारा तपांत निरंतर उद्यमवंत असतात. वंदना, स्तुती, प्रतिक्रमण, सामायिक, स्वाध्याय व ध्यान या सहा आवश्यक क्रियांमध्ये सतत मग्न असतात. उत्तम क्षमा, मार्दव, आर्जव, शौच, सत्य, संयम, तप, त्याग, आकिंचन्य व ब्रह्मचर्य हे दशलक्षण धर्म जणू त्यांच्या आचरणातूनच प्रगटतात, मन-वचन-काय गुप्ती रूपी गुफेत सतत निवास करणारे सिंह म्हणजे आचार्य.....एकूण ३६ गुणांचे धारी असतात आचार्य परमेष्ठी!

एकूण पाच पंचाचार, बारा तप, सहा आवश्यके, दहा धर्म आणि तीन गुप्ती अशा एकूण ३६ गुणांचे मूर्तिमंत पिंड म्हणजे आचार्य. थंडी, वारा, उष्णता, डास कशा कशाने विचलित होत नाहीत ते...!'

'हो, हो, हो आजी, आम्ही बघितलं आहे ते. भर दुपारी बारा वाजता केवढी तापली होती जमीन! पण झपाझप पुढे चालणाऱ्या आचार्यांच्या चेहऱ्यावर शांततेची सावली होती. त्यांच्याकडे बघतच राहावंसं वाटत होतं. नजर बाजूला होत नव्हती....' संवेग म्हणाला.

'त्यांच्याकडे बघून मला खूप छान वाटतं होतं..' सक्षम बोलला.

'अगदी खरं आहे, सक्षम. खऱ्या सौंदर्याचे धारी ते.... मनोहर रूप आहे त्यांचे.. आत्मसाधना झळकते त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून.. जसे रूप तसेच त्यांचे वचनामृत!

श्री छहढाला या ग्रंथाच्या सहाव्या ढालेत पंडित दौलतरामजी म्हणतात,

**जग सुहितकर सब अहितहर श्रुती सुखद सब संशय हरै।**
**भ्रमरोग हर जिनके वचन मुखचंद्रतैं अमृत झरे।।**

वस्तुस्वरूपासंबंधी म्हणजे आपल्या स्वरूपासंबंधी विचारलेल्या कुठल्याही प्रश्नांचं तत्काळ उत्तर देण्यासाठी समर्थ असतात आचार्य.... एकांत म्हणजे खोट्या मान्यतांचं खंडन करून सत्य धर्माची स्थापना करण्यासाठी ते सामर्थ्यशाली असतात.

तुम्हाला ठाऊक आहे ना ! जिनसेन आचार्यांची प्रतिज्ञा?'

मुलांच्या चेहऱ्यावरील प्रश्नचिन्ह बघून शारदाकाकू पुढे बोलू लागल्या..

'मुलांनो, जिनसेन नावाचे श्रेष्ठ आचार्य होऊन गेले. त्यांची प्रतिज्ञा होती की शंभर लोकांना खऱ्या धर्माचे स्वरूप समजावून जोपर्यंत सत्य धर्मात स्थापित करत नाही तोपर्यंत आहार घेणार नाही....इतके पुरुषार्थी असतात आचार्य परमेष्ठी!

रत्नकरंड श्रावकाचार ग्रंथाचे रचयिता समंतभद्राचार्य गावोगावी दवंडी पिटवीत असत, शास्त्रार्थ करण्यासाठी. शास्त्रार्थ म्हणजे खऱ्या धर्माचे स्वरूप समजून घेण्यासाठी आयोजित करण्यात येणारी चर्चा. यात जो हरेल तो जिंकणाऱ्या शास्त्रार्थकाराच्या धर्माला स्वीकारेल असा नियम असतो!

'शास्त्रार्थाची इच्छा ठेवून मी सिंहासारखा सगळीकडे विहार करतो' अशा पद्धतीने समंतभद्राचार्यांनी स्वतःचा परिचय राजाला दिला. त्यांना कोणी विरोध करूच शकले नाही. कारण त्यांच्या अंतःकरणाची शुद्धता, चारित्र्याची निर्मळता आणि जिनवाणीचा महिमा!

वस्तू अनंत धर्मात्मक आहे आणि तिचं वर्णन अनेक अपेक्षांनी केलं जाऊ शकतं, याला म्हणतात स्याद्वाद. स्याद्वादशैली पक्षपाती नाही. वस्तूचं खरं स्वरूप समजावून सांगणारी आहे. आचार्य अशा पद्धतीने धर्म समजावून सांगून अनेकांना धर्मदान देतात.

आपण तर बघितलंच आहे की, कुंदकुंददेवांनी गणधरांना आचार्य म्हटलं. त्या गौतम गणधराचार्यांचा पुरुषार्थ अतुलनीय आहे. अन्य धर्माचे सर्वश्रेष्ठ साधू असूनही त्यांनी वस्तुस्वरूप समजावून सांगणाऱ्या जिनधर्माचा स्वीकार केला. ते महावीर स्वामींचे प्रथम गणधर झाले. त्यांच्याद्वारे धर्म प्रस्थापित झाला. त्यांनी द्वादशांगवाणीची रचना केली. त्यानिमित्ताने कितीतरी जीव मोक्षमार्गाकडे वळले. कित्येकांनी सम्यग्दर्शन प्रगट केलं. कितीतरी भव्य जीवांनी दीक्षा घेतली. मोक्षमार्ग प्रगट केला. ते

सारे जीव धन्य आहेत. त्याहीपेक्षा धन्य आहेत ते आचार्य भगवान जे स्वतःचं कल्याण करतात, त्याचबरोबर अनेक भव्य जीवांचं कल्याण करतात.'

'आजी, आपल्याला मिळेल का ग आचार्यांचं सान्निध्य?'

'खूप छान, संवेग ! आचार्यांची भक्ती, पूजा, वंदना, त्यांच्या निकट बसण्याचे परिणाम, त्यांच्याकडून धर्म समजून घेण्याचे परिणाम जीवाला तीर्थंकर नाम कर्माच्या बंधाचे कारण ठरतात. आचार्य भक्ती भावना ही सोळाकारण भावनांमधील अकरावी भावना आहे.

आचार्य मुख्य रूपाने साधू संघात राहणारे. संसारींच्या संपर्कात कमीच येतात ते....येतात ते केवळ आहार, विहार किंवा औषधीची आवश्यकता असल्यास. पण हो...धर्माचे जिज्ञासू दिसतील, तेवढ्या प्रमाणात धर्माप्रतिची रुची दिसली, तर करुणावान आचार्य अशा भव्य जीवांना वात्सल्याने धर्माचा उपदेश देतात.

परम पूजनीय कुंदकुंददेवांनी समयसार ग्रंथाची रचना केली. पहिली गाथा समजावून सांगताना टीकाकार अमृतचंद्रदेव लिहितात, 'अज्ञानीच्या मोहाचा नाश करण्यासाठी आचार्य परिभाषण करत आहेत' – म्हणजे आमच्यासारख्या अज्ञानींना आचार्यांनी उपदेश दिला आहे. केवढं वात्सल्य आमच्या प्रति आचार्यांचं!

याहून हे लक्षात येतं की जबाबदारी आमची आहे! आम्हाला पण बसावं लागेल त्यांच्या निकट जाऊन. आचार्यभक्तीची पहाट यावी लागेल या रूक्ष आयुष्यात. टकटकी लावून त्यांच्याकडे बघावं लागेल, कारण तेच आम्हाला समजावून सांगतील आमचं खरं रूप....आमच्यामध्ये धर्माची रुची जागवावी लागेल....आचार्य शुभ परिणामांमध्ये असतील तर आम्हाला नक्कीच धर्मोपदेश देतील...दिला आहे.

श्री रत्नकरण्ड श्रावकाचार या ग्रंथात श्रावकाचे आचरण समजावून सांगितले आहे. कर्मांची व्यवस्था तसेच जीवाच्या संसारी अवस्थेचं वर्णन आहे श्री गोमटसारच्या जीवकांड, कर्मकांड आदी शास्त्रांमधे. आत्म्याचं स्वरूप उलगडून दाखवलं आहे श्री पंचास्तिकायसंग्रह, श्री प्रवचनसार, श्री समयसार या शास्त्रांमध्ये.....

आम्हाला जवळीक साधावी लागेल आचार्यांशी अर्थात् त्यांच्या शास्त्रांशी. ज्यांना दीक्षा घेण्याची इच्छा आहे त्यांनी योग्यता अर्जित करून आचार्यांपर्यंत पोहोचावे. दीक्षा देण्याचा अधिकार केवळ आचार्यांचा होय. कारण ते इतर साधूंपेक्षा गुणांनी अधिक असतात. गुणांशिवाय आचार्य पद नव्हे...! अन्यथा धर्मतीर्थाचा लोप होईल. विपरीत मार्ग चालेल, स्वेच्छाचार वाढेल, अधर्म वाढेल.

संघातील बाल, वृद्ध, ग्लान साधूंच्या आचरणात दोष लागले असतील तर, आचार्यरूपी धर्मपित्यासमोर ते दोष प्रकट करतात. त्यांना प्रायश्चित्त विधीने शुद्ध करण्याचं कर्तृत्व आचार्य निभवतात....बघा धर्माचे रक्षक आहेत आचार्य!
आचार्यांच्या आठ गुणांचे वर्णन आपल्याला शास्त्रांमध्ये बघायला मिळतं.

आचारवान, आधारवान, व्यवहारवान, प्रकर्ता, अपायोपायविदर्शी, अवपीडक, अपरिस्रावी, निर्यापक असे आठ गुण आहेत.

१) आचारवान– जे पाच प्रकारचं आचरण अवलंबतात, त्यांना आचारवान म्हणतात. आचार्य दर्शनाचार, ज्ञानाचार, तपाचार, चारित्राचार, वीर्याचार या पंचाचाराचं निर्दोष पालन करतात आणि अन्य शिष्यांकडूनही आचरण करून घेतात. समजा आचार्यांमध्ये हा गुण नसेल तर शिष्य देखील शुद्ध आचरण करणार नाहीत म्हणून आचार्यांनी आचारवान असलेच पाहिजे.

२) आधारवान–आचार्यांचे मौखिक वचन असो अथवा लिखित साहित्य, त्याला चारही अनुयोगांचा आधार असावा. आचार्य शब्दविद्या, न्यायविद्या, सिद्धांतविद्या आदि विद्यांमध्ये निष्णात असावेत. प्रमाण, नय, निक्षेपाद्वारे आणि स्वानुभवानुसार ज्यांनी तत्त्वांचा निर्णय केला आहे ते आधारवान म्हटले जातात. असे आधारवान आचार्य

शिष्यांसाठी आधारस्तंभ होऊन उभे राहतात.

३) व्यवहारवान- आचार्यांना व्यवहार प्रायश्चित्त शास्त्राचे ज्ञान असावे. जो जीव आगमाचा ज्ञाता असतो, महाधैर्यवान आणि प्रबळ बुद्धीचा धारक असतो तोच प्रायश्चित्त देऊ शकतो. द्रव्य, क्षेत्र, काल, भाव, परिणाम, उत्साह, संहनन, दीक्षेचा काळ, शास्त्रज्ञान, पुरुषार्थ यांना समजून राग-द्वेष यांनी रहित होतो तोच योग्य प्रायश्चित्त देऊ शकतो. परत आचरणात दोष लागणार नाही आणि पूर्वी केलेले दोष दूर होतील अशा पद्धतीने शास्त्रानुकूल प्रायश्चित्त देण्याचे काम व्यवहारवान आचार्य करतात.

४) प्रकर्ता- आचार्य प्रकर्ता गुणांनी गुणवान असावेत. संघातील कोणी मुनी अशक्त झाले तर त्यांना उठवणं, बसवणं, झोपवणं, मलमूत्र, कफ-रक्त-पीप सारं शरीरापासून दूर करणे हे इतर साधू तर करतातच करतात, पण आचार्य देखील अशा पद्धतीने संघातील मुनींची वैयावृत्ती करत असतील तर इतर साधू विचार करतात... धन्य आहेत आमचे आचार्य परमेष्ठी ! आचार्य असूनही ते शिष्यांची सेवा करतात असा विचार करून व संपूर्ण संघ वैयावृत्त्यामध्ये उत्साहित होतो.

५) अपायोपायविदर्शी- कोणा साधूचे जर भूक, तहान किंवा वेदनेने अत्यंत संक्लेष, राग-द्वेषाचे परिणाम झालेत आणि लाजेस्तव गुरूसमोर आलोचना करू शकले नाही, धर्मामध्ये शिथिल झाले तर रत्नत्रयापासून ते मुनी ढळू शकतात म्हणून त्यावरचा उपाय आचार्य करतात. ते रत्नत्रयाचे रक्षण करण्यासाठी साधूंना असा उपदेश करतात, शिथिल आचाराचे असे दोष दाखवतात की, साधूंना आपला सर्वनाश, नरकादी कुगती रूपाने पतन साक्षात दिसू लागेल. असा उपदेश देण्याचे सामर्थ्य धारण करतात अपायोपायविदर्शी गुणधारी आचार्य.

६) अवपीडक- समजा कोणी मुनी रत्नत्रय धारण करूनही जर भीतीने, अभिमानाने किंवा लाजेखातर आपल्या चुका स्वीकार करत नसतील तर आचार्य अत्यंत प्रेमाने, गोड शब्दांनी त्यांना उपदेश देतात, धर्मपित्यासमान आपल्या गुरुंसमोर दोष प्रकट करण्यात कुठली लाज! मृदु शब्दांद्वारे जर साधूंचं शल्य निघत नसेल तर, आचार्य अत्यंत कठोर तीक्ष्ण वाग्बाणांद्वारे माया शल्याला काढतात. जे जीभेने गोड बोलतील पण शिष्यांचे दोष ना सोडवतील.... ते गुरुच कसले! अत्यंत कठोर शब्दांद्वारे ताडन करूनही शिष्यांना दोषांपासून मुक्त करतात ते आचार्य खरोखर वंदन-पूजन करण्यायोग्य आहेत.

७) अपरिस्रावी- शिष्य आपल्या दोषांची आलोचना गुरुंसमोर करतो, त्या दोषांची वाच्यता आचार्यांद्वारे बाहेर कधीच होत नाही. ज्याप्रमाणे तापलेल्या लोखंडावर पाण्याचे सपकारे मारले तर ते लोखंड पाणी पिऊन टाकतं, पाणी बाहेर येत नाही. त्याचप्रकारे शिष्यांकडून जे दोष आचार्यांना कळतात, ते इतर कोणाला कधीच सांगत नाहीत. हा आचार्यांचा अपरिस्रावी गुण आहे.

८) निर्यापक- ज्याप्रमाणे नावाडी साऱ्या संकटांना, बाधांना टाळत आपल्या नावेतील प्रवाशांना पैलतीरावर पोहोचवतो, त्याचप्रमाणे आचार्य आपल्या शिष्यांना अनेक प्रकारच्या दोषांपासून वाचवत संसार समुद्रातून पार करवतात. हा आचार्यांचा निर्यापक गुण होय.

अशाप्रकारे या आठ गुणांना धारण करणाऱ्या आचार्यांच्या प्रति मनात भक्तीचे भाव दाटून येणं ही आचार्य भक्ती आहे. खरं तर अशा आचार्यांचे दर्शनही महाभाग्याने होते. आचार्यांच्या गुणांचं स्मरण करून स्तुती करावी, वंदना करावी. त्यांचे सान्निध्य लाभावे अशी भावना भावावी. पुण्योदयाने लाभल्यास मनोभावे सेवा करून आपला मोक्षमार्ग प्रशस्त करावा.'

शारदाकाकूंच्या शब्दांनी आचार्यांच्या गुणांची प्रतिकृती जणू परिवारासमोर साकारली. संपूर्ण परिवाराने अत्यंत पुलकित मनाने आचार्य परमेष्ठींना मनोभावे वंदन केलं.

**आचार्य चरणांचे आश्रय घेई मन,**
**ज्ञानाचे मोती वेचत.. मागुती संसारी भव्यजन!**

( क्रमशः )

(शांत, सवडीने वाचा.) बोधकथा

# महत्त्वाचे काय...? जिंकणे की हरणे..?

जिंकणे आणि हरणे महत्त्वाचे नाही, एकमेकासोबत काम करणे महत्त्वाचे आहे!

ससा आणि कासवाच्या शर्यतीत ससा झोपून राहिल्याने हरला, कासव जिंकले. पण सशाला शांत बसवेना, आपल्यात वेगाने पळण्याची क्षमता अधिक असूनही निव्वळ झोपल्यामुळे आपण हरलो हे त्याच्या लक्षात आले. पराभवाची ही सल संपविण्यासाठी त्याने कासवापुढे पुन्हा शर्यतीचा प्रस्ताव ठेवला. विजयाच्या आनंदात आपण जिंकू शकतो, यावर विश्वास बसलेल्या कासवाने होकार भरला. शर्यत पुन्हा सुरू झाली.

यावेळी सशाने चूक केली नाही. तो थांबला नाही, झोपला नाही. परिणामी वेगवान ससा शर्यत जिंकला. हळू चालणारे कासव हरले. पण एकदा विजयाची चव चाखलेलं कासव हार पत्करायला तयार नव्हतं. कासव पुन्हा सशाकडे गेलं आणि म्हणालं, 'मी तुझं ऐकलं, आता तू माझे ऐक, आपण पुन्हा शर्यत लावू !' ससा हसला आणि म्हणाला, 'एकदा माझ्या चुकीमुळे हरलो. पुनःपुन्हा मी ती चूक कशी करेन ? पण तुझी हरण्याचीच इच्छा असेल तर लावू पुन्हा शर्यत !' सशाचा होकार मिळाला तसं कासव म्हणालं, 'पण यावेळी शर्यतीचा मार्ग मी ठरवणार !' स्वतःच्या वेगाची आणि कासवाच्या धिम्या गतीची खात्री असलेल्या सशाने त्यालाही होकार भरला.

शर्यतीचा मार्ग कासवाने ठरवला. शर्यत पुन्हा सुरू झाली. ससा चूक करणार नव्हता. तो वेगात पळत राहिला. कासव मागे राहिलं पण पळता पळता अचानक ससा थबकला. जागेवर थांबला. पुढे आडवी नदी वाहत होती. कासवाने बरोबर मार्ग काढला होता. सशाला पोहता येत नव्हतं. ससा तिथेच थांबून राहिला. हळूहळू येणारं कासव तिथे पोहोचलं. त्याने सशाकडे कुतुहलाने पाहिलं आणि नदीत उडी मारून पलीकडच्या काठावर पोहत पोहोचलही. शर्यत कासवाने जिंकली. सशाच्या वेगक्षमतेवर कासवाने स्वतःच्या बुद्धिक्षमतेने मात दिली.

हरलेला ससा विचार करत राहिला. आपल्याला पोहता येत नाही, म्हणून आपण हरलो, हे त्याच्या लक्षात आलं. तो विचार करून पुन्हा कासवाकडे गेला आणि म्हणाला, 'मित्रा, आपण आजपासून शर्यत नाही लावायची. आजपासून एक करायचं. जिथे जमीन असेल तिथे मी तुला पाठीवर घेईन, जिथे नदी आडवी येईल तिथे तू मला पाठीवर घे. दोघे मिळून आपण असे पुढे जात राहिलो तर सर्वात पुढे आपण दोघेच असू !'

प्रत्येकात साऱ्या गोष्टी अथवा गुण कधीच नसतात. मात्र प्रत्येकात काहींना काही गुण असतोच ! जे आपल्यात नाही ते इतरांकडे असू शकते. जे इतरांकडे नाही ते आपल्याकडे असू शकते. अशा एकमेकांच्या गुणांचा वापर करीत आपल्यातला उणेपणा भरून काढता येतो. सर्वोत्तम यश गाठता येतं.

एकमेकांना पराभूत करण्यात शक्ती खर्ची घालण्यापेक्षा एकमेकांच्या शक्तीच्या बळावर बलाढ्य काही करता येतं. वैयक्तिक मोठेपणाच्या अभिलाषेपायी निव्वळ दुसऱ्याच्या चुका काढण्यापेक्षा, त्यांच्यातील चुकांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यातील उत्तम गुण हेरून त्यांचा वापर करून घेणं, ही खरी यशस्वी क्रियाशीलता !

उपयोगी पडणारी माणसं मिळवणं आणि आपण कोणाच्या उपयोगी पडू शकतो ते पाहून त्याला मदत करणं या सहकार्यभावनेच्या जोरावरच मोठमोठी कार्ये सिद्धीस नेली जातात. काही लोकांकडे कल्पनाक्षमता असते, पण कल्पना सत्यात उत्तरावणारी कृतीक्षमता नसते. काहींकडे शक्ती असते, पण योग्य नियोजनक्षमता नसते. काहींकडे संघटनक्षमता असते, पण निर्णयक्षमता नसते. निर्णयक्षमता असते, तर नेतृत्वक्षमता नसते. अशावेळी ज्याच्याकडे जे आहे, त्याचा त्याच्या गुणांचा योग्य वापर करीत सांघिकपणे पुढे जाणे म्हणजेच बिकट रणांगणही जिंकणे!

(वाहते वारे.. प्रक्षेपक)

# भद्र - भारती



**महत्त्वाकांक्षा म्हणजे काय ?**

**दिव्य वस्तूच्या प्राप्तीची लालसा म्हणजेच महत्त्वाकांक्षा होय.** महत्त्वाकांक्षी मनुष्य जीवनातील प्रत्येक बाबतीत आदर्श प्रस्थापित करण्याचा चिकाटीने प्रयत्न करीत असतो. तो बोलेल कमी, परंतु करील अधिक.

अल्पज्ञानी आपल्या जवळील तुटपुंजा बुद्धिवैभवानेही गर्विष्ठ होऊन जगाला लागलीच दोन उपदेशाच्या गोष्टी सांगण्यास आतुर होतो. परंतु तो जसजसा अधिक जनसंपर्कात येतो तसतसा त्याच्या ज्ञानातील उथळपणा इतरांच्या निदर्शनास आल्याशिवाय रहात नाही. अशा उथळ पाण्याच्या खळखळाटाला लोकही तेवढीच किंमत देतात. महत्त्वाकांक्षी मनुष्य अशी क्रियाहीन वाचाळता व्यर्थ समजतो. व ज्या गोष्टीचे स्वत:कडून आचरण होत नाही ती गोष्ट दुसऱ्यास सांगण्याचे साहस करीत नाही.

समुद्र नि:शब्द असतो, पण त्याची अगाधता जग जाणीत असते. तद्वत् महत्त्वाकांक्षी पुरुष न बोलला तरी त्याच्या हृदयाची व विचारांची खोली इतरेजनांच्या लक्षात आल्याशिवाय रहात नाही.

**जीवनातील दिव्य नि भव्यत्वाची महत्त्वाकांक्षा मनुष्याला वर वर नेणारी असते. अज्ञानातून ज्ञानाकडे, अनीतीतून नीतिमत्तेकडे, असंयमातून संयमाकडे, अंधारातून प्रकाशाकडे, सामान्यातून असामान्याकडे व मानवतेतून महामानवतेकडे तिचा अखंड प्रवास असतो. ज्या क्षणी व ज्या ठिकाणी ती थांबते त्याक्षणी व तेथून मनुष्याचे अध:पतन सुरू झाले म्हणून समजावे.**

***************

**महत्त्वाकांक्षी पुरुषांचे पहिले कर्तव्य कोणते ?**

स्वत:चे मन आणि इंद्रिये ज्याच्या स्वाधीन राहील तोच कामक्रोधादी विकारापासून अलिप्त राहू शकेल आणि जीवनात शांती मिळवू शकेल.

देहाभिमानी मूढ मनुष्य प्रथम दुसऱ्याला सुधरविण्यास आतुर होतो; परंतु **विवेकी पुरुष सुविचारादी योग्य मार्गाने प्रथम स्वत:ला सुधारण्याचा प्रयत्न करतो. ज्याला जग सुधारण्याची खरी इच्छा व तळमळ आहे त्याने प्रथम स्वत:ला सुधारले पाहिजे.** कारण एका हिंदी कवीने म्हटले आहे. -

**रे सुधारक जगतकी चिंता मत कर यार ।**
**तेरे मनमें जग बसै, पहिले इसे सुधार ।।**

इंद्रियांच्या विषयभोगापासून केवळ अलिप्त राहिल्याने अगर त्यांचा संबंध - विच्छेद केल्याने आत्मशुद्धी होते असे नाही. ती केवळ सुरवात आहे, पहिली पायरी आहे. ज्यावेळेस कोणताही स्वार्थी दुर्विचार मूळातून नष्ट होईल त्यावेळेस आत्म्याची खरी शुद्धी झाली असे समजावयास पाहिजे. पापाचा अगर दुरभिमानाचा थोडाही अंश आत्मशुद्धीला विघातकच ठरतो. म्हणून जेवढ्या लवकर तो दूर करता येणे शक्य असेल तेवढ्या लवकर दूर करून आत्मसुधार करणे अत्यंत जरूर आहे. कोणताही महत्त्वाकांक्षी मनुष्य प्रथमत: हेच करील.

**- परम पूज्य गुरुदेवश्री समंतभद्र महाराज**

विशेष अतिथी संपादकीय...

# जैन दृश्य वारसा : चित्रकला, मूर्तीशास्त्र, वास्तुकला आणि हस्तलिखिते – एक चिंतन

**प्रा. गोमटेश्वर पाटील,** जयसिंगपूर
महावीर कॉलेज, कोल्हापूर

## १. प्रास्ताविक

शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, संभाजीनगर आणि गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिझम, कारंजा लाड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या दोन दिवसीय चर्चासत्रात जैन दृश्य वारशाच्या विविध पैलूंवर सखोल चिंतन करण्यात आले. चित्रकला, पुरातत्त्व, मूर्तीशास्त्र आणि वास्तुकला या क्षेत्रांतील जैन परंपरेचा समृद्ध वारसा उलगडणे हा या सत्राचा मुख्य उद्देश होता. प्रस्तुत लेखात या चर्चासत्रातील प्रमुख विचार आणि विवेचन एकत्रित करून जैन दृश्य वारशाचे महत्त्व, त्याच्या ऐतिहासिक विकासाचे टप्पे, प्रादेशिक वैविध्य आणि संवर्धनाची आवश्यकता यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

## २. जैन पट्टचित्रे आणि त्यांचे ऐतिहासिक महत्त्व

प्रज्ञाताईंनी आपल्या सादरीकरणात एका जैन पट्टचित्राचे सूक्ष्म विश्लेषण केले. हे पट्टचित्र केवळ एक कलाकृती नसून, जैन परंपरेचा एक महत्त्वाचा सांस्कृतिक वारसा आणि ऐवज आहे. विशेषतः भट्टारकांच्या पदग्रहण समारंभात अशा पट्टचित्रांचे हस्तांतरण केले जाते, जे त्या मठाचा किंवा परंपरेचा वारसा दर्शवते. कारंजा येथील केंद्राशी संबंधित एका पट्टाचा उल्लेख या संदर्भात करण्यात आला, ज्याचे विश्वस्त त्या मठाच्या समृद्ध वारशाचे जतन करत आहेत. या पट्टाचे पावित्र्य, सांस्कृतिक महत्त्व आणि जैन तात्त्विक पैलू यांचे जतन करणे अत्यंत आवश्यक आहे.

एका विशिष्ट पट्टचित्रातील इंद्र आणि इंद्रायणी यांच्या चित्रणावरील चर्चेतून दिगंबर परंपरेतील एका महत्त्वाच्या तात्त्विक भूमिकेवर प्रकाश टाकण्यात आला. तीर्थंकरांना अभिषेकासाठी पांडुकशिलेवर घेऊन जाताना इंद्राचे चित्रण केले असले तरी अंबारी मध्ये इंद्रायणीची अनुपस्थिती दाखविली आहे. याउलट, श्वेतांबर परंपरेत असे पट्टचित्र रंगवले असते, तर इंद्रासोबत इंद्रायणीचे रथात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे निरीक्षण जैन पंथांतील तात्त्विक फरकांवर दृश्य माध्यमांतून कसा प्रकाश पडतो हे दर्शवते. याच काळात महाराष्ट्रात पंचकल्याणक कथांचे पर्व दिसून येते, ज्यामध्ये महतिसागरांची पंचकल्याणक कथा उल्लेखनीय आहे. ही कथा आणि पट्टचित्रे यांच्यात साम्य दिसून येते, जिथे पट्टचित्र दृश्य स्वरूपात तर कथा लिखित स्वरूपात तीच परंपरा पुढे नेतात. हस्तलिखित ग्रंथांमधील चित्रशैली (उदा. फलटण येथील रविवार व्रत कथा) देखील या दृश्य वारशाचा एक भाग आहे.

## ३. जैन वास्तुकला आणि प्रादेशिक वैविध्य

डॉ. प्रणोती लाड यांनी दक्षिण भारतीय जैन संस्कृती आणि तिच्या वास्तुकलेवर महत्त्वपूर्ण विचार मांडले. त्यांनी कोल्हापूर भागातील मंदिरांवर केलेल्या संशोधनातून असे निदर्शनास आणले की, दक्षिण महाराष्ट्रातील जैन संस्कृती विदर्भातील संस्कृतीपेक्षा प्राचीन आहे आणि तेथील कला अधिक सौंदर्यवादी व कलात्मक आहे. याउलट, विदर्भात ही कला फारशी विस्तारलेली दिसली नाही. याचे कारण स्पष्ट करताना असे मत मांडले गेले की, दक्षिण महाराष्ट्रातील जैन संस्कृती मूळतः दक्षिण भारतातून (उदा. मूडबिद्री, कारकल) आदिलशाही

काळात स्थिरावली, तर विदर्भातील जैन समुदाय गुजरातकडून (उदा. बघेरवाल) आले.

या दोन्ही समुदायांच्या संस्कृतीत एक महत्त्वाचा फरक दिसून येतो : दक्षिणेकडील जैन हे कृषी संस्कृतीचे अनुयायी होते, ज्यांना कलात्मक मंदिरांच्या निर्मितीसाठी फारसा वेळ मिळत नव्हता. त्यामुळे त्यांची मंदिरे 'अनगड' म्हणजे मोठ्या दगडांनी रचलेली, साधी आणि ओबडधोबड स्वरूपाची दिसून येतात. याउलट, उत्तरेकडील आणि गुजरात-राजस्थानमधील जैन समुदाय आर्थिकदृष्ट्या अधिक समृद्ध असल्याने त्यांनी अत्यंत सूक्ष्म कलाकुसर असलेली आणि सुंदर मंदिरे उभारली. पांडव लेणीसारखी स्थळे या वास्तुकलेच्या विकासाचे टप्पे दर्शवतात.

**४. जैन संस्कृतीच्या विकासाचे टप्पे**

भारतात जैन संस्कृतीच्या विकासाचे तीन प्रमुख टप्पे दिसून येतात:

* शिलाहार काळ : आचार्य माघनंदी यांच्या नेतृत्वाखाली शिलाहारांच्या राजवटीत जैन संस्कृती अत्यंत उर्जित अवस्थेत होती.

* शिव काळ: या काळात दक्षिण भारतातून आलेले जैन समुदाय नद्यांच्या किनाऱ्यांवर स्थिरावले. अनेक गावांमध्ये जैन पाटील हे प्रमुख असत आणि नद्यांच्या खोऱ्यांमध्ये जैन संस्कृतीचा विकास झाला. अग्रगणी नदीच्या खोऱ्यातील प्राचीन जैन मंदिरे (उदा. ऐनापूर, कवठे कोगनोळी) याची साक्ष देतात, जी आता सिमेंटने झाकली गेली आहेत.

* चंदगड प्रदेश आणि शिलाहार शासक : कोल्हापूरचे शिलाहार, कोकणचे शिलाहार आणि उत्तर कोकणचे शिलाहार यांनी या काळात मोठ्या संख्येने मंदिरे उभारली. बेळगावपासून खारेपाटणपर्यंतच्या संरक्षित जंगलात एकेकाळी १०८ पाषाण मंदिरे होती असे मानले जाते.

कोकणातील देवघरात आजही 'जैनाचा टाक' (स्थानिक देवतांसोबत जैन प्रतीकांचे छोटे स्थान) आढळून येतो, जो स्थानिक संस्कृतीत जैन धर्माचे एकत्रीकरण दर्शवतो.

**५. जैन वास्तुकला आणि अज्ञात ज्ञानकोषकार**

जैन मंदिरांच्या संदर्भात एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मूर्तीभंजन झाल्यावर जैन समुदाय अनेकदा ती मंदिरे सोडून देत असत. कोल्हापूर-चंदगड भागातील अनेक मंदिरे भग्न मूर्तींमुळे परित्यक्त अवस्थेत आहेत, आणि तेथील लोक स्थलांतरित झाले आहेत. हा वारसा अत्यंत प्राचीन असून, जैन वास्तुशास्त्रावर १४व्या शतकातील श्वेतांबर आचार्य चंद्रांग ठाकूर फेरू यांनी 'वास्तुशास्त्र' हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात त्यांनी जैन वास्तू कशा असाव्यात याचे वर्णन केले असून, त्यासाठी त्यांनी २७ पूर्वकालीन जैन वास्तूंवरील ग्रंथांचा संदर्भ घेतला आहे, जे चौथे-पाचवे शतक इतके प्राचीन आहेत. या ग्रंथांतील नकाशे, परिभाषा, मोजमापे आणि शब्दार्थांचे आकलन करण्यासाठी प्राकृत भाषेचे ज्ञान व नवीन अभ्यास पद्धती आवश्यक आहेत, जे आजच्या संशोधनापुढील मोठे आव्हान आहे.

या संदर्भात, औरंगाबादचे अज्ञात नावाचे लेखक (मोतीचंद निरांजन गांधी) यांनी १९२०च्या दरम्यान लिहिलेल्या 'जैन ज्ञानकोश' आणि 'तीर्थवंदना' या ग्रंथांचा उल्लेख महत्त्वाचा आहे. पानशेत धरणफुटीत त्यांचा मूळ ज्ञानकोश वाहून गेला असला तरी त्यांनी तो पुन्हा लिहिला आणि त्याचे चार खंड प्रकाशित झाले आहेत. 'तीर्थवंदना' या ग्रंथात देशभरातील प्राचीन जैन मंदिरांचा (उदा. अंजनेर येथील १२८ मंदिरे) उल्लेख असून, तो भविष्यातील अभ्यासकांसाठी एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे.

**६. जैन मूर्तीशास्त्र आणि चित्रकलेचा उदय**

जैन मूर्तीशास्त्राचा अभ्यास सिंधू संस्कृतीतील नग्न मूर्तींपासून सुरू होतो, त्यानंतर महावीरांच्या काळापर्यंत तो लुप्त झाल्याचे दिसते. जैन शिल्पांचा अभ्यास करताना आपल्याला गुहा आणि गुंफा मंदिरांकडे वळावे लागते. खारवेलसारख्या शासकांनी कोरलेल्या गुंफा (उदा. ओरिसातील गुंफा) आणि कंकाली टीला येथील

पाषाणात कोरलेली शिल्पे ही सुरुवातीच्या मूर्तीशास्त्राची उदाहरणे आहेत. महावीरांच्या काळात जैन मुनी जंगलवासी होते, नंतर गुहावासी झाले. या गुंफातूनच मंदिर आणि मूर्तीशास्त्राची सुरुवात झाली असावी असे अनुमान काढता येते. इसवी सनाच्या तिसऱ्या-चौथ्या शतकापासून या गुंफांचे उल्लेख मिळतात. भारतात सुमारे १२०० प्राचीन गुंफा असून, त्यापैकी २०० जैन संस्कृतीशी संबंधित आहेत. जैन वास्तुकला आणि मंदिरांचा खरा विकास कर्नाटकात, विशेषतः ऐहोळे येथील पाचव्या-सहाव्या शतकातील गुंफातून झाला, जिथे शिल्पकलेचा समृद्ध वारसा दिसून येतो.

चित्रकलेचा उदय गुंफा आणि मंदिरांच्या मजबुतीकरणासाठी वापरल्या जाणाऱ्या 'वज्रलेप' तंत्रातून झाला असावा. वज्रलेपामध्ये अनेक वनस्पतींचे चूर्ण, डिंक आणि अर्क यांचा वापर केला जाई. जैन चित्रशैलीमध्ये २४ तीर्थंकर, त्यांच्या शासन-देवता, तीर्थंकरांचे लांछन, सोळा विद्यादेवी, दशदिग्पाल, नऊ ग्रह, क्षेत्रपाल आणि ६३ शलाका पुरुष (दिगंबर परंपरा) किंवा ५४ शलाका पुरुष (श्वेतांबर परंपरा) यांचे चित्रण आढळते. हीच हजारो वर्षांपासूनची त्यांची चित्रकला आणि शिल्पशैली आहे. पंधराव्या शतकानंतरच्या मध्ययुगीन काळात कथाचित्रे आणि व्रत कथांची शैली विकसित झाली. मुक्तागिरी येथील नथ्थुसा पासुसा(कळमकर) यांनी लिहिलेल्या ३७५ व्रत कथांचे चित्रमय सादरीकरण या काळात झाले. जैन धर्माचे 'वैदिकीकरण' थांबवण्यासाठी आणि सामान्य लोकांमध्ये व्रत-वैकल्यांचे महत्त्व रुजवण्यासाठी हा प्रयत्न होता (उदा. जैन सत्यनारायणाची कथा).

### ७. शासन-देवता : श्रद्धा आणि भक्तीचे प्रतीक

जैन शिल्प आणि चित्रकलेत शासन-देवतांचे स्थान आणि त्यांचे आगमन हा एक महत्त्वाचा चर्चेचा विषय आहे. महावीरांनंतरच्या पहिल्या चार-पाचशे वर्षांत जैन साहित्य हे मुख्यतः तात्विक ग्रंथांवर आधारित होते. परंतु नंतरच्या काळात, विशेषतः राजाश्रय मिळाल्यावर, 'श्रद्धा-देवतां'ची परंपरा सुरू झाली. मानवी जीवनात श्रद्धा आणि भक्ती हे कायमचे घटक आहेत. या श्रद्धांच्या वलयातूनच शासन-देवतांच्या प्रतिमा निर्माण झाल्या, ज्यांचे युग साधारणतः चौथ्या ते सहाव्या शतकात उदयास आले. कदंब राजांच्या आश्रयाने अंबिका देवीची आणि नंतर पद्मावती देवीची श्रद्धा लोकप्रिय झाली. तीर्थंकरांचे रक्षण करणाऱ्या या देवता आपलेही रक्षण करतात ही भाबडी श्रद्धा आजही लोकांमध्ये आहे आणि यातूनच शासन-देवतांचा मोठ्या प्रमाणावर उदय झाला.

या श्रद्धांचा प्रभाव केवळ सामान्य लोकांवरच नव्हे, तर जिनभद्र गणी, हरिभद्र सूरी, जिनसेन, पुष्पदंत, अकलंक (ज्यांना बौद्ध विरोधासाठी अंबिका देवीने सहयोग केले.), सोमदेवसूरी आणि रविकीर्ती यांसारख्या विद्वानांवरही दिसून येतो. त्यांनी आपल्या ग्रंथांमध्ये या देवी-देवतांचा उल्लेख करून त्यांचे महत्त्व अधोरेखित केले. मध्ययुगीन काळात, विशेषतः भट्टारक परंपरेनंतरच्या साहित्यात पद्मावतीवर विपुल लेखन झाले आहे (उदा. पद्मावती सहस्रनाम, स्तोत्रे). या शासन-देवतांचा प्रभाव शिल्प आणि चित्रांमध्ये स्पष्टपणे दिसून येतो.

### ८. दक्षिण भारतातील जैन प्रभावाची पहाट आणि संस्थात्मक विकास

भद्रबाहू आणि चंद्रगुप्त मौर्य यांच्या दक्षिणेकडील स्थलांतरामुळे दक्षिण भारतात जैन प्रभावाची पहाट झाली. कदंब, चालुक्य आणि राष्ट्रकूट या राजवटींवर जैन धर्माचे मोठे वर्चस्व दिसून येते. जैन आचार्यांनी या साम्राज्यांना दृढ करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली; ते त्यांचे राजकीय सल्लागार होते (उदा. रविकीर्ती). जंगलवासी परंपरेतून जैन समुदाय हळूहळू मूर्तीपूजक आणि शासन-देवतांचे पूजक बनत गेले. दुसऱ्या शतकात अर्हद्बली यांच्यापासून निर्माण झालेले सेनगण, देवगण, सिंहगण, नंदीगण यांसारखे उपसंप्रदाय देशाच्या विविध भागांत विस्तारले आणि त्यांनी जैन स्थापत्य, वास्तू आणि मूर्तींचा विकास केला.

सहाव्या-सातव्या शतकात हा विस्तार उच्च शिखरावर पोहोचला. कदंब राजांच्या काळात विटांची मंदिरे, चुना आणि लाकडांच्या प्रार्थनागृहांची निर्मिती झाली.

जैन परंपरेतील 'श्रद्धे'ची संकल्पना नंतर दक्षिण भारतातील आळवार संतांनी सुरू केलेल्या 'भक्ती संप्रदाया'ने प्रभावित केली. या भक्ती संप्रदायाच्या प्रभावामुळे जैन संस्कृती काही प्रमाणात मागे पडली (उदा. शंकराचार्यांचे हल्ले). तथापि, जैन आचार्यांनी जिनशाळांची निर्मिती करून जिनशासन लोकप्रिय करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये प्रार्थना मंदिरे, अन्नदान केंद्रे, चिकित्सालये, आश्रयस्थाने आणि शिक्षण केंद्रे यांचा समावेश होता, ज्यातून जैन वास्तू आणि शिल्पकलेचा उदय व विकास झाला. पाचव्या शतकापासून मंदिरांजवळ मठांची निर्मिती झाली, जिथे ग्रंथलेखनाला सुरुवात झाली.

**९. हस्तलिखित वारसा : एक सद्यःकालीन आव्हान**

जैन दृश्य वारशाचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे हस्तलिखितांचा समृद्ध वारसा. ही हस्तलिखिते भारताची स्मरणपत्रे असून, प्राचीन भारतीय ज्ञान प्रणालीचा (Indian Knowledge System) अमूल्य ठेवा आहेत. आजचा काळ हा हस्तलिखितांच्या ऱ्हासाचा काळ आहे. १००-२०० वर्षांपूर्वी हस्तलिखिते लिहिली जात होती. मुद्रण कला आल्यानंतर, सुरुवातीला जैन समुदायाने पाप-पुण्याच्या संकल्पनांमुळे तिला विरोध केला. इतर ठिकाणी मुद्रण कला सुरू होऊन ५०-१०० वर्षे झाली तरी जैनांमध्ये हस्तलिखिते नकलण्याचे काम दीर्घकाळ सुरू होते. काही घराणी तर विशेषतः हस्तलिखिते लिहिण्याचे काम करत होती (उदा. नाना रामचंद्र नाग). अनेक हस्तलिखितांमध्ये 'गणेशाय नमः' असे आढळते, कारण अनेकदा ब्राह्मण मंडळी ही लेखन करत असत.

या हस्तलिखितांचे आयुष्य आता संपत आले आहे; सर्वात जुनी हस्तलिखिते ५०० वर्षांपर्यंतची (उदा. मूडबिद्री येथील ताडपत्रांवरील हस्तलिखिते) आहेत. त्यांचे संवर्धन, पुनर्नकल आणि डिजिटायझेशन करणे अत्यंत आवश्यक आहे. कर्नाटक आणि तामिळनाडूने १०० वर्षांपूर्वीच हे काम सुरू केले आहे (उदा. तंजावर येथील सरस्वती महाल). महाराष्ट्रात हे काम उशिरा सुरू झाले आहे, परंतु बाहुबली येथील अनेकांत शोधपीठनतंर कारंजा येथील श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकुल) द्वारा संचालित गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिझम यांच्या वतीने या दिशेने महत्त्वाचे कार्य सुरू आहे. कोबासारख्या ठिकाणी अडीच लाख हस्तलिखिते एका क्लिकवर अभ्यासकांसाठी उपलब्ध आहेत. बाहुबली व कारंजामधूनही अशा प्रकारे हस्तलिखिते अभ्यासकांसाठी खुली व्हावीत अशी अपेक्षा आहे.

जैन साहित्य अनेक विद्यापीठांमध्ये दुर्लक्षित राहिले आहे, तर वारकरी आणि महानुभाव साहित्याचा अभ्यासक्रमात समावेश आहे. परंतु मराठीतील जैन साहित्य संख्येने जास्त असून, ते लोकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. मराठी भाषेचा शोध घेताना जैन परंपरेकडेच यावे लागते, कारण धनपाल, कनकामर, पुष्पदंत यांसारखे अपभ्रंश भाषेतील कवी हे मराठीतील प्राचीन कवी आहेत.

**१०. समारोप**

जैन दृश्य वारसा, मग तो पट्टचित्रांच्या स्वरूपात असो, वास्तुकलेत असो, मूर्तीशास्त्रात असो किंवा हस्तलिखितांमध्ये असो, तो भारताच्या सांस्कृतिक आणि तात्त्विक इतिहासाचा एक अविभाज्य भाग आहे. या वारशाचे जतन आणि संवर्धन हे केवळ जैन समुदायाचेच नव्हे, तर संपूर्ण समाजाचे कर्तव्य आहे. या हस्तलिखित वारशाचे डिजिटायझेशन आणि ते अभ्यासकांसाठी खुले करणे ही काळाची गरज आहे. बाहुबली व कारंजासारख्या संस्थांनी या कार्यात पुढाकार घेऊन महाराष्ट्रातील सर्व जैन हस्तलिखितांच्या संवर्धनासाठी एक धोरणात्मक केंद्र म्हणून कार्य करावे, अशी अपेक्षा आहे. यातून जैन ज्ञान परंपरा अखंडित राहील आणि तिचा अभ्यास अधिक सुलभ होईल.

# जैन दृश्य वारसा- चित्रे, पुरातत्व व मूर्तिशास्त्र या सेमिनारविषयी....

## १) भूमिका व ऋणनिर्देश

**– प्रा. कीर्तीकुमार भोरे, कारंजा-लाड**

परमपूज्य गुरुदेव समंतभद्र महाराजांनी आत्मसाधनेसोबतच समाजाला दिशा देण्याचे महत्त्वाचे कार्य केले. गुरुदेवांच्या पश्चातही त्यांनी आपल्या हातात दिलेली ही गुरुकुल रूपी ज्ञानज्योत समाजाला सन्मार्ग प्रकाशमान करण्यास कायम मदत करत राहील. यासाठीच गुरुदेवांनी आपल्या स्वाधीन केलेली ही ज्ञानज्योत तेवत ठेवण्याची आपली व समाजाची जबाबदारी आहे, त्यातच खऱ्या कल्याणाचा मार्ग प्रकाशित करण्याची क्षमता आहे.

याचाच एक भाग म्हणून, श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकुल), कारंजा-लाड संस्थेच्या शतकपूर्ती-निमित्त गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिझमचा संकल्प पूर्णत्वास नेऊन कार्यास सुरुवात झालेली आहे. पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने पुणे येथे संपन्न झालेली जैन फिलॉसॉफी अँड मॉडर्न सायन्स सेमिनार, स्व. पं. धन्यकुमारजी भोरे तथा स्व. डॉ. पद्मनाभजी जैनी या गुरुकुल स्नातकांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या गौरवार्थ सेमिनार, डॉ. विद्याधरजी जोहरापूरकर यांच्या सन्मानार्थ त्यांच्या उपस्थितीत 'भट्टारक परंपरा' या विषयावर झालेले सेमिनार आणि छ.संभाजीनगरमध्ये नुकतेच पार पडलेले 'जैन दृश्य वारसा' या विषयावरील सेमिनार यासारखे अनेक अकॅडमिक व माहितीपूर्ण कार्यक्रम सेंटरद्वारे आयोजित होत आहेत. समाजातील जिज्ञासू व्यक्ती, अभ्यासक आणि अकॅडमिक क्षेत्रातील मान्यवर अशा सर्वांनीच या उपक्रमांना उत्तम प्रतिसाद दिला आहे.

सूचित करताना प्रसन्नता वाटते की, सिद्धांताचार्य पं. फूलचंदजी शास्त्री यांच्या १२५व्या जयंती निमित्त फेब्रुवारी २०२६मध्ये वाराणसी येथे आयोजित जैन दर्शनातील विविध विषयांवर आधारित सेमिनारमध्ये सेंटरचा संयुक्त सहभाग असणार आहे.

आज या सेंटरमध्ये समृद्ध संदर्भ ग्रंथालय व संशोधनाच्या सुविधा उपलब्ध आहेत. सेंटरमध्ये प्राचीन हस्तलिखित ग्रंथांचे संवर्धन,संरक्षण व संगणकीकरण हे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत व अनेक ग्रंथांवर या प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत.

Training Programmes for Teachers, Soft Skill Development Programmes for Students इ. अनेक उपक्रम गतिमान आहेत.

दि.२४-२५ जुलै २०२५ ला शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय (छ. संभाजीनगर) यांच्या सहयोगाने छ.संभाजीनगर येथे संपन्न झालेल्या 'जैन दृश्य वारसा' या सेमिनारसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. थोरात व इतिहास विभाग प्रमुख प्रा. रूपेश मडकर यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. सेमिनारच्या व्यापक प्रसिद्धीसाठी तसेच आयोजनातील इतर अनेक जबाबदाऱ्यांसाठी स्थानिक जैन कार्यकर्त्यांनी अतिशय मोलाचे योगदान दिले आहे. मी या सर्वांना मनापासून धन्यवाद देऊ इच्छितो.

'सन्मति' मासिकाच्या माध्यमातून गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिझमच्या विविध उपक्रमांची माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत नेहमीच पोहोचत असते. त्यासाठी मी मासिक सन्मतिचे मुख्य संपादक डॉ. नेमिनाथ बाळीकाई शास्त्री व विश्वस्त समितीचा ऋणी आहे. 'जैन दृश्य वारसा' या सेमिनारवर आधारित या विशेष अंकाला हार्दिक शुभेच्छा!

# जैन दृश्य वारसा- चित्रे, पुरातत्त्व व मूर्तिशास्त्र या सेमिनारविषयी....

## २) भूमिका




**प्रा. रुपेश मडकर,**
इतिहास विभाग,
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,
छ. संभाजीनगर.


भारतीय परंपरेत ग्रंथांना जे स्थान आहे, तसेच अथवा त्याहूनही अधिक महत्त्वाचे स्थान दृश्य कलेला लाभलेले आहे. भारतीय संस्कृतीच्या उगमापासूनच रंग आणि रेषा यांचे एक अतूट नाते दृश्य परंपरेत कायम असलेले आपल्याला दिसते. याची सुरुवात अगदी अश्मयुगीन काळापासून, म्हणजे सुमारे ५०,००० वर्षांपूर्वी भीमबेटका येथे रंगवलेल्या चित्रांपासून होते. यानंतर हडप्पाकालीन मुद्रा, मातीच्या भांड्यांवरील चित्रे आणि भौमितिक आकृत्या यातूनही या दृश्यकलेची समृद्ध परंपरा पुढे सरकली.

पुढे विविध धर्मांनी चित्रकला, शिल्पकला आणि स्थापत्यकला यांना आपल्या धार्मिक विचारांचे प्रभावी वाहक म्हणून आश्रय दिला. यात गांधार कलेतील बुद्ध मूर्ती, मथुरा कलेतील जैन मूर्ती, अजिंठा येथील अप्रतिम चित्रे, तसेच बाघ आणि वेरूळ येथील जैन चित्रे यांचा समावेश होतो. या व्यापक परंपरेत जैन दृश्य कलेची उपस्थिती अत्यंत ठसठशीत आणि लक्षणीय राहिलेली आहे.

जैन दृश्य कलेचा वारसा हा इसवी सनपूर्व पहिल्या शतकातील मथुरा येथील कंकाळी टीला येथील स्तूपापासून ते मध्ययुगीन अबू दिलवाडा मंदिरापर्यंत, दक्षिणेकडील लेण्यांपासून उत्तरेकडील मंदिरांपर्यंत पसरलेला आहे. शिल्प, मूर्ती, चित्रकला या सर्व कला प्रकारांमध्ये जैन दृश्य कलेने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. विशेषतः मध्ययुगातील जैन लघुचित्रकला तर खूप मोठी आणि वैविध्यपूर्ण आहे, जिने भारतीय कला इतिहासात स्वतःचा असा ठसा उमटवला आहे.

दुर्दैवाने, भारतीय कलेचा समग्र विचार करताना या समृद्ध जैन दृश्य परंपरेवर फारशी चर्चा होताना दिसत नाही. या योगदानाला योग्य प्रकारे अधोरेखित करणे आणि त्यावर सखोल चर्चा होणे अत्यंत गरजेचे आहे, अशी या दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या आयोजनामागील प्रमुख भूमिका आहे. जैन दृश्य कला ही भारतीय कलेपासून वेगळी नाही, ती भारतीय कलेचा अविभाज्य भाग आहे. तरीही, तिची वेगळी आणि सविस्तर चर्चा होणे आवश्यक वाटते, कारण बऱ्याच लोकांना या योगदानाची माहिती नसते. त्यातील बारकावे, वेगळेपण आणि साधर्म्य यावर प्रकाश टाकणे गरजेचे आहे.

उदाहरणार्थ, इंद्र ही व्यक्तिरेखा भारतातील प्राचीन असलेल्या सर्वच धर्मांमध्ये दिसते. परंतु जैन दृश्य कलेत या इंद्राचे प्रक्षेपण वेगळ्या पद्धतीने होते, त्याची भूमिका वेगळी असते. अशा अनेक बारकाव्यांमुळे जैन दृश्य कलेची सविस्तर चर्चा होणे गरजेचे आहे. या परिषदेच्या माध्यमातून जैन दृश्य वारशाचे विविध पैलू अभ्यासकांसमोर आणणे, त्याचे महत्त्व अधोरेखित करणे आणि या विषयावर नवीन संशोधनाला चालना देणे हाच या आयोजनामागील मुख्य उद्देशआहे.

*****

# विदर्भातील दिगंबर जैन भांडारातील सचित्र पोथ्या व चित्र : एक कला ऐतिहासिक दृष्टिकोन

**प्रा. डॉ. मनीषा प्र. पाटील,** सेवानिवृत्त प्राध्यापिका,
कला इतिहास, सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई

**डॉ. मनीषा पाटील –परिचय**

या ख्यातनाम कला इतिहासतज्ज्ञ, चित्रकार असून त्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स (मुंबई) येथील सेवानिवृत्त प्रोफेसर (History of Art) आहेत. चित्रकलेशी संबंधित India Magzine, Art News and Views, Art Journal इत्यादी नियतकालिकांमधून त्यांचे साहित्य नियमित प्रकाशित होत असते. अनेक परिषदांमधून त्यांनी शोधनिबंध सादर केले आहेत. Encyclopedia of Visual Art of Maharashtra या कोशाच्या संपादन मंडळाच्या त्या सदस्य आहेत. Vinayak Masoji - Santiniketan and beyond आणि Rethinking the regional-Mapping the Art of Maharashtra या दोन प्रकल्पांच्या त्या curater होत्या. मुंबई, नवी दिल्ली, कोलकाता व चेन्नई या ठिकाणी त्यांची अनेक चित्रप्रदर्शने आयोजित झाली आहेत.

भारतात लघुचित्रांची एक अतिशय मोठी आणि जुनी परंपरा आहे, ज्यात जैन, बौद्ध, हिंदू आणि मोगल लघुचित्रांचा समावेश होतो. जैन सचित्र पोथ्यांपैकी सर्वात जुने ओघनिर्युक्ती (इ.स. १०६०) आणि षट्खंडागम (इ.स. ११००) हे ताडपत्रीवर अंकित ग्रंथ आहेत. सुमारे १४व्या शतकापासून ते १८व्या शतकापर्यंत श्वेतांबर व दिगंबर जैन या दोन्ही पंथांसाठी अनेक सचित्र पोथ्यांची निर्मिती झाली. त्यात कल्पसूत्र, कालकाचार्यकथा, आदिपुराण इत्यादी महत्त्वाच्या आहेत. प्रस्तुत लेख विदर्भातील दिगंबर जैन मंदिरांच्या शास्त्र भांडारामध्ये जतन केलेल्या सचित्र पोथ्या आणि चित्रांच्या कला ऐतिहासिक अभ्यासावर प्रकाश टाकतो. या पोथ्या जरी भारतीय जैन चित्रकलेचा एक लहान भाग असल्या तरी विदर्भाच्या सांस्कृतिक आणि धार्मिक इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

मध्यभारत व दख्खन पठारात जैन धर्म फार प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याचे पुरावे सापडतात. अकोला नजीक राजणापूर खिंकिणी येथे उत्खननात आढळलेल्या काही ब्राँझ (कास्य) धातूच्या मूर्ती याची साक्ष आहेत. शिरपूरचे मंदिर व गाभाऱ्यातली पार्श्वनाथाची प्रतिमाही प्राचीन आहे. मात्र, खऱ्या अर्थाने दिगंबर जैन समाजाची या भागात मोठ्या प्रमाणावर वाढ सोळाव्या शतकानंतर झाली. राजस्थान व गुजरातहून अनेक जैन कुटुंबे विदर्भ, मराठवाडा, व माळवा प्रांतात स्थलांतरित झाली. या स्थलांतरित कुटुंबापैकी काही दक्षिणेकडे कर्नाटकापर्यंतही पोहोचली. या कुटुंबाचा प्रमुख उद्देश व्यापार करणे हा होता. त्यांनी शेतजमिनी विकत घेतल्या आणि या नवीन परिसरात ते स्थायिक झाले. बघेरवाळ, सेतवाळ, परवार यांसारख्या विविध जैन समुदायाचे लोक यात होते. राजस्थान किंवा गुजरातपासून शेकडो मैल दूर असूनही या जैन कुटुंबांनी त्यांच्या मूळ गावाशी आणि तीर्थक्षेत्रांशी असलेले संबंध जपले. तीर्थयात्रांच्या निमित्ताने त्यांचे येणे-जाणे सुरूच राहिले, ज्यामुळे सांस्कृतिक आणि धार्मिक देवाणघेवाण अखंडित राहिली.

## भट्टारक संप्रदायाची भूमिका

जैन धर्माच्या धार्मिक व सामाजिक जडण-घडणीत भट्टारक संप्रदायाची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. भट्टारक हे मूलतः जैन मुनी होते, परंतु नंतर ते पीठांचे (धार्मिक केंद्राचे) संस्थापक बनले. डॉ. विद्याधर जोहरापूरकर यांनी त्यांच्या 'भट्टारक संप्रदाय' या मौलिक ग्रंथात भट्टारकांच्या संरचनेबद्दल सविस्तरपणे लिहिले आहे. नवव्या

शतकाच्या सुमारास भट्टारक संप्रदायाचा उदय झाला. पूर्वीच्या जैन मुनींचे जीवन साधे व काटेकोर होते, परंतु त्यात बदल झाले व नियमांना शिथिल करण्यात आले. बाराव्या शतकापासून हे बदल अधिक जाणवू लागले आणि तेराव्या शतकात भट्टारकांनी नग्नता त्यागून वस्त्रे परिधान करण्यास सुरुवात केली. त्यांनी स्वतःला 'राजगुरु' मानले आणि अनेक ठिकाणी पीठांची स्थापना केली. एकूण सुमारे २० पीठे ज्ञात आहेत, ज्यात ईडर, सोजित्रा, सुरत (गुजरात), जयपूर, नागौर (राजस्थान), दिल्ली, ग्वाल्हेर (मध्य भारत), धार सागवारा (माळवा), लातूर, कोल्हापूर, कारंजा (महाराष्ट्र), मलयखेड, मूळबिद्री, हुंबच, कारकल आणि श्रवणबेळगोळ (दक्षिण भारत) यांचा समावेश आहे.

भट्टारक हे पीठांचे प्रमुख बनले आणि त्यांच्या हातात धार्मिक तसेच प्रशासकीय सत्ता आली. त्यांनी श्रावकांकडून मोठ्या प्रमाणात देणग्या स्वीकारल्या, ज्यांचा उपयोग मंदिर बांधकामात आणि मूर्ती प्रतिष्ठापनेसाठी केला. भट्टारकांद्वारे जमिनीच्या देणग्याही स्वीकारल्या जात असत. श्रावकांसाठी शत्रुंजय, सम्मेदशिखर, श्रवणबेळगोळ यांसारख्या तीर्थक्षेत्रांच्या यात्रांचे नियोजन ते करत. भट्टारक स्वतः बराच प्रवास करत. विशेषतः चातुर्मासात ते एका ठिकाणी निवास करत आणि आपल्या पीठासाठी कार्य करत. भट्टारकांचे कार्य केवळ धार्मिक नव्हते तर, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातही ते सक्रिय होते. त्यांच्या यात्रांमुळे आणि संपर्कामुळे विविध क्षेत्रातील कला व हस्तकलांना प्रोत्साहन मिळाले. भट्टारकांवर आधारित चित्रेही उपलब्ध आहेत, जसे की श्रवणबेळगोळ येथील मठातील मिरवणुकीचे चित्रण.

**शास्त्रदानाला महत्त्व**

जैन धर्मामध्ये शास्त्रदानाला विशेष महत्त्व दिले जाते, कारण ते एक पुण्याचे कार्य मानले जाते. त्यामुळे विविध विषयांवरील लेखनाला प्रोत्साहन मिळाले. तत्त्वज्ञानापासून ते विविध पुराणांपर्यंत अनेक ग्रंथांचे अंकन झाले. संस्कृत, प्राकृत, कन्नड, गुजराती, मराठी अशा विभिन्न भाषांमधील ग्रंथ मंदिरांच्या शास्त्र भांडारांमध्ये जतन करण्यात आले. हे ग्रंथ आजही उपलब्ध आहेत. काही भट्टारक स्वतः लेखन कार्य करत, तर त्यांचे शिष्यही ग्रंथ लिहीत. उदाहरणार्थ, भट्टारक देवेंद्रकिर्ती यांचे शिष्य जिनसागर यांनी सुगंधदशमी कथा लिहिली, तर धर्मचंद्र भट्टारक यांचे शिष्य गंगादास यांनी आदित्यवार व्रत कथा लिहिली.

**विदर्भातील सचित्र पोथ्या**

पोथ्यांची संख्या जरी मोठी असली तरी विदर्भात सचित्र पोथ्या (illustrated manuscrpits) मोजक्या आहेत. त्यातील बहुतांश पोथ्या कारंजा येथील मंदिरांमध्ये, तर काही नागपूरला आहेत. या पोथ्या शैलीच्या दृष्टीने गुजरात व राजस्थानमधील पोथ्यांशी काही अंशी मिळत्या जुळत्या असल्या तरी त्यात अनेक वैशिष्ट्यपूर्ण भिन्नता आढळतात. पश्चिम भारतीय शैलीतील (गुजरात व राजस्थान) लघुचित्रांमध्ये प्रोफाईल चेहरा असलेल्या मानवाकृतीतील एक डोळा योग्य पद्धतीने दर्शवून दुसराही डोळा नाकाच्या रेषेत पण बाहेर आलेला दाखवण्याची पद्धत आहे ('Protruding eye'). कल्पसूत्र, कालकाचार्य कथा तसेच आदिपुराणातील काही सचित्र पोथ्यांमध्ये हे वैशिष्ट्य ठळकपणे दिसते. मात्र, नंतरच्या काळातल्या चित्रात तसा डोळा दिसत नाही आणि विदर्भातील पोथ्यांमध्येही हा प्रकार आढळत नाही.

**यशोधर चरित्र**

यशोधर चरित्राची एक पोथी कारंजा येथील बालात्कार मंदिरात असून ती अत्यंत सुरक्षित स्थितीत आहे. मूलतः नवव्या शतकात लिहिलेल्या या कथेवर अनेक भट्टारकांनी नंतर संस्कार केले, ज्यामुळे मूळ कथानकात काही बदलही झाले. या पोथीतील कॅलोफोन असलेले पान अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण ते ऐतिहासिक माहिती पुरवते. यानुसार ही पोथी इसवी सन १६३६मध्ये ईडर येथे लिहिली गेली असून लेखनकाराचे नाव गोविंददास आणि

चित्रकाराचे नाव नानजी चितारा असे आहे. एकूण ६७ पानांपैकी ३३ पानांवर चित्रे आहेत. या पोथीमध्ये ईडरचे नाव, भट्टारकांची नामावली, गच्छ व संघ याबद्दलची माहिती मिळते, जी कला इतिहासकारांसाठी आणि इतिहासकारांसाठी काळाचा आणि स्थळांचा अंदाज घेण्यासाठी महत्त्वाची ठरते.

यशोधर चरित्र आणि सुगंधदशमी कथा या दोन्ही कथांमध्ये पाप-पुण्य, पुनर्जन्म, पश्चाताप या बाबींवर भर दिला आहे. आचार-विचारांचा संवाद साधून धर्माचा गाभा सोप्या व सुटसुटीत पद्धतीने श्रावकांना सहज समजेल अशा भाषेत समजावला आहे. यशोधर चरित्राची सुरुवात तीर्थकरांना वंदन करून होते, त्यानंतर सरस्वती वंदना व जंबूद्वीपाचे चित्रण दिसते. कथानक एका कापालिक मांत्रिकाने राजाचे मन वाईट कृत्यांकडे वळवण्यापासून सुरुवात होते. राजाचे शिपाई अभयरुचि मुनी आणि अभयमती साध्वी यांना बलिदानासाठी पकडून आणतात, ते दोघे राजाला यशोधर चरित्राची कथा सांगतात. यशोधर चरित्र हे यशोधर आणि त्याची विश्वासघातकी पत्नी अमृतमती यांच्या कथेभोवती फिरते. अमृतमती आपल्या पतीचा विश्वासघात करते. यशोधराची माताही धर्माचे खरे स्वरूप न समजल्यामुळे वाईट कृत्यांकडे वळते. यामुळे त्यांना विविध प्रकारचे कठीण प्रसंग आणि पुनर्जन्म भोगावे लागतात. कथानकाच्या शेवटी, यशोधराचा पुत्र यशोमती शिकारीला जातो, जिथे त्याला सुदत्त मुनींचे दर्शन होते. मुनींच्या उपदेशाने त्याचे मन शांत होते व तो एक चांगली व्यक्ती म्हणून जीवन जगतो. कथेच्या शेवटी सर्व राजे व राण्या दीक्षा घेऊन मोक्षमार्गाकडे वळतात. ही कथा सांगते की धर्म आणि नीतिमत्ता ही जीवनातील सर्वात मोठी गोष्ट आहे आणि वाईट कर्माचे फळ भोगावेच लागते.

या पोथीची चित्रशैली मिश्र स्वरूपाची आहे, त्यात मेवाड व गुजराती जैन शैलीचा प्रभाव आढळतो. चित्रांमध्ये लाल रंगाचा वापर प्रामुख्याने दिसतो. सोबत निळा, पिवळा, काळा व पांढराही वापरला आहे. मनुष्याकृती राजस्थानी शैलीचा प्रभाव दर्शवतात. त्या काहीशा ठेंगण्या असल्या तरी चेहरे बोलके आहेत व त्यामध्ये विविधताही दिसते. कापालिकासारख्या पात्रांची वेशभूषा त्यांच्या क्रूर स्वभावाला अनुरूप आहे. ही पोथी ईडरमध्ये रंगवली असली तरी ती कारंज्यापर्यंत भट्टारकांच्या प्रवासामुळे किंवा त्यांच्या संपर्कामुळे आली असावी, कारण ईडरमध्येही भट्टारकांचे पीठ होते.

ईडरच्या पोथीच्या सुमारे शंभर वर्षानंतर रंगवलेली ही दुसरी यशोधर चरित्र पोथी विदर्भातच निर्माण झाली असावी, कारण या पोथीच्या कॅलोफोनमध्ये बाळापूर (अकोला) येथे तयार झाल्याचा उल्लेख सापडतो. इसवी सन १७३६ अशी या पोथीच्या निर्मितीची तारीख असून त्यात चित्रकाराचे नाव मात्र उपलब्ध नाही. 'बाळापूर' गावाचा उल्लेख मिळाल्यामुळे विदर्भातही चित्रनिर्मितीचे कार्य होत होते हे स्पष्ट होते. विषय तोच यशोधर चरित्र असला तरी या पोथीतील चित्रांची चित्रशैली काहीशी वेगळी आहे. ईडरच्या पोथीइतकी सफाईदार कारागिरी नसली तरी, ही पोथी तेवढ्याच कल्पकतेने तयार केली आहे. या चित्रांमध्ये कापालिकाची आकृती राखाडी रंगात (ग्रे) दाखवली आहे. त्याची वेशभूषा आणि जटाधारी स्वरूप पोथीतील वर्णनाशी जुळते. चित्रांमध्ये गुलाबी किंवा मॉव्ह रंगाचा वापर अधिक दिसतो. आकृत्या ठेंगण्या आणि वेधक आहेत. चित्ररचनेत काहीसा वेगळेपणा दिसतो. भट्टारकांच्या प्रयत्नातून व संपर्कातून गुजरात-राजस्थानकडचे चित्रकार विदर्भात काही काळ वास्तव्याला येऊन चित्र काढून गेल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांना इथे राजाश्रय (Patronage) मिळाला हे यावरून स्पष्ट दिसते.

**सुगंधदशमी कथा**

विदर्भात सुगंधदशमी कथेच्या दोन सचित्र पोथ्या उपलब्ध आहेत, त्यापैकी एक चंद्रप्रभू सेनगण मंदिरात आहे. ही पोथी पूर्ण असून यशोधर चरित्राप्रमाणे त्याची पाने सुटी नसून ती बांधलेली

आहे. या पोथीमध्ये ४३ पाने असून त्यातील चित्रे चौकोनी आकारात काढली आहेत. पोथीची भाषा मराठी असून ती वेगवेगळ्या छंदात लिहिली आहे. यात लेखकाचे व भट्टारकांचे नाव उपलब्ध आहे. ‘देवेंद्रकिर्ती गुरु पुण्यरासी, जैनादि सागर हो शिष्य त्यासी । ऐसी कथा ही परिपूर्ण सांगे, श्रोत्यासी या चित्र मनानी म्हणावी सांगे । इति श्री सुगंधदशमी कथा संपूर्ण’ हा उल्लेख त्यात आढळतो. मात्र निर्मितीचे साल किंवा चित्रकाराचे नाव आढळत नाही. पण ही पोथी १७व्या शतकाच्या उत्तरार्धातील अथवा १८व्या शतकातील असावी असा अंदाज आहे.

सुगंधदशमी कथाही यशोधर चरित्राप्रमाणेच जन्म-मृत्यू, आचार-विचार, पाप-पुण्य आणि दानाच्या महत्त्वावर आधारित आहे. जैन धर्मात अन्नदान, श्रमदान, शास्त्रदान अशा सर्व प्रकारच्या दानाचे महत्त्व या कथेत सांगितले आहे. भाद्रपद महिन्यात पर्युषणाच्या सहाव्या दिवशी या कथेचे वाचन होते व अनेक श्रावक श्रद्धापूर्वक पूजाविधी करतात. कथेची सुरुवात बनारस शहराच्या वर्णनाने होते. एक राजा आपल्या राणीसमवेत वनात शिकारीला जातो. वनात त्यांना एक मुनी दिसतात. राजा मुनींना अन्नदान करणे आपले कर्तव्य समजतो आणि राणीला महालात परत जाऊन अन्नदान करण्यास सांगतो. राणीला वनविहारात व्यत्यय आल्याने प्रचंड राग येतो. ती महालात परत जाते, स्वयंपाक करते पण रागाच्या भरात विषारी अन्न मुनींना देते, ज्यामुळे मुनी मूर्च्छित पडतात. हा प्रसंग चित्रकारांनी प्रभावीपणे चित्रित केला आहे, ज्यात शिकारीचे दृश्य, राजा-राणीचा संवाद, दिगंबर मुनी आणि स्वयंपाकघरातील राणी ही दृश्ये आहेत. राजाला सर्व कळल्यावर तो संतापून राणीला महालातून काढून टाकतो. त्यानंतर राणीचे अतिशय वाईट पुनर्जन्म होतात. ती म्हैस, चांडाळकन्या अशा विविध रूपात जन्म घेते. तरीही तिचे भोग संपत नाहीत. चांडाळ कन्या म्हणून जन्म घेतल्यानंतरही ती दुःखीच असते, हळूहळू तिला पश्चात्ताप होतो. नंतर ती एका ब्राह्मण घराण्यात जन्म घेते, परंतु तिला एक विचित्र दुर्गंध येत असतो, म्हणून तिला दुर्गंधा असे म्हणतात. पुन्हा तिला एक मुनी भेटतात. त्यांचे उपदेश ऐकते आणि सुगंधदशमीचे व्रत करते, ज्यामुळे तिच्या नशिबात चांगले दिवस येतात. व्रताचे प्रदीर्घ वर्णन या पोथीत आहे.

सुगंधाचा जन्म एका व्यापारी कुटुंबात होतो. तिचे बालपण सुखी जाते. पण तिचे भोग पूर्णपणे संपलेले नसल्याने सुगंधाची आई लहानपणीच मरण पावते आणि तिला सावत्र आई येते. सावत्र आईचे कारस्थान सुरू होते. वडील जिनदास राजाच्या आज्ञेने रत्न आणायला परदेशात जातात. सावत्र आई स्वतःच्या मुलीचे (श्यामा) थाटामाटात लग्न लावते आणि सुगंधाला स्मशानात पाठवून सांगते की, तिचा भावी नवरा तिला तिथे मिळेल. योगायोगाने महालाच्या माडीवरून राजा स्मशानात एक सुंदर युवतीला पाहतो. तो गुराख्याच्या वेषात जाऊन तिच्याशी वार्तालाप करतो आणि ते गुपचूप विवाह करतात. देवी-देवताही त्यांच्यावर पुष्पवृष्टी करतात. राजा निघून जातो, सुगंधाला काही अलंकार देतो. सुगंधा घरी येते आणि आपल्या आईला हे दागिने गुराख्याने दिल्याचे सांगते. सावत्र आईला शंका येते की, हे दागिने चोरलेले असावेत. जिनदास परदेशातून परत आल्यावर ते एक प्रकारचे स्वयंवर आयोजित करतात, जिथे शहरातील सर्व तरुण पुरुष आमंत्रित असतात. सुगंधा एकेकाचे पाय धुते आणि राजाचे पाय धुवत असताना तिला कळते की, तोच तिचा पती आहे. जिनदासालाही आनंद होतो. त्यांचे थाटामाटात लग्न होते आणि सुगंधा, जी मुळातच धार्मिक वृत्तीची असते, ती नंतर स्वर्गात जाते आणि सर्वांचे भले होते. हे कथानक पाप-पुण्य, पश्चात्ताप आणि दानाचे महत्त्व अधोरेखित करते. या पोथीची चित्रशैलीसुद्धा मिश्र स्वरूपाची आहे. अहमदाबाद येथील एल. डी. म्युझियममध्ये असलेल्या १८व्या शतकातल्या जैन शैलीतील (पॉप्युलर स्टाईल) चित्रांशी तिचे साधर्म्य आढळते, ज्यावर यू. पी. शाह

यांसारख्या विद्वानांनी संशोधन केले आहे. ही शैली मेवाड, बुंदी, मारवाड आणि विशेषतः सूरत येथील शैलीचा प्रभाव दर्शवते. डॉ. विद्याधर जोहरापूरकर यांच्या पुस्तकातील शिलालेखांमध्ये 'सूरत' किंवा सूरत बंदर यांसारखे उल्लेख आढळतात. त्यामुळे जैन समाज राजस्थान किंवा गुजरात मधून सूरत आणि खानदेशामार्गे विदर्भात आला हे स्पष्ट होते. तसेच काही जैन कुटुंबे माळव्याहूनही विदर्भात आली असावीत, कारण माळव्यातही जैन धर्माचे अनेक ऐतिहासिक पुरावे सापडतात. सूरतमधील नंतरच्या काळातील अनेक पोथ्या आणि विदर्भातील पोथ्या यात अनेक बाबतीत साम्य दिसते.

कारंजा येथील सेनगण मंदिरात उपलब्ध असलेली सुगंधदशमी कथेची दुसरी पोथी उभ्या फॉरमॅटमध्ये आहे. यात अवकाशाचे दोन खणांमध्ये विभाजन केले आहे व त्यात कथेतील विभिन्न प्रसंगाची रचना केली आहे. नागपूरच्या सुगंध दशमी कथेच्या तुलनेत कारंजाची पोथी कमी सुबक व सुटसुटीत वाटते. विदर्भात चित्रपोथ्या रंगवणाऱ्या चित्रकाराच्या हातातली सफाई व कौशल्य कमी-अधिक असल्यामुळे हा भेद जाणवतो.

**इतर सचित्र पोथ्या**

या व्यतिरिक्त नागपूर येथील आदित्यवार व्रतकथा, कारंजा येथील शांतिनाथ चरित्र अशाही काही सचित्र पोथ्या आहेत. यावरून हे दिसते की विदर्भातील पोथ्या या संकरित किंवा मिश्र शैलीत आहेत. याचे मुख्य कारण असे की, विदर्भात सचित्र पोथ्या बनवणारे चित्रकार हे स्थानिक नसून अधिकतम भट्टारकांच्या आग्रहामुळे अथवा एखाद्या कलेचा रसिक श्रावकांच्या आमंत्रणामुळे येथे अल्पकाळ येऊन राहात असावेत व त्यांच्या शैलीवर गुजरात व राजस्थानातल्या विविध शैलींचा प्रभाव असल्यामुळे त्या पद्धतीचे काम त्यांच्याकडून विदर्भात झाले.

**पंचकल्याणक पट**

कारंजाच्या सेनगण मंदिरात एक खूप महत्त्वपूर्ण ठेवा आहे. - पंचकल्याणक पट. यात तीर्थंकर ऋषभनाथांच्या पाच कल्याणकांचे अतिशय सुंदर चित्रण आहे. १२ मीटर लांबीचा व जवळ-जवळ १ मीटर (०.८ मीटर) रुंदीचा हा पट आडव्या फॉरमॅटमध्ये असून त्यात पहिले तीर्थंकर ऋषभनाथ यांचे गर्भ, जन्म, दीक्षा, केवलज्ञान आणि मोक्ष हे कल्याणक दर्शवले आहेत. हा पट रंगवताना चित्रकारांनी कथानकाचा (narrative) दृष्टिकोन ध्यानात ठेवला असून याचे साम्य लघुचित्रपरंपरा व स्वरूप याचेशी आहे. पट डावीकडून उजवीकडे वाचावा लागतो. त्यात १८ प्रसंग दाखवले आहेत. दिगंबर जैन धर्मातील आदिपुराण या ग्रंथावर पट बेतला आहे.

पंचकल्याणक पट अनेक अर्थाने अद्वितीय आहे. या विषयावर आधारित हा एकमेव ज्ञात पट आहे. पटाचे चित्रांकन एकाच शैलीत नसून त्यात काही मेवाड, बुंदी अशा राजस्थानी शैलीची छाप दिसते. तसेच काही मोगल-दख्खनीचेही विशेष दिसतात. किल्ले-राजवाडे यांचे वास्तुक घटक मेवाड किंवा दख्खनी वाटतात. वास्तूंच्या अंतर्भागातल्या आणि निसर्गचित्रणात दख्खनी छाप दिसते. प्राणीचित्रण काळजीपूर्वक केले असून इंद्रदेवाचे वाहन ऐरावत याचे चित्रण फारच देखणे आहे. त्याचे मोठे कान, कातडीचे तपशील, स्थूल शरीर व अनेक सोंडी यात चित्रकाराची कल्पकता दिसते. स्त्री आणि पुरुषांच्या आकृती लांब व सडसडीत बांध्याच्या आहेत. त्यात मेवाडमधील मोगल प्रभावित शैली, तसेच बुंदी, दख्खनी या सर्वांचा मेळ दिसतो. नृत्य करणाऱ्या इंद्रदेवाच्या आकृतीत मेवाड प्रसिद्ध चित्रकार साहिबदीनच्या सहस्रार्जुनाची आठवण येते. रंगसंगतीत गर्द लाल रंगाचे प्राधान्य संपूर्ण पटात दिसत असून त्यासोबत पिवळा, निळा, हिरवा इत्यादी रंग योग्य प्रमाणात आहेत.

औरंगाबाद येथे मोगलांनी दुसरी राजधानी वसवल्यानंतर येथे चित्रनिर्मितीला विशेष चालना मिळाली. औरंगाबाद शहर अनेक वेगवेगळ्या प्रवाहाचे केंद्र होते. मोगल काळात अनेक राजस्थानहून आलेले राजपूत सरदार त्यांच्या

ताफ्यासह औरंगाबादेत दीर्घकाळ घालवत. ते आपल्या सोबत चित्रकारही आणत. औरंगाबाद नजीक बऱ्हाणपूर शहर हे महत्त्वाचे व्यापार केंद्र होते. त्यामुळे तिथेही सांस्कृतिक व आर्थिक दळणवळण होत असे. डॉ. सरयू दोशी यांनी आपल्या लिखाणात औरंगाबाद येथील 'रसमंजिरी' या लेखात हे सिद्ध केले की औरंगाबाद क्षेत्रातही एक मिश्र आणि प्रभावकारक शैलीचा आविष्कार झाला. पंचकल्याणक पटासारखा कामाचा उत्तम नमुना दख्खन अथवा मध्य भारतात कुठेही नाही. या पटामागे कोणीतरी जाणकार आणि कुशल चित्रकाराचा हात दिसतो. औरंगाबाद प्रांतात काम करणाऱ्या चित्रकारांना कारंजा येथे पट रंगविण्यासाठी आमंत्रित करणे अथवा पट औरंगाबादेत तयार करून कारंज्याला नेणे हे शक्य होते. यामागे तत्कालीन भट्टारक जिनसेन यांची भूमिका महत्त्वाची असणार. जिनसेन विद्वान होते. गुजरात आणि राजस्थानला यात्रेनिमित्त त्यांचे जाणे-येणे असे. या दरम्यान त्यांच्या नजरेत उत्तम काम करणारे चित्रकार आलेच असणार व भट्टारक आणि श्रावक यांच्या संयुक्त प्रयत्नातून कारंजाचा हा अप्रतिम पट निर्माण झाला असणार. राजस्थान आणि गुजरातकडच्या चित्रकारांना पट रंगविण्यास आमंत्रण दिले असून त्यांनी तो इथे येऊन रंगवला असणार. या पटाचा उपयोग राजस्थानमधील विविध तीर्थ पट अथवा विज्ञाप्तीपत्रापेक्षा भिन्न असावा. विदर्भात विविध स्थळी मूर्ती प्रतिष्ठा वेळोवेळी होत असत याचे अनेक उल्लेख आपणास अभिलेखांमध्ये सापडतात. अशा वेळेस सर्व श्रावक-श्राविकांकरिता हा पट मांडण्याची प्रथा असावी.

**निष्कर्ष**

विदर्भातील दिगंबर जैन भांडारामधील सचित्र पोथ्या व चित्रे ही भारतीय कला इतिहासाची अनमोल ठेवा आहेत. 'यशोधर चरित्र' आणि 'सुगंध दशमी' सारख्या पोथ्या केवळ धार्मिक कथांचे माध्यम नाहीत, तर त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक आणि कलात्मक प्रवाहांचे प्रतिबिंब आहेत. भट्टारक संप्रदायाच्या सक्रिय भूमिकेमुळे आणि शास्त्रदानाच्या परंपरेमुळे या पोथ्यांची निर्मिती व जतन शक्य झाले. पोथ्यांच्या चित्रात दिसणारी मिश्र शैली ही जैन कलापरंपरेच्या विस्ताराचे आणि प्रादेशिक अनुकूलनाचे द्योतक आहे. विदर्भातील सचित्र पोथ्या पश्चिम भारतीय शैली इतक्या तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण नसतील तरी त्यांनी जैन कथांना दृश्यरूप देऊन सामान्य धार्मिक शिकवणी सहज समजण्यास मदत केली. कारंजा मंदिरातील पंचकल्याणक पट निर्विवाद विदर्भातील जैन चित्रसंपदेतील सर्वोत्कृष्ट नमुना ठरतो. जैन चित्रशैली केवळ समृद्ध प्रादेशिक केंद्रापर्यंत मर्यादित नव्हती, तर ती विविध प्रदेशात पसरली आणि विकसित झाली हे स्पष्ट होते.

**( छायाचित्रे आतील रंगीत पृष्ठ क्र. ०१वर)**

**✻ आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, कर्तव्यतत्परता, एकनिष्ठा, त्याग, अचूक व्यक्तिपरीक्षण, बलिदान-कृतज्ञता ह्या दैवी गुणांवरच मानव जीवनातील यश अवलंबून असते. संस्था, समाज, देश यांची सेवा करताना अशाप्रकारच्या उच्च बलिदानाची आवश्यकता असते. असे कार्यकर्ते जाणीवपूर्वक निर्माण करावेत, त्यांचा सांभाळ अवश्य करावा.**

**✻ सेवेचे महत्त्व समजावून सांगत जावे. प्रेमाने आणि समजावून सांगण्यानेच खरा फायदा होतो. रागावण्याने होत नाही. म्हणून प्रेमाने गोड बोलून चुकल्यास चूक पोटात घालून पुन: समजावून सांगून कामे मुलांकडून करून घेत जावीत. त्यायोगे मुलेही लायक बनतील.**

**मुलेही आपलेच अनुकरण करणार. आपण रागावून बोलू लागलो तर तीही तेच शिकणार आणि आपण गोड बोलून समजावून सांगून कामे करून घेऊ लागलो तर मुलेही तेच शिकतील. तरी या सिद्धांताकडे लक्ष द्यावे.**

**- परम पूज्य गुरुदेवश्री समंतभद्र महाराज**

# कला आणि स्थापत्यकलेतून जैन मंदिरांचे प्रकार

**डॉ. प्रणोति लाड,**
सिंहगड कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पुणे

डॉ. प्रणोती लाड (M.Arch.) या संरक्षण वास्तुविशारद (Conservation Architect)अध्यापन क्षेत्रातील तज्ज्ञ आणि संशोधक असून त्यांना व्यावसायिक व अध्यापन क्षेत्रात वीस वर्षांहून अधिक अनुभव आहे. त्या सिंहगड कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पुणे येथील आर्किटेक्चरल कन्झर्वेशनच्या मास्टर्स विभागाच्या प्रमुख आहेत. त्यांच्या डॉक्टरेट संशोधनाचा विषय 'महाराष्ट्रातील जैन धार्मिक वास्तुकला' हा होता. त्यांनी UGC-CARE नियतकालिकांमध्ये अनेक संशोधन निबंध प्रकाशित केले आहेत, तसेच जैन परिषदा व मासिकांमध्ये संशोधनपर लेख सादर व प्रकाशित केले आहेत. विविध राष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांचा नियमित सहभाग असतो.विविध कार्यशाळा/ TTPs/ सामाजिक संस्थांमध्ये त्या विषयतज्ज्ञ (Subject Expert) म्हणून कार्य करतात. त्या SCOPUS नियतकालिकांच्या पुनरावलोकक (Reviewer) आहेत.तसेच ICOMOS Indiaच्या सदस्य आहेत.त्यांना अनेक शैक्षणिक सन्मान प्राप्त झाले आहेत. Email id - pranoti_lad@yahoo.com

**गोषवारा :**

भारताच्या इतिहासात जैन धर्माचा इतिहास अतिशय प्राचीन असून भारतीय कलेतील आणि वास्तुकलेतील त्याचे योगदान खूप मोठे आहे. जैन धर्मातील संपन्न सांस्कृतिक वारशाची यातून ओळख होते. हा वारसा भारतातील विविध प्रदेशांत कान-कोपऱ्यात विखुरला आहे. आजवर जैन धर्मातील वास्तुकलेची ओळख ही उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील काही विशिष्ट वास्तूंसाठी आणि प्रदेशापुरती मर्यादित राहिली आहे, या वास्तू व हे प्रदेश सामान्यतः पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रातील वास्तुकलेवर आजवर फारच तुरळक भाष्य झाले आहे. महाराष्ट्रात स्थानिक वास्तुकलेत आपल्याला वेगवेगळ्या काळांत विविध शैलींचा प्रभाव दिसतो. येथील वास्तुकला विविध प्रकारांत (architectural tyology) बहरलेली दिसते. जसे राजकीय घडामोडींच्या प्रभावामुळे वास्तुकलेच्या विविध शैली आलेल्या दिसतात तसे भौगोलिक स्थानांप्रमाणे व स्थानिक संस्कृतीप्रमाणे वास्तुकलेचे विविध प्रकार उदयाला आलेले दिसतात.

**१. पार्श्वभूमी**

हिंदू, बौद्ध आणि जैन या तीनही धर्मांत कालानुरूप वास्तुकलेचे विविध प्रकार उदयाला आलेत, त्यातील काही आजही कार्यरत आहेत तर काहींची कार्ये काळाच्या ओघात लुप्त झाली आणि त्यावेळेसच्या वास्तू त्यांची साक्ष देत आहेत. जैन समाज पंच परमेष्ठींना पूजतो, जे आपल्याला कलेतून व शिल्पकलेतून प्रतीत होताना दिसतात. आकाराला आलेल्या अशाच काही वास्तुकला (architecture) याठिकाणी मांडण्यात आल्या आहेत. या लेखाचा दुय्यम साधनांसह मंदिरांना प्रत्यक्ष भेट देऊन माहिती घेण्यात आली आणि त्यावर आधारित निष्कर्षावर हा अभ्यास केला आहे.

**२. जैन धर्माचा इतिहास**

बिहारमधील पाटलीपुत्र (पाटणा) आणि राजगृही (राजगिर) हे दोन्हीही प्राचीन शहर जैन धर्मीयांसाठी महत्त्वाचे आहेत. बहुतेक जैन तीर्थंकर ईशान्य भारतात जन्मले. चोविसावे तीर्थंकर भगवान महावीर हेही मगध प्रांतात (बिहार) जन्मले आणि त्यांनी तिकडे धर्मप्रसार केला. त्यांच्या अनुयायांनी नंतर भारतात जैन धर्माचा प्रसार केला आणि इ.स. पूर्व तिसऱ्या शतकापर्यंत तो उज्जैन पर्यंत पोचला. साधारण याच काळांत उत्तरेकडील दुष्काळामुळे, मुनी भद्रबाहूंनी इतर मुनींसह दक्षिणेकडे प्रयाण केले आणि मुनी स्थूलभद्र त्यांच्या संघासह उत्तरेतच परिस्थितीशी तडजोड करून राहिले. त्यातूनच पुढे



# विदर्भातील दिगंबर जैन भांडारातील सचित्र पोथ्या व चित्र : एक कला ऐतिहासिक दृष्टीकोन

– डॉ. मनीषा पाटील, नागपूर



सुदत्त द्वारा अभयमति व अभयरुचि यांना भिक्षेसाठी पाठविल्या जाणे



जिनदास द्वारा पाहुण्यांना घरी आमंत्रण



धरणेंद्र व पद्मावती



चंडीमारी देवी मंदिरात राजा व कापालिक



स्थापत्यकलेच्या दृष्टीने जैन मंदिरांची वैशिष्ट्ये - प्रा. डॉ. प्रणोति लाड




पांडवलेणी 5-6 वे शतक व अंकाई-टंकाई 10-12 वे शतक - नाशिक येथील जैन लेणी



श्री 1008 आदिनाथ दिगंबर जैन मंदिर, वाढोणा

कहाणी दोन अंतरिक्ष प्रतिमांची - अमलप्रभ चवरे



पाया विस्तारण्यासाठी हात समोर वाढवलेले आहेत.
(अंतरिक्ष पार्श्वनाथ प्रतिमा, शिरपूर)



नेमगिरी येथील भ. पार्श्वनाथ प्रतिमा

आतील रंगीत पृष्ठ क्र. ०२



## पंचकल्याणक पट – एक प्राचीन कला वैभव – प्रज्ञा डोणगावकर



तीर्थंकर ऋषभदेवांचे जन्मकल्याणिक

सुमेरू पर्वतपर तीर्थंकर ऋषभदेवांचा जन्माभिषेक





वैराग्य उत्पत्ती व दीक्षा कल्याणिक



केवलज्ञान कल्याणिक एवं समवशरण रचना

आतील रंगीत पृष्ठ क्र. ०३



## जैन स्थलांतर व चित्राश्रयाचे बदलते स्वरूप - प्रा. रूपेश मडकर



श्री. दोशी यांचे गृह चैत्यालय, फलटण



शास्त्र कथन दर्शवणारे चित्र, श्री. दोशी यांचे गृह चैत्यालय, फलटण

## महाराष्ट्रातील जैन पुरातत्व - एक संक्षिप्त आढावा - ओशिन बंब



थानपाडा, जिल्हा नाशिक येथील
खंडहर झालेले जैन मंदिर

पाले लेणीतील ब्राह्मी लिपीत
आणि प्राकृत भाषेत असलेला शिळालेख





नृत्यरत इंद्र, छोटा कैलाश, जैन लेणी
क्रमांक 30, एलोरा

आतील रंगीत पृष्ठ क्र. ०४

दिगंबर व श्वेतांबर हे दोन पंथ उदयाला आले. दिगंबर पंथ दक्षिणेकडे तर श्वेतांबर पंथ उत्तरेकडे प्रसार पावला (Ayyangar, १९२२; Shah, २०११).

पूर्वीपासून उत्तर आणि दक्षिण भारतात विविध राजांचा जैन धर्माला राजाश्रय मिळाला. त्यातूनच जैन कला आणि वास्तुकला बहरली. तीर्थंकर हे राजवंशात जन्मतात, चोवीस पैकी बावीस तीर्थंकर इक्ष्वाकु या राजवंशात जन्मले. उत्तरेकडील बिंबिसार अजातशत्रू, चंद्रगुप्त मौर्य, बिंदुसार या जैन राजांचा धर्माला पर्यायाने वास्तुकलेला राजाश्रय मिळाला. राजा खारवेल हे पूर्वेकडे झाले तर दक्षिणेकडील यादव (देवगिरी), अमोघवर्ष, पश्चिम गंग वंश, कदंब, राष्ट्रकूट, चालुक्य बदामी, चालुक्य कल्याणी, शिलाहार, चोल, पांड्य या जैन राजांनीही वास्तुकलेला राजाश्रय दिला आणि दक्षिण भारतात- दख्खनच्या पठारावर व महाराष्ट्रात जैन वास्तुकला बहरली. महाराष्ट्रातील विविध भागांत पूर्वी मौर्य, सातवाहन, कदंब, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, पश्चिम व दक्षिण महाराष्ट्रात शिलाहार, सेऊन यादव (देवगिरी) या राजवटी होऊन गेल्या (Michell, २०१५). त्यानंतर खिलजी, तुघलक थोड्या काळासाठी, नंतर बहामनी, दक्खन सुलतान, मुघल राजवट हा इस्लामिक राजवटीचा काळ झाला, नंतर मराठा व स्वातंत्र्यपूर्व काळांत ब्रिटिश राजवट होती.

सहाव्या शतकांत मंदिर वास्तू प्रकार विकसित झाल्यानंतर भारतभर मंदिर स्थापिली जाऊ लागली. याच काळांत जैनांनीही तीर्थंकरांशी आणि जैन मुनींशी संबंधित तीर्थक्षेत्र शोधून त्याठिकाणी मंदिरे बांधली. त्यातूनच सिद्धक्षेत्र, अतिशयक्षेत्र आणि कल्याणक्षेत्र हे तीनही प्रकार विकसित झाले आणि आज भारतभर आपल्याला जैन तीर्थक्षेत्र विखुरलेली दिसतात.

**३. जैन वास्तुकलेचे विविध प्रकार**

जैन स्थापत्यकलेचे आपल्याला इ. स. पूर्व दुसऱ्या शतकापासून संदर्भ मिळतात. त्यांची तीन भागांत विभागणी करता येईल.

Sacred space (पवित्र जागा)

Building typologies (इमारतींचे प्रकार)

Elements typologies (घटक प्रकार)

हे सर्व प्रकार भारतात विखुरलेले दिसतात. राजवटीप्रमाणे आणि भौगोलिक परिस्थितीप्रमाणे तसेच स्थानिक संस्कृती व बांधकाम साहित्याप्रमाणे त्यांचे प्रकार दिसतात.

Sacred space (पवित्र जागा)

a. Tirthakshetra (तीर्थक्षेत्र)

भारतांत महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटक, गुजरात, राजस्थान या राज्यांत अधिक तर इतर ठिकाणी तुरळक जैन तीर्थक्षेत्र आढळतात. महाराष्ट्रात सिद्धक्षेत्र आणि अतिशयक्षेत्र आढळतात. सह्याद्रीच्या पर्वत रांगांमध्ये हिंदू व बौद्ध लेणीं प्रमाणेच जैन लेणी पण कोरलेल्या दिसतात. याच रांगांमध्ये वेरूळ पण वसले आहे. महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यात मांगी-तुंगी असेच जैनांचे महत्त्वाचे सिद्धक्षेत्र आहे. मांगी-तुंगीच्या लेण्या आठव्या-नवव्या शतकातील आहेत (Meghal-Lad, २०२३). मांगी-तुंगी या दोन्ही टोकांच्या पायथ्याशी एकोणिसाव्या शतकातील जैन मंदिरे आहेत आणि मंदिरांचे शिखर राजस्थानी शैलीतील घुमट प्रकारातील आहे.

Building typologies (इमारतींचे प्रकार)

a. Stua (स्तूप)

बांधीव प्रकारांत सर्वप्रथम स्तूप येतात. एकोणिसाव्या शतकात कंकली टीला, मथुरा, उत्तर प्रदेश येथे पुरातत्व विभागाने केलेल्या उत्खननात जैन स्तूप, दोन मंदिरे, अयागपट्ट, जैन मूर्ती अशा बऱ्याच गोष्टी मिळाल्या. उत्खननात सापडलेले हे भारतातील पहिले जैन स्तूप होय (Jain, २०१०).

b. Caves (लेणी)

जैन धर्माचा प्रसार आणि शिक्षण, यात जैन मुनी महत्त्वाची भूमिका बजावतात. पूर्वीही ते गावोगाव प्रचारासाठी फिरत म्हणून इ. स. पूर्व तिसऱ्या शतकांत, त्यांना आश्रयासाठी छोट्या आकारातील गुंफा गावातील वस्तीपासून दूर बांधत (Meghal-Lad, 2022). मुनी महाराजांना

राहण्याची आणि अध्ययन करण्याची त्यात व्यवस्था असे. हळूहळू चवथ्या ते सहाव्या शतकानंतर त्यात जैन मूर्ती दिसायला लागल्या आणि त्यातून मंदिरांची उत्क्रांती झाली. हळूहळू मंदिर स्थापत्यकला विकसित झाली. राष्ट्रकूट, यादव आणि शिलाहार राजवटींच्या काळांत मंदिरांचे बांधकाम शिगेला पोहोचले होते. याकाळात महाराष्ट्रातही मंदिरे बांधल्या गेल्या आणि लेण्याही खोदल्या गेल्या.

कोल्हापूर जिल्ह्यात साधारण सोळाव्या शतकातील काही गुंफा आढळतात ज्या आकाराने लहान असून, १.५ मी.पेक्षा कमी उंचीच्या असून गुंफेला दरवाजाही कमी उंचीचा असतो. मुघल राजवटीतील ह्या गुंफा मुनींना चातुर्मासात राहण्यासाठी, तप करण्यासाठी, धर्म प्रसारासाठी उदयाला आल्या. शिरोळ तालुक्यातील उदगाव येथे आचार्य श्री आदिसागरजी महाराज (अंकलीकर) तसेच नांदणी, कोल्हापूरातील वृषभाचल येथे, श्री १०८ सिद्धीसागर महाराजांची गुंफा आहे (Meghal-Lad, 2022).

महाराष्ट्रात आढळणारी बहुतांश लेणी ही सह्याद्रीच्या काळ्या पाषाणात- काळ्या बॅसाल्टमध्ये (basalt stone) खोदलेली आहेत. याव्यतिरिक्त महाराष्ट्रात आढळणारा दगड म्हणजे जांभा दगड (laterite stone). नाशिक जिल्हा लेण्यांसाठी प्रसिद्ध आहे. नाशिक जिल्ह्यावर पूर्वीपासून जैनांचा प्रभाव दिसतो. नाशिक हे पूर्वी जैनांचे महत्त्वाचे केंद्र होते, अजूनही तिथे जैन समुदाय मोठ्या संख्येने राहतो. आपण प्रशासकीय सीमेचा (administrative boundary) विचार केला तर नाशिक, गुजरातच्या जवळ असल्यामुळे येथून भरपूर स्थलांतर झालेले आपल्याला दिसते. हा भाग सह्याद्री पर्वत रांगेच्या कुशीत वसल्यामुळे, इकडे भरपूर लेण्या बांधल्या गेल्या. पूर्वी नाशिक महत्त्वाचे व्यापारी केंद्र होते. नाशिकहून कल्याण-सोपारा हा जुना व्यापारी मार्ग होता. तसेच कोल्हापूर आणि उस्मानाबादला तेर (तगर) या सातवाहन कालीन महत्त्वाच्या व्यापारी केंद्रानाही ते जोडले होते. या व्यापारी केंद्रांवर जैन समुदाय वेगवेगळ्या ठिकाणाहून स्थलांतर करून मोठ्या संख्येने स्थायिक झाला. बौद्ध लेण्याप्रमाणेच जैन लेणीही नासिकच्या आसपास आली. येथे पांडवलेणी, अंजनेरी, मांगी-तुंगी, गजपंथ, चांदवड, अंकाई-टंकाई, ट्रिंगळवाडी, विश्रामगड या ठिकाणी आपल्याला जैन लेण्या दिसतात, पहा प्रतिमा क्रमांक १ व २. या लेण्या साधारण नवव्या शतकापासून चौदाव्या-पंधराव्या शतकापर्यंत कोरल्या आहेत. पांडवलेणी येथे बौद्ध लेण्यांत अकरा क्रमांकाची एक जैन लेणी आहे. गजपंथच्या टेकडीवर आणि चांदवडच्या टेकडीवर गुहा मंदिर आहे. अंकाई-टंकाईला दहाव्या-बाराव्या शतकातील लेण्या असून सात जैन लेणी आहेत तर अंजनेरीला राष्ट्रकूटांच्या काळातील दोन जैन लेण्या आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्यातील वेरूळला तीस ते चौतीस या पाच जैन लेण्या असून राष्ट्रकूट राजवटीच्या काळातील या लेण्या वेरूळ मधील इतर लेण्यांच्या तुलनेत जरा नंतर म्हणजे नवव्या-दहाव्या शतकात कोरल्या आहेत. यादवकालीन अकराव्या-बाराव्या शतकांतील सोळा फूट उंचीची भगवान पार्श्वनाथांची खड्गासनातील मूर्ती टेकडीवर स्थानापन्न आहे.

प्रतिमा क्रमांक १ व २ : पांडवलेणी ५-६ वे शतक व अंकाई-टंकाई १०-१२ वे शतक- नाशिक येथील जैन लेणी, स्रोत : लेखिका

c. Temple city (मंदिरांचे शहर)

मंदिरांचे शहर ज्याला म्हणता येईल असे निसर्गाच्या कुशीत वसलेले, सातपुडा पर्वत रांगेतील मुक्तागिरी सिद्धक्षेत्र महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशच्या सीमारेषेवर आहे. सध्या ते मध्य प्रदेशमध्ये असले तरीही पूर्वी बेरार प्रांतात (olitical boundary) होते. बावन्न मंदिरांचा समूह असलेले निसर्गाच्या सान्निध्यातील हे क्षेत्र विविध काळात विकसित झालेले आहे. येथील दहाव्या नंबरचे मेंढेगिरी गुहा मंदिर दहाव्या शतकांतील असून ते एलिचपूरच्या (अचलपूर) राजा ऐल श्रीपालने बांधल्याचे मानतात.

इतर मंदिरे त्यानंतर वेगवेगळ्या काळांत साधारण एकोणिसाव्या शतकापर्यंत विकसित झाली (Meghal-Lad, 2018). त्यामुळे येथील प्रत्येक मंदिर- प्रत्येक शिखर वेगळ्या धाटणीचे आहे. काही ठिकाणी मंदिरांचे बांधकाम पण वेगळ्या शैलीतील आणि साहित्यातील आहे. काही मंदिर अतिशय छोटी आहेत, काही मंदिरे मोठी आहेत. कदाचित काही मंदिर ही कोणाच्या खाजगी निधीतून बांधल्या गेल्या असतील तर काही मंदिरे कदाचित राजाश्रयातून बांधल्या गेल्या असतील, त्यामुळे विविध शैलीतली, विविध काळातली आणि विविध बांधकाम साहित्यातील बावन्न मंदिरे बघायला मिळतात.

d. Temple complex (मंदिर समूह)

टेकडीवरील सात आणि पायथ्याशी असणारी चार अशा अकरा मंदिरांचा समूह या प्रकारात मोडणारे कुंथलगिरीचे मंदिर होय. येथे आपल्याला टेकडीच्या पायथ्याशी पाच-सहा मंदिरांचा समूह तसेच इतर काही इमारती आहेत. तर टेकडीवर चढताना काही मंदिरे आहेत. ही मंदिरे बसाल्ट दगडातील असून, याचे शिखर विटा आणि चुन्याचे आहे. पेशवा काळातील शिखर बांधकाम पद्धत आणि मराठा शैलीतील ठराविक धाटणीच्या मंदिर प्रकारांत ते मोडते. साधारण अठराव्या शतकातील मंदिरांसमोर आपल्याला कीर्तिस्तंभही दिसतो, पहा प्रतिमा क्रमांक ३.

प्रतिमा क्रमांक ३ : कुंथलगिरी-मंदिर परिसर
स्रोत: लेखिका

e. Bhattarak Math (भट्टारक मठ)

मठ हा वास्तू प्रकार जैन धर्मात नवव्या शतकानंतर मोठ्या प्रमाणांत दिसायला लागला. साधारण चवथ्या-पाचव्या शतकापासून जैन मुनी ग्रंथ रचण्यासाठी, एका ठिकाणी राहायला लागले, नंतर तिथेच वास करू लागले, पुढे धर्मप्रसारासाठी, ग्रंथ रक्षणासाठी मठ परंपरा भारतभर उदयाला आली (Pranoti & Abhijit, 2018). भट्टारक हे मठाधिपती होत. सध्या महाराष्ट्र (दक्षिण महाराष्ट्रात नांदणी आणि कोल्हापूर), कर्नाटक, तामिळनाडू या ठिकाणी मठ पद्धती कार्यरत आहे.

सध्या महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्ह्यात नांदणी आणि कोल्हापूर शहरात असे दोन मठ आहेत, एक जिनसेन मठ तर दुसरा लक्ष्मीसेन मठ. जिनसेन मठाला पुरातन इतिहास असून, मंदिर नवव्या शतकातील असल्याचे उल्लेख मंदिरातील शिलालेखात मिळतात. मठ परिसरांत मठाची इमारत (administrative building), दोन मंदिरे - एक नवव्या तर एक अठराव्या शतकातील असून, एक मानस्तंभ आहे. मठाच्या इमारतीचा खालचा मजला बसाल्ट दगडी बांधकामात तर वरचा विटांचा आहे. कदाचित तो नंतर अठराव्या शतकात बांधला असावा. कोल्हापूरचा लक्ष्मीसेन मठ पहिल्या शतकांत स्थापिल्याचे संदर्भ असून मठात एक विसाव्या शतकातील आणि दुसरे एकविसाव्या शतकातील मंदिर आहे. मठाची इमारत एकोणिसाव्या शतकातील असून नगारखाना राजपुताना शैलीतील आहे (Meghal-Lad, 2022), पहा प्रतिमा क्रमांक ४ व ५.

प्रतिमा क्रमांक ४ व ५ : जिनसेन मठ, नांदणी कोल्हापूर व लक्ष्मीसेन मठ, कोल्हापूर,
स्रोत : लेखिका

f. Converted temples (परिवर्तित मंदिर)

मंदिर प्रकारांत परिवर्तित मंदिर हाही प्रकार दिसतो. पूर्वीची काही जैन मंदिरे, तीर्थक्षेत्र ही काळाच्या ओघात दुसऱ्या धर्मात परिवर्तित झालीत. त्यातील एक उदाहरण म्हणजे फलटणचे जबरेश्वर महादेव मंदिर.

प्रतिमा क्रमांक ६ : यादवकालीन जबरेश्वर महादेव मंदिर, रविवार पेठ, फलटण, स्रोत : लेखिका

यादवकालीन तेराव्या शतकातील या मंदिरात सध्या शिवपिंड आहे. गावाच्या मध्यावर असणारे हे मंदिर, राजवाडा चौकात आहे. मंदिरावर तीर्थंकर मूर्ती कोरल्या आहेत. बसाल्ट दगडात बांधलेले हे मंदिर जहाजाच्या आकारात वसले आहे, पहा प्रतिमा क्रमांक ६.

g. Temple (मंदिर)

मंदिरांना दक्षिण महाराष्ट्रात बस्ती किंवा बसदी असेही म्हणतात. पूर्वी मंदिराच्या जवळ मुनी-निवास असल्यामुळे तसे नाव पडले. मंदिरांची विविध पद्धतीने विभागणी होते- रचनेप्रमाणे, मंदिरातील मुख्य मूर्तीप्रमाणे तसेच प्रतीकात्मक मंदिर, इ. त्यांचे आकारही लहान-मोठे असतात. काहींना शिखर असतात तर काहींना शिखर नसतात. कालानुरूप आणि भौगोलिक स्थानाप्रमाणे त्यांची रचना, बांधकाम साहित्य बदलताना दिसते.

पूर्वीपासून जैन वास्तुकलेप्रमाणे मंदिरांमध्ये दोन प्रकारची रचना आहे (Maharaj, 2000)-

सांधारा (प्रदक्षिणापथ सहित)

निरंधारा (प्रदक्षिणापथ रहित)

ढोबळ पद्धतीने बघितले तर दक्षिण भारतात द्रविड शैली, उत्तर भारतात नागर शैली तर मध्य भारतात वेसर शैलीची मंदिरे आहेत (Hardy, 1995). काही मंदिरे उंच जोत्यावर बांधली आहेत. चारही दिशा मंदिरासाठी उपयुक्त असल्यातरीही, मंदिरे उत्तराभिमुख किंवा पूर्वाभिमुख अधिक असतात. मंदिर रचनेतील महत्त्वाचे घटक पुढीलप्रमाणे आहेत-

Garbhagriha (गर्भगृह/गाभारा): मुख्य मूर्ती येथे स्थापित करतात.

Antaral (अंतराळ) : इथपर्यंत भाविक जाऊ शकतात.

Sabhamandap/Gudhmandap (सभामंडप /गुढमंडप) : इथे बसून भाविक पूजा करतात.

Mandap (मंडप): मंदिर प्रवेशावरील छत आणि स्तंभ यांनी युक्त जागा.

Shikhar (शिखर): गर्भगृहाच्या वरचे उंच निमुळते बांधकाम, कधी कधी यातही मूर्ती स्थापित करतात.

दक्षिण महाराष्ट्रातील प्राचीन मंदिरांत वरील सर्व जागा असतात. काळ्या बसाल्ट दगडातील ही मंदिरे चालुक्य बदामी, राष्ट्रकूट आणि शिलाहार काळातील आहेत (Sangave, 1980). कोल्हापुरातील रुपनारायण बस्ती- मानस्तंभ बस्ती चालुक्य काळातील मंदिर असून गंडरादित्य शिलाहार राज्याने बाराव्या शतकांत हे बांधले. त्याच्या मानस्तंभाला आज शंभर वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे. म्हणून याचे नावही मानस्तंभ बस्ती असे पडले. गर्भगृहाच्या सरळ रेषेत मंडपाच्या बाहेर हा मानस्तंभ आहे. याच शहरातील लक्ष्मीसेन भट्टारक मठाजवळील केसापूरचे भगवान १००८ श्री तीर्थंकर पार्श्वनाथ मंदिरही अतिशय पुरातन चालुक्य काळातील आहे (Meghal-Lad, 2022). या दोन्हीही मंदिरांची रचना वेसर पद्धतीची असून येथे वर नमूद केलेल्या सर्व जागा आहेत, पहा प्रतिमा क्रमांक ७.

प्रतिमा क्रमांक ७ व ८ : भगवान १००८ श्री तीर्थंकर पार्श्वनाथ मंदिर केसापूर, कोल्हापूर व अंजनेरी-नाशिक येथील भग्न जैन मंदिरे, स्रोत : लेखिका

अंजनेरी हे अंजनी सूत हनुमानाचे जन्मस्थान म्हणून सर्वांना परिचित आहे. त्र्यंबक-नाशिक रस्त्याजवळील या गावात टेकडीच्या पायथ्याशी यादवकालीन जैन मंदिरांचा समूह आहे. बरीचशी मंदिरे आता विदीर्ण झाली आहेत. मंदिरात काही ठिकाणी मूर्ती आहेत तर काही ठिकाणी गायब झालेल्या आहेत. काही मंदिरांमध्ये प्रवेश केला तर मूर्तींचे अवशेष, जैन प्रतिमा, यक्ष-यक्षिणी प्रतिमा आणि मंदिरातील इतर भाग आपल्याला इतस्तत: विखुरलेले दिसतात, पहा प्रतिमा क्रमांक ८. आदिनाथांची एक मूर्ती आपल्याला रस्त्याच्या कडेला मोकळ्या जागेत बघायला मिळते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला जीर्ण अवस्थेत असलेली तीन मंदिरे आहेत (Meghal-Lad, 2023).

कोल्हापूरातील खिद्रापूर येथे श्री १००८ भगवान आदिनाथ जैन मंदिर असून त्यावर उत्कृष्ट कोरीव काम आहे. मंदिराच्या बाह्य भिंतींवर सुरसुंदरी चितारल्या आहेत. मंदिराचे गर्भगृह तारकाकृती रचनेचे आहे. या मंदिरातही आपल्याला गर्भगृह, अंतराळ, सभामंडप, मंडप या जागा दिसतात. मंदिर बसाल्ट दगडांत बांधले असून, मंदिराचे शिखर हे वीट आणि चुन्याचे आहे

(Meghal-Lad, 2022). कदाचित या मंदिरावर पण पूर्वी शिखर नसावे, अठराव्या शतकांत मराठा शैलीत जीर्णोध्दारीत शिखर कदाचित नंतर उभारले असेल. मंदिरावर बंगला–राजपुताना शैलीतील घुमट–छत्री आपल्याला बघायला मिळतात.

इस्लामिक राजवटीच्या साडे तीनशे वर्षांच्या काळांत यादवकालीन परंपरा नामशेष झाली होती. त्यामुळे साधारण देवगिरीच्या यादवांचा काळ ते मराठा साम्राज्य झाले. तो सतराव्या शतकाच्या अलीकडच्या काळातील मंदिरे किंवा धार्मिक इमारती क्वचितच दृष्टीस पडतात. त्यानंतर मराठा काळात सतराव्या–अठराव्या शतकाच्या सुरुवातीच्या वास्तू मुघल शैलीने प्रभावित झालेल्या दिसतात. वाढोण्याचे श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिर आणि शिरपूर येथील अंतरिक्ष पार्श्वनाथचे मुख्य मंदिर याच काळातील असावे, त्यामुळे ते इस्लामिक वास्तुकलेने प्रभावित झाले आहे, पहा प्रतिमा क्र. ९. तळघरातील क्षेत्रपाल मंदिर आणि अंतरिक्ष पार्श्वनाथ, पवळी मंदिर यादवकालीन आहे. इस्लामिक काळानंतर मराठ्यांची सत्ता आली, यादवांनंतर साडेतीनशे वर्षांनंतर आलेल्या मराठ्यांना, आपली वास्तुकला स्थापित करण्यासाठी कमी उदाहरणे असल्यामुळे त्यांनी राजस्थान–गुजरात येथून पारंपरिक कला आणि वास्तुकलेचे कारागीर आणून पुन्हा मंदिर वास्तुकला पुनरुज्जीवित केली. त्यामुळे मराठा काळात राजपुताना शैलीसह इतर शैलींचा प्रभाव पडला. दीडशे वर्षांत मराठ्यांनी आपली स्वतंत्र वास्तुकलेची शैली प्रस्थापित केली. (Sohoni, 1998).

साधारण अठराव्या शतकात आलेले फलटणचे जैन मंदिर मराठा शैलीतील आहे. अकराव्या–बाराव्या शतकांत स्थापिलेल्या नागपूर जिल्ह्यातील रामटेक तीर्थक्षेत्राला सोळा मंदिरांचा समूह आहे. ही मंदिरे विविध काळांत बांधल्या गेल्या आहेत. येथील काही मंदिरे अठराव्या शतकातील असून मराठा शैलीतील झुबकेदार कमानी, सुरूचे झाडासारखे खांब दिसतात. कमानीच्या टोकाला केळफुलासारखे लाकुडकाम असते.

पहा प्रतिमा क्रमांक १०. प्रतिमा क्रमांक ९ व १० : श्री १००८ आदिनाथ दिगंबर जैन मंदिर, वाढोणा व व आदिनाथप्रभू जैन मंदिर, फलटण. स्रोत : लेखिका

विदर्भ आणि दक्षिण महाराष्ट्र दोन्हीही वेगवेगळ्या सांस्कृतिक, भौगोलिक आणि राजकीय परिस्थितीत विकसित झाले. विदर्भाचा विकास सतराव्या शतकानंतर अधिक झाला, तर दक्षिण महाराष्ट्राला हजार वर्षांपूर्वीचा इतिहास आहे. विदर्भात स्थायिक झालेला बराचसा समाज हा राजस्थान– मध्य प्रदेशातून आलाय आणि त्यांनी येताना तेथील संस्कृती, कला सोबत आणली. पूर्वी विदर्भाचा काही भाग बेरार प्रांतात होता. विदर्भातील मंदिरांत आपल्याला एकाच मोठ्या हॉलमध्ये तीन–चार वेदी दिसतात आणि प्रत्येक वेदीच्यावर शिखर असते. दगड, विटा आणि चुन्यात येथील बांधकाम आहे. दक्षिण महाराष्ट्रात शिलाहार राजांच्या काळात कर्नाटकातून जैन समाज स्थायिक झाला. तेथील मंदिरे प्राचीन आणि डेक्कन ट्रॅप दगडातील असून ती बदामी चालुक्य व त्यानंतरच्या काळातील आहे. सममितीय (symmetrical) रचना असलेल्या या मंदिरांना गर्भगृहात वेदी आणि त्यावर शिखर असते. विदर्भातील एकोणिसाव्या विसाव्या शतकांत बांधलेल्या जैन मंदिरांना तळघर आणि काचकाम अधिक प्रमाणात असतात (Meghal-Lad, 2018). काचकाम पूर्वी क्वचित राहायचे, आता ते बऱ्याच मंदिरांमध्ये असते. सोलापूर जिल्ह्यातील दहीगाव येथे मंदिराला मोठे तळघर आहे आणि तेथे वेदीवर चोवीस तीर्थांकरांच्या मूर्ती आहेत. साधारण १९८० नंतर आरसीसी (RCC) मध्ये बांधलेल्या मंदिरांना मोठा हॉल असतो आणि एक वेदी असते ज्यावर मूर्ती स्थापित केलेली असते. अशा मंदिरांना वेदीभोवती प्रदक्षिणापथ असतो.

अशाप्रकारे सहाव्या शतकातून आतापर्यंत मंदिरांची रचना, त्यांचे बांधकाम साहित्य हे वेळेप्रमाणे, राजकीय व भौगोलिक परिस्थितीप्रमाणे बदलताना दिसते.

## ४. जैन मंदिर कला

जैन मंदिरांच्या प्रवेशद्वारावर दोन्ही बाजूला द्वारपाल फार पूर्वीपासून दिसतात. मंदिरच्या द्वारशाखेवर आपल्याला इस्लामिक पूर्व काळापासून असे द्वारपाल दिसतात. दक्खन भागातील जुनी मंदिरे बसाल्ट दगडातील दिसतात आणि त्यावर केलेले कोरीव कामही विविध स्वरूपात असते. शिखरातील कोरीव काम, गणेशपट्टी आणि द्वारशाखेवरील कोरीव काम, सुरसुंदरी असे विविध प्रकार बघायला मिळतात. गर्भगृहाच्या द्वारशाखेवरही कोरीव काम केलेले असून त्यावर द्वारपालही कोरले असतात. काही ठिकाणी जैन धर्मातील कथा शिल्पकलेतून आणि प्रतिकृतीतून येतात तसेच तीर्थंकरांच्या खड्गासन, कायोत्सर्ग मूर्त्या कोरलेल्या असतात. उत्तर महाराष्ट्र, विदर्भात नागपूर-कारंजा येथे धातूच्या दरवाज्यांवर तर दक्षिण महाराष्ट्रात दगडांवर हे कोरीव काम बघायला मिळते.

## ५. जैन तत्त्वज्ञान व वास्तुकलेतून प्रतिकात्मकता

जैन त्रिलोक रचनेप्रमाणे आठवे द्वीप हे नंदीश्वरद्वीप होय. त्याची प्रतिकृती राजस्थान मधील नंदीश्वरद्वीप मंदिरात आहे, जिथे मंदिरात चारही दिशांना तेरा देवकुलिका आणि मुख्य मूर्ती मंदिराच्या मध्यभागी वेदीवर विराजमान आहे. एकोणिसाव्या शतकातील या मंदिरांवरचे शिखर बघितल्यास आपल्याला जाणवते की राजस्थानी घुमटाकार असलेल्या या शिखराचे मांगी-तुंगी व मुक्तागिरी येथील मंदिरांच्या शिखराशी साधर्म्य आहे. दक्षिण महाराष्ट्रातील मंदिरात नंदीश्वरद्वीपाची संकल्पना लाकडी स्टँडच्या स्वरूपात दर्शवतात, त्याला नंदीश्वरस्टँड म्हणतात. ज्याच्या सर्वात वर नंदीश्वरची मूर्ती विराजमान करून खाली तीर्थंकर मूर्ती, पंचमेरू व इतर कलाकृती असतात. असे स्टॅन्ड दक्षिण महाराष्ट्रातील आणि कर्नाटकातील मंदिरांमध्ये अष्टान्हिकापर्वात मंदिरांत बघायला मिळतात (Meghal-Lad, 2022).

सुमेरूचे महत्त्व तीर्थंकर जन्माच्या वेळेस इंद्र त्यांना सुमेरू पर्वतावर नेऊन पहिला जन्माभिषेक होतो, तो भरत क्षेत्राच्या उत्तर दिशेला असल्यामुळे जैन धर्मात उत्तर दिशेचे महत्त्व आहे. हा जंबुद्वीप पट-पेन्टिंगच्या माध्यमातून मंदिरांत बघायला मिळतो, कुंथलगिरी तीर्थक्षेत्री असणाऱ्या प्रतिकृती मंदिरांतून आपणास दर्शन घेता येते.

जैनांत एक समावसरण संकल्पना आहे. याची प्रतिकृती चतुर्मुख मंदिर आपल्याला रनकपुर, राजस्थान येथे बघायला मिळते. मंदिराच्या चारही दिशांनी मंदिर प्रवेश असून, सरळ पायऱ्या चढून गेल्यावर मध्यभागी जिन भगवंतांची चतुर्मुख मूर्ती आहे. याचीच छोटी प्रतिकृती आपल्याला रामटेक तीर्थक्षेत्री दिसते, ज्याठिकाणी गोलाकार तीन पायऱ्या वर चढून गेल्यावर तीर्थंकरांची चतुर्मुख मूर्ती दिसते तर समावसरणाची छोटी प्रतिकृती कुंभोज-बाहुबली येथे आहे.

## ६. कला आणि स्थापत्यकलेत प्रकटीकरण

आता नवीन बांधल्या जाणाऱ्या मंदिरात आपणांस विविध संकल्पना बघावयास मिळतात.

सहस्रकूट मंदिर : सहस्त्रकूट मंदिर प्रकारात लाकडी, दगडी वा धातूच्या एका स्तंभावर चारही बाजूंनी १००८ जिनमूर्त्या कोरलेल्या असतात, असे मंदिर आपल्याला फलटण, बाहुबली, कारंजा आणि इतर बऱ्याच ठिकाणी बघावयास मिळते.

रत्नत्रय मंदिर : शांतिनाथ, कुंथुनाथ आणि अरनाथ या सोळा, सतरा आणि अठराव्या क्रमांकाच्या तीर्थंकरांना त्रिमूर्ती म्हणतात, त्यांची कायोत्सर्ग मूर्ती असलेले मंदिर आपल्याला बघावयास मिळते. कुंभोज-बाहुबली, कागल, कोल्हापूर नेमगिरी येथे ते बघायला मिळतात. हे तीर्थंकर, चक्रवर्ती आणि कामदेव असल्यामुळे यांना रत्नत्रय म्हणतात.

कमल व पिंछीचे छत असणारे मंदिर, कलशच्या आकाराचे मंदिर, ज्याला समवसरणा-प्रमाणे सरळ पायऱ्या असतात, असे विविध प्रकारात मंदिरे आणि इतर धार्मिक वास्तू बांधल्या जातात.

Elements typologies (घटक प्रकार)

अल्पसंख्याक जैन समाज वास्तुकलेतून

आपली वेगळी ओळख (cultural identity) निर्माण करण्याच्या हेतूने वास्तुकलेतील विविध प्रकारांबरोबर लघुप्रतिकृती, प्रतीकात्मक मंदिरे आणि घटक प्रकार बांधतात.

इस्लामिक काळांत जिनेंद्राच्या मूर्तीऐवजी प्रतीकात्मक पद्धतीने चरण पादुका स्थापण्याची पद्धत रूढ झाली. त्यासाठीच्या वास्तूला समाधी किंवा दक्षिण महाराष्ट्रात निशिदि म्हणतात. एक स्मारक, जे जैन मुनींच्या स्मरणार्थ बांधले जाते. अशा समाध्या बहुतेक तीर्थक्षेत्री दिसतात.

समवसरणाचे प्रतीकात्मक घटक म्हणून मानस्तंभ आपल्याला मंदिरांच्या प्रवेशावर गर्भगृहाच्या सरळ रेषेत स्थापिलेले दिसतात. त्यांना तीन पीठ असतात, त्यावर स्तंभ आणि वर चार दिशांना चार जिन मूर्ती असतात. रामटेक येथील नवीन मानस्तंभ हा चितोडगडच्या विजयस्तंभाप्रमाणे भव्य-दिव्य आहे. जिजाजी राठोड या जैन व्यापाराने बाराव्या शतकातील बांधलेला विजय स्तंभ राजठाण, चितोडगड येथे आहे. कीर्तिस्तंभ आपल्याला दक्षिण महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रांवर अधिक प्रमाणात दिसतात. कीर्तिस्तंभाच्या गोलाला चोवीस आरे असतात आणि तो स्तंभाच्या वरच्या बाजूला असतो. ध्वजस्तंभ हा आपल्याला दक्षिण महाराष्ट्रात आणि दक्षिण भारतात अधिक प्रमाणात बघायला मिळतो, तो मंदिराच्या प्रांगणात मंदिराकडे तोंड करून उभा करतात. ध्वजस्तंभाला तीन धातूच्या चपट्या पट्ट्या असतात, ज्यात ध्वज रोवल्या जातात (Meghal-Lad, 2022).

कायोत्सर्ग मूर्ती : एकाच पाषाणातून कोरलेल्या तीर्थंकरांच्या कायोत्सर्ग मूर्ती विविध ठिकाणी असतात. भगवान आदिनाथ वा भगवान बाहुबलींच्या मूर्त्या अधिक प्रमाणात असतात. मांगीतुंगी, कुंभोज-बाहुबली, उदगीर, कुंथलगिरी, नांदणी आणि कोल्हापूर मठ या ठिकाणी मोकळ्या जागेत त्या आपल्याला बघायला मिळतात. श्रवणबेळगोळ येथील भगवान बाहुबलीची लघु प्रतिकृती कुंभोज-बाहुबली येथे बघायला मिळते.

वरील सर्व घटक प्रकार आणि वास्तूंचे काही प्रकार आपल्याला ज्या ठिकाणी बघायला मिळतात ती जागा आहे, कोल्हापूर जिल्ह्यातील टेकडीच्या पायथ्याचे कुंभोज बाहुबलीचे मंदिर. याठिकाणी आपल्याला भारतातील जैन तीर्थक्षेत्रांच्या लघुप्रतिकृती बघायला मिळतात. भ. बाहुबलींची कायोत्सर्ग मूर्ती श्रवणबेळगोळचे छोटे रूप आहे. इथे सरळ पायऱ्या आहेत, प्रवेशावर दोन्ही बाजूला शुभ ऐरावताची शिल्पे आहेत. रत्नत्रय मंदिर, समवसरण मंदिर, सहस्रकूट मंदिर, देव कुलिका, नंदीश्वरद्विप मंदिर, सर्व प्रकारचे स्तंभ, समाधी, चरण पादुका अशी सर्व मंदिरे येथे बघावयास मिळतात. याच बरोबर भारतातील सर्व जैन तीर्थक्षेत्रांच्या प्रतिकृती येथे बघावयास व दर्शन करावयास मिळतात.

सध्या वर्तमान चोवीस तीर्थंकरांव्यतिरिक्त भूतकाळातील आणि भविष्यकाळातील असे बहात्तर तीर्थंकरमूर्ती स्थापित करण्याकडे काळ वाढतोय. एकूणच सांस्कृतिक ओळख दाखवण्यासाठी वास्तूकलेत प्रतीकवाद आणि लघुप्रतिकृती याकडे जैनांचा कल वाढताना दिसतोय. कोल्हापूर जिल्ह्यातील धर्मनगर, नाशिक जवळचे णमोकार तीर्थ येथे हे बघायला मिळते.

**७. चर्चा**

या अभ्यासात जास्तीत जास्त महाराष्ट्रातील तीर्थ- मंदिरे समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. वास्तुकलेची ही सर्व उदाहरणे सहाव्या-सातव्या शतकापासून आपल्याला दिसतात. प्रत्येक वास्तू आपल्याशी बोलते, त्याकाळची परिस्थिती, संस्कृती कथन करते. महाराष्ट्रातील विविध प्रदेशात वेगवेगळ्या भौगोलिक आणि सामाजिक, राजकीय परिस्थितीत ती विकसित झाली. यातील काही वास्तूंचे हिंदू मंदिराशी इतके साधर्म्य आहे की त्यातील मूर्तीच जैन मंदिर आणि हिंदू मंदिरातील फरक दाखवतो. एकाच शैलीतील ही मंदिरे एका राजवटीत साधारण त्याच कारागिरांनी बांधल्यामुळे आली. बांधण्यासाठी स्थानिक साहित्य, बसाल्ट

आणि जांभा दगडाचा वापर आपल्याला दिसतो.

दक्षिण महाराष्ट्रातील रचना महाराष्ट्रातील इतर ठिकाणाहून वेगळी आहे, मंदिरे हजार वर्षांपूर्वीची असून त्यात काचकाम, पेन्टिंग, गुंतागुंतीचे काम क्वचितच दिसते. या भागातील वैशिष्ट्य म्हणजे जैन गावे (Jain villages). दर चार ते पाच किलोमीटर वर एक छोटे गाव असते, गावात ४०-७० टक्के जैन घरे असून गावात कधी दोन-तीन जैन मंदिरेही दिसतात. जे दृश्य आपल्याला केवळ कोल्हापूर किंवा दक्षिण महाराष्ट्रात दिसते ते बाकी ठिकाणी नाही. महाराष्ट्राच्या इतर भागातील मंदिरे अभावानेच एव्हडी जुनी असून त्यांत आपल्याला काचकाम, लाकडावरील कोरीव काम बघायला मिळते.

तत्कालीन राज्यकर्त्यांच्या कला प्रेमामुळे स्थापित झालेल्या या धार्मिक वास्तू त्यावेळेसची स्थापत्य शैली किती विकसित होती, याचाच प्रत्यय देतात. काही वास्तू या बांधकाम वैशिष्ट्यांचा उत्कृष्ट नमुना आहेत. त्या जैन समाजाच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वैभवात भर घालतात. काही वास्तू या पूर्वी राजाश्रयातून उभ्या झाल्या आहेत तर काही खाजगी मालकीच्या असतात, पण तरीही त्या इतिहासाची साक्ष देत असतात. त्यामुळे त्यांचे महत्त्व थोडेही कमी होत नाही. या धार्मिक वास्तू आपला वारसा आहेत. आपला इतिहास सांगणारा हा वारसा आपल्याला पुढच्या पिढीपर्यंत न्यायचा आहे, त्यांचे जतन-संवर्धन करा. विविध उपाय योजनांनी आपण वारसा संरचनांचे आयुष्य वाढवू शकतो.

पोचपावती:

या सादरीकरणात मी पीएचडीच्या अभ्यासातील काही मंदिरांचा संदर्भ घेतला आहे, त्यासाठी मी माझे पीएचडीचे गाईड डॉ. अभिजित नातू सरांना धन्यवाद देते. यात काही पूर्व प्रकाशित शोध निबंधाचाही मी आधार घेतला आहे, महाराष्ट्रातील विविध ठिकाणी मला जैन मंदिरांच्या अभ्यासासाठी सहयोग केल्याबद्दल मी सर्व मंदिरांच्या ट्रस्टचे आभार मानते.

**संदर्भ :**

1. Ayyangar, R. (1922). Studies in South Indian Jainism. HOE and CO. atpremier Printing {ress.

2. Hardy, A. (1995). Indian Temple Architecture: Form and Transformation: the Karāa Drāvia Tradition, 7th to 13th Centuries. Abhinav Publications.

3. Maharaj, A. D. (2000). Devshil{a: Mandir Vastu evam Sthapatya. Narandrakumar Badajatya.

4. Meghal-Lad, P. (2018). Development of Jain Architecture from Caves to Tem{le Architecture in Maharashtra. International Journal of Engineering Research 7, 7(Special 2,), 7. https://doi.org/ 10.5958/2319-6890.2018.00054.5

5. Meghal-Lad, P. (2022). Investigating the characteristics of Jain religious architecture in Maharashtra: A case of Kolhapur district Savitribai Phule Pune University]. Pune.

6. Meghal-Lad, P. (2023). Emergence of Jain architecture from medieval period near ancient trading center, Nashik. Tulsi Prajna, 199 (July-Sept. 2023), 26.

7. Michell, G. (2015). Late tem{le architecture of India. Oxford University press.

8. Pranoti, M. L., & Abhijit, N. (2018). Bhattarak Tradition and Development of Jain Religious Architecture in Maharashtra International Conference on "Conversations in Conservation" SHAAPED 2019,, Manpial University, Karnataka.

9. Sangave, V. A. (1980). Jaina community a social survey (Second ed.). Bombay popular Prakashan.

10. Shah, B. R. (2011). The Sects and subsects of Jainism and their formation and history

11. Sohoni, A. (1998).Temple Architecture of the Marathas in Maharashtra De Montfort University]. Leicester.

**( छायाचित्रे आतील रंगीत पृष्ठ क्र. ०२वर)**

**वर्गणीदारांना विनंती...**

**कृपया, वार्षिक व आजीवन वर्गणीदारांना विनंती आहे की, आपली वाढीव वर्गणी पाठवून सहकार्य करावे..**

# कहाणी दोन अंतरिक्ष प्रतिमांची

**श्री. अमलप्रभ चवरे,** कारंजा लाड

**अमलप्रभ चवरे –परिचय**

B.E., M.B.A. विज्ञान, अभियांत्रिकी, विधिशास्त्र, संगीत, इतिहास, शिक्षण, जैनदर्शन अशा विविध विषयांमध्ये उत्तम रुची व गती. मराठी, इंग्रजी, हिंदी भाषांवर विशेष प्रभुत्व. चौफेर व चोखंदळ वाचन. उत्कृष्ट लेखन व शैलीदार वक्तृत्व. शोधनिबंधांची अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी.

**प्रस्तावना**

भारत हा मंदिरांचा देश म्हणून ओळखला जातो, जिथे भव्य स्थापत्यशास्त्र, उत्कृष्ट कलाकृती आणि प्राचीन वारसा लाभलेली अनेक मंदिरे आहेत. तथापि, यातील काही मंदिरे जनमानसात विशेष लोकप्रिय ठरतात ती त्यांच्याशी निगडित चमत्कारांमुळे किंवा अलौकिक घटनांच्या समजुतींमुळे. 'अंतरिक्ष पार्श्वनाथ' हा असाच एक शब्दप्रयोग आहे, जो अशा मूर्तींना सूचित करतो. ज्या हवेत तरंगत असल्याचे किंवा आधाराविना स्थिर असल्याचे मानले जाते. शिरपूर आणि नेमगिरी येथील पार्श्वनाथ स्वामींच्या मूर्ती या श्रेणीत येतात, आणि त्या खरोखरच चमत्कार आहेत की त्यामागे काही प्राचीन विज्ञान दडलेले आहे, याचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते. आपल्या पूर्वजांनी किती अद्भुत कार्य केले आहे, हे समजून घेण्यासाठी या मूर्तींचा इतिहास, शिल्पशैली आणि वैज्ञानिक पैलूंचे अभ्यासपूर्ण विश्लेषण आवश्यक आहे.

**चमत्कारांचे आकर्षण**

भारतामध्ये प्रत्येक धर्म, जात आणि जमातीची शेकडो मंदिरे आढळतात. काही मंदिरे त्यांच्या भव्यतेसाठी, काही त्यांच्या विलक्षण शिल्पकलेसाठी, तर काही त्यांच्या अभियांत्रिकी कौशल्यासाठी प्रसिद्ध आहेत. परंतु सामान्य जनतेच्या मनात खोलवर रुजलेली मंदिरे तीच असतात जिथे काहीतरी चमत्कार घडतात किंवा काहीतरी वेगळेपण अनुभवले जाते. उदाहरणार्थ, कोणार्कचे सूर्यमंदिर ओडिसा शिल्पशैलीचे एक अप्रतिम उदाहरण असले तरी, तेथील मार्गदर्शक अनेकदा मंदिरातील सूर्याची मूर्ती पूर्वी हवेत तरंगत असल्याचे सांगण्यावर अधिक भर देतात. तसेच सोमनाथ मंदिरातील शिवलिंगाविषयीही ते पूर्वी अधांतरी होते अशी आख्यायिका प्रचलित आहे. ही मानवी मनाची चमत्कारांकडे आकर्षित होण्याची एक स्वाभाविक प्रवृत्ती आहे.

**नेमगिरी आणि शिरपूर येथील अंतरिक्ष मूर्ती**

जैन परंपरेत आणि इतरही अनेक लोकांच्या दृष्टीने, जर ज्या आख्यायिकांमध्ये आपण अंतरिक्ष मूर्तींविषयी ऐकतो, त्या प्रत्यक्षात आज अस्तित्वात असतील तर तो एक कुतूहलाचा आणि आदराचा विषय ठरतो. महाराष्ट्रात अशा दोन महत्त्वाच्या मूर्ती आपल्या जवळ आहेत : एक जिंतूरजवळील नेमगिरी येथे आणि दुसरी वाशिम जिल्ह्यातील शिरपूर येथे. या दोन्ही ठिकाणच्या पार्श्वनाथ स्वामींच्या मूर्ती 'अंतरिक्ष' म्हणजे तरंगत असल्याचा समज आहे. या दोन्ही स्थळांमधील अंतर साधारणतः १०० किलोमीटर आहे. एकाच भगवंताच्या दोन मूर्ती, त्याही अंतरिक्ष स्वरूपाच्या, इतक्या कमी अंतरावर असणे हा एक विलक्षण योगायोग मानला जातो, आणि भारतात अशा प्रकारच्या मूर्ती इतरत्र आढळल्याचे ऐकिवात नाही. यामुळे या मूर्तींचा अभ्यास अधिक महत्त्वाचा ठरतो.

**नेमगिरीचा इतिहास आणि जीर्णोद्धार**

नेमगिरी हे जिंतूरपासून साधारणतः तीन किलोमीटर अंतरावर एका टेकडीवर असलेले एक प्राचीन जिनालय आहे. जिंतूरचे मूळ नाव 'जैनपूर' होते असे मानले जाते, जे राष्ट्रकूट राजांच्या सत्तेखालील एक समृद्ध जैन केंद्र होते. आख्यायिकेनुसार, तिथे १४ जिनालये आणि सुमारे ३०० जैन कुटुंबे राहत होती. सुमारे १२५० ते १३०० इसवी सनाच्या दरम्यान जिंतूर एक अत्यंत संपन्न शहर होते, ज्याभोवती तटबंदी होती. मात्र, त्यानंतर सैयद सैदुल कादरी नामक मुस्लिम सेनापतीने (ज्यांना आता 'वली' किंवा संत मानले जाते !) या शहरावर आक्रमण करून पूर्ण नासधूस केली. त्यावेळी केवळ दोन मंदिरे शिल्लक राहिली आणि इतर मंदिरांमधील मूलनायक मूर्ती या दोन मंदिरांमध्ये हलवण्यात आल्या. या आक्रमणाची प्रेरणा अजमेरच्या ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांनी दिली असा उल्लेख कादरींच्या दर्ग्यातील एका हस्तलिखितामध्ये असल्याचा दावा जिंतूरमधील मंडळी करतात. मात्र त्याची ऐतिहासिक सत्यता पडताळलेली नाही. तरीही हे निर्विवाद आहे की १३०० इसवी सनाच्या नंतर जिंतूर या संपन्न जैनबहुल गावाचा पूर्ण ऱ्हास झाला आणि नेमगिरीची मंदिरे टेकडीखाली दबून विस्मृतीत गेली.

सोळाव्या शतकाच्या दरम्यान, वीर संघवी नावाचे एक धनाढ्य व्यापारी नांदगाव पेठ येथून जिंतूर भागात येत असत. त्यांना एकदा जिंतूरला असताना स्वप्न पडले की या टेकडीखाली मूर्ती आहेत. या स्वप्नानंतर वीर संघवींनी आपल्या कुटुंबासह (पत्नी, तीन मुले आणि सुना) जिंतूरला स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. त्यांनी त्या जागेचे उत्खनन केले आणि शके १५४७ म्हणजेच १६११ इसवी सनात मंदिराचा जीर्णोद्धार केला. सध्याचे मंदिराचे गुहेसारखे स्वरूप त्यांच्या पुनर्बांधणीनंतरचे आहे. मंदिराच्या वेदीवर वीर संघवी आणि त्यांच्या कुटुंबाचे उत्कीर्णन केलेले असून, प्रतिष्ठा लेखातही त्यांच्या जीर्णोद्धाराचा उल्लेख आहे. आजही जिंतूरमधील कळमकर परिवार, जे वीर संघवींचे वंशज आहेत, या क्षेत्राचे परकीय आक्रमणे आणि इतर संकटांपासून रक्षण करत आहेत. त्यांचे हे योगदान अतुलनीय आहे.

### नेमगिरी मूर्तींचा कालखंड

वीर संघवींनी १६११ इसवी सनात जीर्णोद्धार केला हे निश्चित असले तरी, मूर्ती त्याहून प्राचीन आहेत. मूर्तीच्या वेदीच्या बाजूला कोरलेले सिंह हे वीर संघवींच्या कुटुंबाच्या कोरीव कामापेक्षा जुने आणि अधिक झिजलेले दिसतात. या सिंहाची शैली राष्ट्रकूट राजांच्या राजचिन्हातील सिंहाशी मिळतेजुळती आहे (राष्ट्रकूट राजे सिंह आणि गरुड ही दोन चिन्हे वापरत असत). यावरून असा तर्क करता येतो की या मूर्तींची निर्मिती राष्ट्रकूट राजवंशाच्या सुरुवातीच्या काळात, म्हणजेच राजा अमोघवर्षाच्या काळात झाली असावी. या तर्काला नेमगिरीच्याच मंदिरातील बाहुबली भगवंतांच्या मूर्तीची शैली पुष्टी देते, जी मेट्रोपॉलिटन म्युझियम ऑफ आर्टमधील सातव्या शतकातील बाहुबली प्रतिमेशी लक्षणीय साम्य दर्शवते. राष्ट्रकूट काळातील मूर्तींमध्ये 'उषनिश' (मूर्तीच्या डोक्यावरील उंचवटा, केस वर बांधल्यासारखा) हे एक वैशिष्ट्यपूर्ण लक्षण सर्वप्रथम दिसते, जे नेमगिरी येथील सर्व प्रतिमांमध्ये आढळते.

### नेमगिरी येथील अंतरिक्ष पार्श्वनाथ मूर्तीचे विश्लेषण

नेमगिरी येथील अंतरिक्ष पार्श्वनाथ स्वामींची मूर्ती काळ्या बसाल्ट दगडापासून बनलेली आहे. हा दगड मलखेड (मान्यखेट), जी राष्ट्रकूट राजांची राजधानी होती, त्या भागातील खाणींमधून आणला असावा अशी शक्यता आहे. हा 'फाईन ग्रेन बसाल्ट' असून, त्यात सिलिकाचे प्रमाण कमी असते. तो कोरायला कठीण असला तरी, कोरल्यानंतर अत्यंत टिकाऊ, आकार घेणारा आणि सहजासहजी न झिजणारा आहे. वेरूळ (वेरूळ) येथील लेण्यांमधील बसाल्टपेक्षा तो वेगळा असून, हा बसाल्ट लालसर आणि सहज तुटणारा नसून,

मलखेड परिसरात आजही आढळणाऱ्या बसाल्टसारखा आहे. नेमगिरीच्या मूर्तींचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांना दिलेले उत्कृष्ट पॉलिश, ज्यामुळे त्यांना आजही कोणत्याही लेपाची किंवा दुरुस्तीची गरज भासलेली नाही. या पॉलिशचे श्रेय दगडाच्या उत्तम गुणवत्तेला आणि कारागिरांच्या कौशल्याला जाते.

**'अंतरिक्ष' असण्याचा दावा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन :**

ही मूर्ती खरंच अधांतरी आहे का, या प्रश्नावर प्रथमदर्शनी मूर्तीच्या मागे लावलेला दिवा आणि त्याचे खाली पडणारे प्रतिबिंब यामुळे ती तरंगत असल्याचा भास होतो. मात्र, मूर्तीच्या मागच्या बाजूने बारकाईने निरीक्षण केल्यास, साधारणतः एक इंच बाय सव्वा इंच आकाराचा एक छोटा आधारस्तंभ दिसून येतो. भाविकांकडून या आधाराखाली पैसे फेकणे हे त्यांच्या 'घोर श्रद्धे'चे प्रतीक आहे. मूर्तीचा फणा आणि मागील भाग पॉलिश केलेला नाही, तर उर्वरित मूर्तीला पॉलिश आहे. मूर्तीचा फणा प्रचंड मोठा असून, अनेकजण त्याला 'ॐ' आकाराचा मानतात, परंतु यामागे वैज्ञानिक कारण असू शकते. मूर्तीच्या खालच्या भागाचे काळजीपूर्वक निरीक्षण केल्यास, डाव्या कोपऱ्यात सिमेंटचा भाग (नंतरचा जोडलेला) आणि त्याच बसाल्ट दगडाचा मूळ भाग दिसतो.

या निरीक्षणांवरून असा तर्क काढता येतो की कारागिरांनी मूर्ती तयार करताना एक अखंड शिळा वापरली असावी, जी मूर्तीच्या पायापासून फण्याच्या टोकापर्यंत पुरेसी होती. त्यांनी मूर्ती कोरून, वेदी आणि मूर्तीचा पाया यामधील अनावश्यक दगड हळूहळू काढत नेला, जोपर्यंत मूर्तीचा गुरुत्वमध्य (Center of Gravity) एका लहानशा आधारावर स्थिर होत नाही. मूर्तीच्या हातांची ठेवणही वैशिष्ट्यपूर्ण आहे; पद्मासनातील सामान्य कोनाऐवजी हात थोडे समोर आलेले आहेत, ज्यामुळे हाताची बोटे पायांच्या थोडी पुढे येतात. यामुळे मूर्तीचा आधार विस्तारतो. ही मूर्ती खूप मोठी असून, तिचे वजन सात टन किंवा त्याहून अधिक असू शकते.

**अमोघवर्ष आणि राष्ट्रकूट राजांचे जैन धर्माला पाठबळ**

राष्ट्रकूट राजांमधील सहावा राजा अमोघवर्ष हा जैन इतिहासातील एक महत्त्वाचा शासक होता. त्याने सुमारे ६०-६५ वर्षे राज्य केले. आचार्य गुरु आणि इतर महत्त्वाच्या व्यक्तींप्रमाणेच खारवेल आणि अमोघवर्ष यांसारख्या राजांचे स्मरणही जैन धर्माच्या इतिहासात महत्त्वाचे आहे. अमोघवर्ष आणि इतर राष्ट्रकूट राजे हे जैन धर्माचे मोठे समर्थक आणि अनुयायी होते, तरीही त्यांनी इतर धर्मांनाही समान पाठबळ दिले. अमोघवर्षाच्या काळातच महावीराचार्यांनी 'गणितसार' हा ग्रंथ लिहिला, आणि आचार्य जिनसेन हे त्यांचे गुरु होते असा उल्लेख आढळतो. त्याला 'नृपतुंग' (राजांमध्ये सर्वोत्तम) आणि 'कुलोत्तम' अशा अनेक पदव्या लोकांनी दिल्या होत्या, आणि इतर धर्मांनाही समान पाठबळ दिल्यामुळे त्याला 'दक्षिणेचा अशोक' असेही म्हटले जात असे. हा पराक्रमी आणि दीर्घकाळ राज्य केलेला जैन राजा होता, आणि त्याच्या काळात अनेक महत्त्वाच्या प्रतिमा आणि गोष्टींची निर्मिती झाली.

**शिरपूरचा इतिहास आणि आख्यायिका**

शिरपूरचे जुने नाव 'श्रीपूर' असावे असे मानले जाते, जे भाषाशास्त्रीयदृष्ट्याही शक्य आहे. शिरपूरच्या मूर्तीशी निगडित एक आख्यायिका प्रचलित आहे. मैनासुंदरीच्या कथेतील श्रीपाल राजा वेगळा असला तरी, या आख्यायिकेतील श्रीपाल राजाला कुष्ठरोग झाला होता. एकदा तो शिरपूर परिसरात फिरत असताना, एका मंदिरांजवळील विहिरीच्या पाण्याने स्नान केल्यावर त्याचा कुष्ठरोग दूर झाला. त्याच रात्री त्याला स्वप्न पडले की ज्या विहिरीच्या पाण्याने स्नान केले, त्यात एक मूर्ती

आहे. ती मूर्ती बाहेर काढण्याची विधी अशी होती की, ‘धांड्यांचा’ (पेरकंड) रथ किंवा पालखी बनवून तिला कच्च्या सुताने बांधावे, विहिरीत सोडून मूर्ती वर आल्यावर सात दिवसांच्या वासरांना त्या रथाला बांधून मूर्ती घेऊन जावी. अट फक्त एकच होती की मागे वळून बघायचे नाही. श्रीपाल राजाने सर्व केले, मूर्ती बाहेर येऊ लागली; परंतु मूर्ती येते की नाही हे पाहण्यासाठी त्याने मागे पाहिले. त्यामुळे मूर्ती जिथे होती तिथेच थांबली. तिला हलवण्याचे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले, आणि शेवटी मूर्ती जिथे होती, तिथेच तिच्याभोवती मंदिर बांधले गेले.

आजही श्रीपाल राजाचा कुष्ठरोग दूर झालेली विहीर (ज्याला ‘पवळी मंदिर’ म्हणतात, ‘पवळी’ म्हणजे विहीर) आणि मूर्तीचे सध्याचे स्थान यात साधारणतः ४ किलोमीटरचे अंतर आहे (एरियल अंतर १.२ किमी, रस्त्याने २.८ किमी).

## शिरपूर येथील अंतरिक्ष पार्श्वनाथ मूर्तीचे विश्लेषण

शिरपूरची मूर्तीही नेमगिरीच्या मूर्तीप्रमाणेच काळ्या बसाल्ट दगडापासून बनलेली आहे. तिच्यावरही ‘उषनिश’ आणि राष्ट्रकूट मूर्तींवरील इतर वैशिष्ट्यपूर्ण चिन्हे दिसतात. ही पार्श्वनाथ स्वामींची मूर्ती असून, नेमगिरीच्या मूर्तीसारखे तिला पॉलिश नाही. ही मूर्ती अंतरिक्ष आहे का, या प्रश्नावर बारकाईने विश्लेषण केल्यास असे दिसते की मूर्तीच्या डाव्या बाजूचा भाग आधाराला टेकलेला आहे. मूर्तीचा फणा मूर्तीपेक्षा बराच मोठा असून, धरणेंद्राचे (नागराजाचे) मोठे स्वरूप दर्शवतो. मूळ मूर्ती संपल्यानंतर खाली एक छोटीशी पेडेस्टल (वेदी) दिलेली आहे. या रचनेमागे मोठे विज्ञान दडलेले आहे.

या मूर्तीच्या कालखंडाविषयी काही कवी कल्पना प्रचलित आहेत, जसे की ती ११ लाख ८० हजार वर्षे जुनी आहे, जे ऐतिहासिक आणि वैज्ञानिक दृष्ट्या शक्य नाही. तसेच, ती सँडस्टोनची मूर्ती असल्याचा दावाही चुकीचा आहे, कारण भारतात काळा सँडस्टोन केवळ मध्य प्रदेशच्या सागर जिल्ह्यात आढळतो. प्रत्यक्षात, ती कमी सिलिका असलेला बसाल्ट दगड आहे.

## संतुलन कलेचे विज्ञान आणि नैसर्गिक दाखले

एखादी मोठी वस्तू अगदी लहान आधारावर कशी संतुलित राहू शकते, यावर निसर्गात अनेक उदाहरणे आढळतात. फिनलंडमधील एक ५०० टनांचा दगड दीड फूट बाय एक फुटाच्या आधारावर उभा आहे. भारतात महाबलीपुरम येथील ‘कृष्णा बटर बॉल’ हेही असेच एक प्रचंड मोठे दगड लहानशा आधारावर स्थिर असण्याचे उदाहरण आहे. याहूनही आश्चर्यकारक म्हणजे, १००० टनांहून अधिक वजनाचा दगड अगदी छोट्याशा आधारावर उभा असल्याची उदाहरणे आहेत.

शिरपूरच्या मूर्तीच्या बाबतीत, एक भाग गुडघ्याच्या बाजूला टेकलेला आहे. मूर्ती भिंतीमध्ये असल्याने मागची बाजू दिसत नाही, परंतु मूर्तीच्या प्रक्षालनेच्या वेळी केलेल्या बारकाईने निरीक्षणातून असे दिसून आले की, मूर्तीच्या फण्याच्या भागातून आणि खालच्या पेडेस्टलमधून एक छोटासा दगडाचा स्पर बाहेर येऊन मागच्या भिंतीत जोडलेला आहे.

या मूर्ती अंतरिक्ष नसल्या तरी, त्यांचे महत्त्व कमी होत नाही. चमत्कारांवर आधारित महत्त्व असण्याची आवश्यकता सुजाण लोकांना नसते. या मूर्ती शिल्पशैलीचा सर्वोच्च बिंदू आहेत. त्यांच्यामागे दडलेले विज्ञान, गुरुत्वमध्य समायोजित करण्यासाठी कारागिरांनी वापरलेली तंत्रे सोपी अथवा सरळ नाहीत. आजच्या संगणक आणि थ्रीडी इमेजिंगच्या युगातही असे कार्य करणे आव्हानात्मक वाटते, मग प्राचीन काळात ते कसे केले असेल, हा एक मोठा प्रश्न आहे.

## मूर्ती कलेचा हा चमत्कार समजून घेण्यासाठी काही वैज्ञानिक पैलू विचारात घेतले जातात :

१. मोठे फणे : दोन्ही मूर्तींना मोठे आणि विस्तृत फणे आहेत, जे मूर्तीच्या वजनाला प्रतिसंतुलित करण्याचे

काम करतात. एवढ्या मोठ्या फण्याची इतर कोणतीही गरज सामान्यतः नसते.

२. तिरपी रचना (शिरपूर) : शिरपूरची मूर्ती किंचित तिरपी कोरलेली आहे, जिची उजवी बाजू डावीपेक्षा थोडी वर आहे. यामुळे गुरुत्वमध्य डाव्या बाजूला सरकतो आणि संतुलन साधले जाते.

३. हातांची ठेवण : दोन्ही मूर्तींचे हात थोडे समोर आलेले आहेत, ज्यामुळे मूर्तीचा आधार वाढतो. फण्याचे वजन आणि हातांची ही स्थिती एकमेकांना लिव्हरप्रमाणे प्रतिसंतुलित करतात.

ही सर्व रचना संगणक किंवा गणिताच्या मदतीशिवाय त्या काळात करणे, हे खरंच मूर्ती कलेचा एक चमत्कार आहे. मॅग्नेटिक लेविटेशन (चुंबकीय तरंगणे) किंवा सुपरकंडक्टिव्हिटी (अतिसंवाहकता) यांसारख्या आधुनिक संकल्पना त्यावेळी ज्ञात नव्हत्या आणि त्यांच्या शक्यताही वैज्ञानिकदृष्ट्या या संदर्भात नाकारल्या जातात (उदा. चुंबकीय क्षेत्र नसणे, तापमान बदलावर अस्थिरता) . त्यामुळे प्राचीन कारागिरांनी गुरुत्वमध्य काढण्यासाठी प्रायोगिक पण अत्यंत अचूक अशी काहीतरी पद्धत वापरली असावी असे दिसते.

**राष्ट्रकूट काळातील पार्श्वनाथ प्रतिमांचे महत्त्व**

राष्ट्रकूट राजांना पार्श्वनाथांविषयी विशेष प्रेम होते. बहुतांश प्रसिद्ध पार्श्वनाथ प्रतिमा राष्ट्रकूट काळातील आहेत. राष्ट्रकूट राजांमध्ये नागवंशातील एका राजकन्येचे लग्न झाले होते आणि नागांचे प्रतीक हे पार्श्वनाथांच्या फण्याशी संबंधित असल्याने हे एक कारण असू शकते. या काळातील पार्श्वनाथ मूर्ती शैलीत लक्षणीय साम्य दर्शवतात. मुक्तागिरी येथील मूलनायक पार्श्वनाथ स्वामींची मूर्ती आणि कारंजा येथील सेनगण मंदिरामधील पार्श्वनाथ स्वामींची मूर्ती ही याची उत्तम उदाहरणे आहेत. या मूर्तीही अचलपूरच्या तलावात किंवा नदीच्या पात्रात सापडल्याच्या आख्यायिका आहेत. मूर्ती नेहमी विहिरीत किंवा नदीत का सापडतात, यावर विचार केल्यास, परकीय आक्रमकांपासून बचाव करण्यासाठी त्या लपवून ठेवल्या गेल्या असाव्यात असा एक तर्क आहे. तथापि, राष्ट्रकूट राजांचा ३०० वर्षांचा कालखंड जैन धर्मीयांसाठी अनुकूल होता. जैन धर्माविषयीचा विद्वेष दहाव्या-अकराव्या शतकात आदि शंकराचार्यांनंतर आणि तमिळनाडूमध्ये सातव्या-आठव्या शतकात भक्ती परंपरेनंतर सुरू झाला. त्यामुळे राष्ट्रकूट काळात मूर्ती विहिरीत लपवण्याची गरज नसावी. कदाचित, मूर्तींचे महात्म्य वाढवण्यासाठी आणि चमत्काराला नमस्कार करण्याची प्रवृत्ती त्या काळीही होती, त्यामुळे अशा आख्यायिका तयार झाल्या असाव्यात.

**अकादमिक दृष्टीने मूर्तींचे महत्त्व**

विल डुरांट म्हणतात की, 'संस्कृती येतात आणि जातात, पण श्रद्धा कायम राहते.' या मूर्ती खरोखरच अंतरिक्ष आहेत की नाहीत, हा श्रद्धेचा विषय असू शकतो. तथापि, या मूर्तींचे महत्त्व केवळ त्यांच्या 'अंतरिक्ष' असण्यावर अवलंबून नाही. त्या भारतीय शिल्पशैलीचा सर्वोच्च बिंदू आहेत. या मूर्तींमागे दडलेले विज्ञान, गुरुत्वमध्य अचूकपणे समायोजित करण्याचे कौशल्य, हे आजही विस्मयकारक आहे. त्यांचे मनोज्ञ आणि शांत स्वरूप अद्भुततेचे दर्शन घडवते. वैराग्य आणि शांती या भावनांना मूर्त रूप मिळाले असेल, तर ते या मूर्तींच्या रूपाने आपल्यासमोर येते असे वाटते. त्यामुळे, या मूर्तींचे 'अंतरिक्ष' असणे किंवा नसणे हा मुद्दा गौण ठरतो; त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व त्यांच्या शिल्पकलेच्या उत्तुंगतेत आणि त्यांच्यातून प्रकट होणाऱ्या आध्यात्मिक शांततेत आहे.

**आभार-**

या अभ्यासासाठी नेमगिरी संस्था, शिरपूर, मुक्तागिरी आणि कारंजा येथील सेनगण मंदिरांनी मूर्तींचे छायाचित्रे वापरण्याची परवानगी दिली. तसेच, समंतभद्र सेंटर फॉर जैनिझमने या विषयावर सादरीकरण करण्याची संधी दिली. या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**( छायाचित्रे आतील रंगीत पृष्ठ क्र. ०२वर)**

# पंचकल्याणक पट – एक प्राचीन कला वैभव

**– प्रज्ञा डोणगावकर,** कारंजा (लाड)
९८८१९००६७२

**जैनांची दक्षिणेतील काशी– कारंजा(लाड)**

विदर्भातील कारंजा–लाड हे छोटेखानी शहर ऐतिहासिक दृष्टीने व धार्मिक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'जैनांची दक्षिणेतील काशी' म्हटले जाणारे हे शहर लक्ष्मीबरोबरच सरस्वतीच्या उपासनेसाठी प्रसिद्ध आहे. अनेक प्राचीन मूर्तिलेख, ग्रंथ–कागदपत्रे यातील माहितीच्या आधारे येथील जैन समाजाच्या अस्तित्वाची पाळेमुळे इसवी सनाच्या चौदाव्या शतकातील राजस्थानच्या मेवाड प्रांतापर्यंत जाऊन पोहोचतात. ग्रंथांतील वर्णनावरून तत्कालीन कार्यरंजकपुर अर्थात कारंजाच्या जैन समाजाच्या संस्कृतीचे, संपन्नतेचे, ज्ञानसाधनेचे, उदारतेचे दर्शन घडून येते. कारंजा शहराच्या लाड या उपाधीचा संदर्भ देखील शतकानुशतके येथे वास्तव्य करून असलेल्या जैन धर्मीयांच्या प्रभावशाली अस्तित्वाशीच जुळलेला आहे. कारण फार पूर्वीपासून येथील जैन समुदाय लाड या नावानेच ओळखला जातो. येथील तीन भव्य जैन मंदिरे वेगवेगळ्या वैशिष्ट्यांनी समृद्ध आहेत. तीन गणगच्छांच्या तीन भट्टारक पीठांना विद्वान भट्टारक गुरुंची दीर्घ परंपरा लाभली आहे. शिवाय ही तीन मंदिरे, गुरुकुल संस्था मिळून प्राचीन हस्तलिखित ग्रंथांचा (Manuscrpits) एक विशाल संग्रह येथे उपलब्ध आहे.

महत्त्वाचे म्हणजे जैन संस्कृती, साहित्य, ग्रंथ संपदा, चित्रकला, मूर्तिकला, काष्ठकला, गुरुकुल शिक्षण प्रणाली, सुदीर्घ विद्वत् परंपरा या सर्वांचा हा अतुलनीय वारसा या गावाने आजतागायत प्रयत्नपूर्वक जपला आहे, वृद्धिंगत केला आहे. देश–विदेशातील संशोधकांना कारंजाचे आकर्षण आहे ते याचमुळे!

**चित्रकलेच्या क्षेत्रातील योगदान –**

प्राचीन व अर्वाचीन काळातही विद्येच्या व कलेच्या सर्व शाखांमध्ये भारतीय संस्कृतीला समृद्ध करण्यासाठी जैन परंपरेने मोलाचे योगदान दिले आहे. यापैकी चित्रकलेच्या क्षेत्राचा विचार केला असता, सुमारे ११०० वर्षांपूर्वी जैनाचार्य श्री जिनसेन यांनी रचलेल्या आदिपुराण या महाकाव्यात कापडावर रंगवलेल्या चित्रपटाचा उल्लेख व वर्णन आढळते, हा ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचा पुरावा आहे. पुढील काळात भूर्जपत्रावर किंवा कागदावर लिहिलेले हस्तलिखित ग्रंथ हे त्यातील विषयाला अनुरूप अशा चित्रांनी सजविण्यात येत असत. ही परंपरा मागील शतकापर्यंत अखंडित सुरू होती. कारंजा ग्रंथ भांडारातही असे काही सचित्र ग्रंथ आढळून येतात. पण मी ज्या पटाविषयी बोलणार आहे, तो ग्रंथ नसून एका लांब कापडावरील चित्रमालिका, scroll painting, आहे.

इसवी सनाच्या सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात निर्मित, तीर्थंकर ऋषभदेव यांच्या पंचकल्याणकांचे चित्रण असलेली ही एक अनुपम सुंदर कलाकृती आहे, जिला 'स्वर्ण पंचकल्याणक पट' या नावाने ओळखले जाते. हा पट कारंजातील श्री पार्श्वनाथ स्वामी दिगंबर जैन सेनगण मंदिर येथे सुरक्षित स्वरूपात ठेवला आहे. हे मंदिर संगमरवरी मानस्तंभ, भ. सुपार्श्वनाथांची मनोज्ञ प्रतिमा, नंदीश्वर काच मंदिर, अँटिक शँडेलिअर्स आणि केवळ या मंदिराचाच नव्हे, केवळ जैन संस्कृतीचाच नव्हे तर, संपूर्ण भारतीय संस्कृतीचा वैभवशाली वारसा असणाऱ्या पंचकल्याणक पटासाठी प्रसिद्ध आहे.

**चित्र विषय–**

जैन आगमानुसार कालचक्राच्या विशिष्ट आवर्तनात तीर्थंकर, चक्रवर्ती इत्यादी अनेक श्रेष्ठ महापुरुषांचा जन्म होतो. यापैकी तीर्थंकर हे सर्वश्रेष्ठ

असून त्यांची संख्या चोवीस असते. हे चोवीसही तीर्थंकर आपापल्या जीवन कालात आत्मसाधनेच्या द्वारे वीतरागता (म्हणजे सर्व विकारांचा संपूर्ण अभाव) आणि केवलज्ञान (म्हणजे ज्ञानाची परम उत्कृष्ट व परम शुद्ध अवस्था) प्राप्त करून घेऊन निर्वाण अर्थात मुक्ती मिळवतात. त्यांच्या उपदेशाच्या निमित्ताने इतर असंख्य जीवांना देखील मुक्तीचा मार्ग शोधण्याची प्रेरणा मिळते. प्रत्येक तीर्थंकरांच्या जीवनातील गर्भ, जन्म, दिगंबर मुनी दीक्षा ग्रहण, केवल ज्ञानाची प्राप्ती व निर्वाण या पाच महत्त्वाच्या घटना, ज्या संपूर्ण विश्वासाठी अत्यंत कल्याणकारी किंवा मंगल ठरतात, त्यांना तीर्थंकरांचे पंचकल्याणक किंवा पंच मंगल म्हटले जाते.

वर्तमान तीर्थंकर परंपरेतील अंतिम म्हणजे चोवीसावे तीर्थंकर भगवान महावीर हे सुमारे २६०० वर्षांपूर्वी होऊन गेले, हे आपण सर्व जाणतोच. त्याच्या फार फार पूर्वी होऊन गेलेल्या प्रथम तीर्थंकरांचे नाव आदिनाथ किंवा ऋषभनाथ आहे.

आचार्य जिनसेन कृत 'आदिपुराण' (काल इ. स. ८१८–८७८) या महाकाव्यात तीर्थंकर ऋषभनाथांच्या पंचकल्याणक महोत्सवांचे अतिशय विस्तृत व अद्भुतरम्य असे वर्णन केलेले आहे. तत्कालीन अन्य जैन–जैनेतर संस्कृत काव्यांप्रमाणेच हे महाकाव्य देखील शांतरस, वीररस, शृंगार रस, कारूण्य आदि नवरसांनी, उपमा–उत्प्रेक्षा आदि साहित्य अलंकारांनी, भव्यता, अद्भुतरम्यता या वैशिष्ट्यांनी ओतप्रोत भरलेले आहे. या पटावरील पंचकल्याणकांचे चित्रण या महाकाव्यातील वर्णनावर आधारित आहे, असे दिसून येते.

**काल निर्णय–**

या पटाच्या निर्मितीविषयी किंवा चित्रकाराविषयी कोणतीही अधिकृत माहिती मंदिरात उपलब्ध नाही. परंतु रंग विश्लेषण व चित्रशैली यांच्या अभ्यासावरून असे दिसून येते की, या कलाकृतीची निर्मिती इसवी सनाच्या सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात, म्हणजे इ.स. १६५० ते १६८० च्या दरम्यान झाली असावी. त्यावेळी कारंजा सेनगण मंदिराचे पीठासीन भट्टारक जिनसेन स्वामी होते. भट्टारक जिनसेन यांचा जनसंपर्क भरपूर मोठा होता, त्यांनी अनेक तीर्थयात्रा, प्रतिष्ठा महोत्सवांचे नेतृत्व केले होते. कारंजा लाड येथील तत्कालीन जैन समाज आर्थिकदृष्ट्या अतिशय संपन्न होता, सोबतच विद्येची उपासना करणारा होता. अशा श्रावक श्रेष्ठीच्या सहकार्याने भट्टारक स्वामींनी त्यांच्या संपर्कात आलेल्या काही कुशल, नामवंत चित्रकारांकडून हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्णत्वास नेला असावा, असे मानता येईल. आज सुमारे पावणे चारशे वर्षांनंतरही या कलाकृतीचे सौंदर्य अबाधित राहिले आहे, जणू ही कलाकारी कालजयी आहे ! अर्थात् याचे जतन करण्यासाठी आपल्या पूर्वजांनी केलेल्या जीवापाड प्रयत्नांना याचे श्रेय द्यावे लागेल, हे निश्चित!

या पटाचा आकार भरपूर मोठा म्हणजे साडेबारा मीटर × एक मीटर एवढा आहे. या संपूर्ण पटाला १० सेंमी रुंदीची सुंदर वेलबुट्टीची किनार आहे. सलग चित्रणाचे स्थूलमानाने सोळा विभाग केलेले दिसतात. हे विभाग दाखविण्यासाठी देखील नक्षीच्या अरुंद किनारीचा वापर केला आहे. मूलत: हा पट अत्यंत तलम अशा मलमलच्या एकसंध कापडावर रेखाटला गेला आहे. हळूहळू कालाचा प्रभाव त्यावर जाणवू लागला होता, म्हणून सन १९६६–६७च्या दरम्यान मुंबई व बडोदा येथील तज्ज्ञांच्या मदतीने सुरक्षीकरण करण्यात आले.

प्रख्यात कला समीक्षक पद्मश्री डॉ. सरयू दोशी (मुंबई) यांचे त्यासाठी मोलाचे सहकार्य लाभले होते.

**गर्भ कल्याणिक –**

पटाच्या प्रथम विभागात जैन भूगोलानुसार जम्बुद्वीपाची रचना दाखविली असून दुसऱ्या विभागात तीर्थंकर आदिनाथाचे पिता नाभिराज व माता मरुदेवी यांचा वार्तालाप सुरू असलेला दिसतो. त्यात त्यांचा अनेक मजली महाल, अयोध्या नगरी, नदी, तट, प्रवेशद्वारे, नागरिक, पशुपक्षी यांचे सुंदर चित्रण पहावयास मिळते.

प्रथम तीर्थंकर होणारा पुण्यशाली भव्यात्मा राणी मरुदेवीच्या उदरी जन्म घेणार आहे, हा संकेत दर्शविणारी जी सोळा शुभ स्वप्ने राणी मरुदेवीला दिसतात, त्याचे चित्ररूप वर्णन तिसऱ्या विभागात आहे. पटाच्या चौथ्या विभागात राणी मरुदेवी आपल्याला दिसलेल्या स्वप्नांचे फल पती नाभिराजांना विचारीत आहे, असा प्रसंग चित्रित झाला आहे. तीर्थंकर ऋषभनाथांचे गर्भावतारण झाले आहे, हे जाणून स्वर्गातील कुबेर पृथ्वीवर रत्नवृष्टी करताना दिसतात. अनेक देवांगना भावी माता मरुदेवीच्या सेवेसाठी येतात, नाना प्रकारे तिची सेवा करतात, मनोरंजन करतात हा त्यापुढील भागाचा चित्र विषय आहे. या संपूर्ण विभागातील राजप्रासाद, त्यातील सुखसाधने, स्त्रियांचे सौंदर्य, वस्त्राभूषणे, साज शृंगार यांचे चित्रण एवढे जिवंत आहे की, एक क्षणभर आपल्यालाही त्या काळात वावरण्याचा भास होतो.

**जन्म कल्याणिक–**

पटाच्या सहाव्या भागात ऋषभ देवांचे जन्म कल्याणिक दाखविले असून जन्माभिषेकाचे चित्रण हा सातव्या भागाचा विषय आहे. इंद्र–इंद्राणी आपल्या संपूर्ण वैभवासह ऐरावत हत्तीवर बसून तीर्थंकर बालकाला अभिषेकासाठी मेरू पर्वतावर नेत आहेत. सोबत नाना प्रकारच्या वाहनांमध्ये बसून वेगवेगळी वाद्ये वाजवीत अन्य देवगण येत आहेत इत्यादी हुबेहूब पुराणातील वर्णनानुसार चित्रण बघून मन प्रसन्न होते. यातील अनेक सोंडा व दात असलेला, प्रत्येक दातावर कमल व त्यावर नृत्यांगना असलेल्या ऐरावत हत्तीचे चित्र विशेष उल्लेखनीय आहे.

पटाचा आठवा विभाग आकाराने सर्वात मोठा असून त्यात जन्माभिषेकाची पूर्वीचीच शोभायात्रा अधिक मोठ्या प्रमाणावर दाखविली आहे. पूर्वीप्रमाणेच इंद्र व त्याचा देव परिवार यासोबतच प्रत्यक्ष अभिषेकाचे दृश्यही यात दिसते. मेरू पर्वत, त्यावरील पांडुकशिला, क्षीरसमुद्र इत्यादी सर्व तपशील सुंदर रेखाटला आहे.

**आनंद नाटक व तांडव नृत्य –**

पटाच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू असणारे इंद्राच्या आनंद नाटकाचे चित्रण याच विभागात आहे. जन्माभिषेकानंतर तीर्थंकर बालकाला वस्त्राभूषणांनी अलंकृत करून मातापित्याजवळ दिल्यानंतर त्या बालकाचे अप्रतिम सौंदर्य व तेज पाहून आनंद विभोर झालेला इंद्र आपल्या अनेक हातांवर अप्सरांना घेऊन स्वतः नृत्यकलेचा दिव्य आविष्कार दाखवितो, तेच हे आनंद नाटक !'
आदिपुराणात आ. जिनसेन म्हणतात,

**सहस्राक्षसमुत्फुल्लविकसत्पंकजाकरे ।**
**ताः पद्मिन्य इवाभूवन्स्मेरवक्त्रांबुजश्रियः ।।१३७।।**

(सहस्र नेत्रांनी तीर्थंकर बालकाला न्याहाळणारा तो इंद्र जणू एक सरोवर होता आणि त्याच्या हातांवरील त्या देवांगना जणू त्या सरोवरात फुललेल्या कमलिनी होत्या.) चित्रातून ही संकल्पना साकार करताना चित्रकारानेही आपल्या कौशल्याचा उच्चांक गाठल्याचे दिसून येते. असे भासते की, इंद्राच्या रोमारोमांतून उसळणाऱ्या आनंदलहरी सजीव होऊन चित्राच्या रेषारेषांतून जणू अनावरपणे धावत आहेत!!

**दीक्षा कल्याणिक–**

पटाच्या नवव्या व दहाव्या विभागात ऋषभकुमारांचे बालपण, देवकुमारांसोबत क्रीडा, तारुण्यावस्थेला प्राप्त झाल्यानंतर राज्याभिषेक, यशस्वती व सुनंदा या राजकन्यांसोबत विवाह, भरत व बाहुबली आदि पुत्रांसमवेत राज्यसभेचे कामकाज इत्यादी चित्रण आले आहे. पटाच्या अकराव्या व बाराव्या भागामध्ये वैराग्य भावनेची उत्पत्ती आणि दीक्षा कल्याणिकाचे चित्रण आहे. राजसभेत नीलांजना नामक देवांगना नृत्य करीत असतानाच तिचा अकस्मात मृत्यू झालेला पाहून राजा ऋषभदेवांना संसारभोगांविषयी वैराग्य उत्पन्न होते. त्याचवेळी लौकांतिक देव येऊन त्यांच्या वैराग्य भावनेची अनुमोदना करतात. राजा ऋषभदेव संसाराचा त्याग करून वनामध्ये जाऊन दिगंबर मुनी दीक्षा ग्रहण करतात, हे कथासूत्र चित्रातील

आशयावरून सहज स्पष्ट होते.

**केवलज्ञान कल्याणिक–**

तेराव्या भागात तीर्थंकर ऋषभदेवांपासून तीर्थंकर महावीरांपर्यंत झालेल्या चोवीस तीर्थंकरांची चिन्हे दाखविली आहेत. उग्र तपाचरणानंतर ऋषभदेवांना केवलज्ञान प्राप्त होते व इंद्र केवलज्ञान कल्याणिकासाठी समवसरणाची भव्य सुंदर रचना साकारतो, याचे चित्रण पुढील भागात आहे.

**निर्वाण कल्याणिक–**

समवसरणामध्ये प्रभूंची दिव्यध्वनी खिरू लागते. गणधर दिव्यध्वनीच्या आधारे अकरा अंग व चौदा पूर्वांची रचना करतात. त्याचे प्रतीक म्हणून श्रुतस्कंधाचा नकाशा व अष्टमंगल चिन्हे यांचे चित्रण पटाच्या पंधराव्या भागात दिसून येते. सोळाव्या भागामध्ये जैन आगमानुसार लोकाकाशाची आकृती व भगवान ऋषभदेवांचे कैलास पर्वतावरून निर्वाण दाखविले आहे.

**चित्रशैली व रंगयोजना–**

या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मतानुसार ही कलाकृती राजस्थानी–दख्खनी मिश्र लघुचित्रण शैलीत (miniature style) चित्रित झालेली आहे. लघुचित्रण शैलीची अनेक वैशिष्ट्ये या कलाकृतीत स्पष्टपणे दिसून येतात. जसे – प्रमाणबद्ध देखण्या मानवी आकृत्या, आकर्ण टपोरे डोळे, सुडौल हालचाली, वेशभूषा व आभूषणे यांचे अत्यंत सूक्ष्म रेखाटन, प्रसन्न रंग योजना, प्रोफाइल फेसेस इ.
राजस्थानी शैलीत प्रामुख्याने दिसून येणाऱ्या लाल, पिवळा, हिरवा, केशरी, जांभळा या रंगांसोबतच इतर अनेक मिश्र रंगछटा व सोनेरी रंगाचा प्रचुर उपयोग या चित्रकृतीमध्ये केलेला दिसून येतो. हे सगळे रंग वनस्पतींपासून बनविलेले नैसर्गिक रंग आहेत.

**अन्य वैशिष्ट्ये –**

उपलब्ध जागेचा अतिशय कल्पक वापर या पटात केलेला आढळतो. जैन आगमानुसार अनेक बारकावे अचूक दाखविण्याचा प्रयत्न, हे चित्रकाराचे अजून एक कौतुकास्पद वैशिष्ट्य म्हणावे लागेल. जसे– मानव आणि देव यांच्या चेहरेपट्टीतील फरक, अभिषेकासाठी धारण केलेली शुद्ध वस्त्रे, मेरुवर सोळा चैत्यालये, दीक्षेची पालखी मानवांनी आधी उचलणे इत्यादी.

चित्रकलेच्या मर्मज्ञांना यातील शास्त्रशुद्ध रेखाटन, रंग–रेषांची नजाकत भुरळ घालते. जैन आगमाच्या अभ्यासकांना यातील आगमानुरूप बारकावे सुखावतात आणि सामान्य रसिकाला या पटाच्या सौंदर्याने ‘सत्यं, शिवं, सुंदरं’ची प्रचीती येते, एवढे सामर्थ्य या भव्य कलाकृतीत आहे, हे निर्विवाद!

या कलानंदाचा आस्वाद घेत असतानाच मन त्या अज्ञात चित्रकारांविषयी आदराने भरून येते, ज्यांनी आपल्या नावगावाचा पुसटसा उल्लेखही एवढ्या मोठ्या पटावर कुठेही केलेला आढळत नाही. मग असे म्हणावेसे वाटते की, एलोरा, अजिंठा, खजुराहो इ.सारख्या कालजयी शिल्पांचे निर्माते काय किंवा या चित्रकारांसारखे अनेक अनामिक कलाकार काय... ज्यांनी यश वा कीर्तीची जराही अपेक्षा न बाळगता केवळ कलेला सर्वस्व मानून तिची आराधना केली, त्या सर्वांची जाती एकच, नाव एकच! ते म्हणजे कलावंत, कलापूजक!!

**ऋण निर्देश–** विशेष आभार– श्री. शिरीष देवकुमार चवरे, अध्यक्ष,श्री १००८ पार्श्वनाथ स्वामी दि. जैन सेनगण मंदिर, (कारंजा लाड)

**संदर्भ सूची–**

१– आदिपुराण(आ. जिनसेन, कारंजा–लाड दिगंबर जैन मंदिर ग्रंथालय)

२– भट्टारक संप्रदाय (ले.– डॉ. विद्याधरजी जोहरापूरकर)

३– बघेरवाल जाति का इतिहास (ले.– डॉ.विद्याधरजी जोहरापूरकर)

4- Masterpieces of Jain Paintings(Dr.Sarayu Doshi)

5- Illustrated Manuscrpits and Paintings From Digambara Jain Bhandars of Vidarbha (Dr.. Manisha Patil)

**( छायाचित्रे आतील रंगीत पृष्ठ क्र. ०३वर)**

*****

# जैन स्थलांतर आणि चित्राश्रयाचे बदलते स्वरूप : महाराष्ट्रातील एका गृह चैत्यालयाचा अभ्यास

**रुपेश मडकर,** सहायक प्राध्यापक,
इतिहास विभाग, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छ. संभाजीनगर

**प्रा. रूपेश मडकर–परिचय–**
शिक्षण – B.Sc.(Biotechnology),M. A.(History) दूरदर्शन केंद्र, राजकोट येथे नियुक्ती. MPSC द्वारे सहाय्यक प्राध्यापक (इतिहास) या पदासाठी निवड. सध्या शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छ.संभाजीनगर येथे इतिहास विभाग प्रमुख म्हणून कार्यरत. 'वासाहतिक महाराष्ट्रातील दिगंबर जैन समाजातील स्थित्यंतरे ' या विषयावर पीएच.डी.साठी संशोधन सुरू आहे. अनेक नामवंत संस्थांच्या वतीने आयोजित परिषदा व चर्चासत्रातून शोधनिबंध सादर. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्यासाठी इतिहास विषयाच्या पुस्तकांचे लेखन. 'मराठवाड्यातील किल्ले ' या पुस्तकाचे इंग्रजी व मराठीतून लेखन.

**प्रस्तावना–**

भारतीय कलेच्या इतिहासात, विशेषतः जैन चित्रकलेच्या संदर्भात, 'चित्राश्रय' (Patronage to Paintings) ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरते. चित्राश्रय म्हणजे चित्रांना किंवा चित्रकलेला मिळालेला राजाश्रय, धर्माश्रय किंवा लोकाश्रय होय. कलेच्या निर्मिती, विकास आणि सातत्यासाठी योग्य आश्रय अत्यंत आवश्यक असतो. जैन परंपरेत, धार्मिक कलाकृतींची निर्मिती ही केवळ सौंदर्याची अभिव्यक्ती नसून, ती धर्माच्या प्रसाराचे, तत्त्वज्ञानाच्या दृश्यात्मक मांडणीचे आणि पुण्य संचयनाचे एक महत्त्वाचे साधन मानली गेली आहे. जैन समुदायाने, विशेषतः त्यांच्या व्यापारी वर्गाने, चित्रकलेला दिलेल्या उदार आश्रयामुळेच एक विशिष्ट आणि समृद्ध 'जैन चित्रकला' (Jain Paintings) विकसित झाली आणि तिची भरभराट झाली. या आश्रयामुळेच अनेक 'पट' (scroll {aintings), 'भित्तीचित्रे' (mural paintings) आणि 'सचित्र ग्रंथ' (illustrated manuscrpits) उदयास आले, जे जैन धर्माच्या वैचारिक आणि आध्यात्मिक समृद्धीचे प्रतीक आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश जैन समाजाच्या ऐतिहासिक स्थलांतरांचा, विशेषतः मध्ययुगीन ते आधुनिक काळातील स्थलांतरांचा, जैन चित्रकलेच्या सातत्यावर आणि तिच्या आश्रयाच्या स्वरूपावर कसा परिणाम झाला, याचा सखोल अभ्यास करणे हा आहे. स्थलांतर हा केवळ भौगोलिक बदल नसून, ती सांस्कृतिक, सामाजिक आणि मानसिक बदलांची एक गुंतागुंतीची प्रक्रिया असते. स्थलांतरित समुदायांसोबत त्यांची संस्कृती, परंपरा, श्रद्धा आणि कलात्मक अभिव्यक्तीही प्रवास करते. महाराष्ट्रातील फलटण येथील एका 'गृह चैत्यालया'तील चित्रांच्या अभ्यासातून स्थलांतरासोबत आलेल्या सांस्कृतिक संकल्पना आणि कलात्मक अभिव्यक्तीचे विश्लेषण करणे, तसेच नव्या भूमीत त्यांना मिळालेला प्रतिसाद आणि झालेले बदल तपासणे, हा या निबंधाचा मुख्य हेतू आहे. हा अभ्यास स्थलांतर, कला आणि धार्मिक आश्रय यांच्यातील गुंतागुंतीच्या संबंधांवर प्रकाश टाकून, जैन कलेच्या इतिहासाला एक नवीन परिमाण देण्याच्या उद्देशाने केलेला प्रयत्न आहे.

**मध्ययुगीन जैन चित्रकलेची निर्मिती आणि आश्रय**

मध्ययुगीन काळात जैन चित्रकलेची निर्मिती प्रक्रिया अत्यंत खर्चिक आणि गुंतागुंतीची होती. आजच्या काळात पुस्तक छापून घेणे किंवा चित्रकला सहज उपलब्ध असणे जितके सोपे आहे,

तितके ते त्या काळी नव्हते. त्या काळात, सचित्र ग्रंथांची निर्मिती हा एक सामुदायिक आणि अत्यंत नियोजनबद्ध उपक्रम असे. यासाठी लिपिकार (scribe), चित्रकार (painter), आणि ग्रंथाचे तत्त्वज्ञान सांगणारे भट्टारक किंवा भट्टारक यांचे शिष्य अथवा पंडित यांचा समन्वय लागत असे. लिपिकार अचूकपणे मजकूर लिहित असे, तर चित्रकार त्या मजकुराला पूरक अशी चित्रे रेखाटत असे, जी बहुधा धार्मिक कथा, तीर्थंकरांचे जीवन प्रसंग, किंवा जैन तत्त्वज्ञानाच्या जटील संकल्पना स्पष्ट करत असत. भट्टारक किंवा पंडित हे या संपूर्ण प्रक्रियेचे धार्मिक आणि वैचारिक मार्गदर्शन करत, ज्यामुळे कलाकृती धार्मिक दृष्ट्या प्रमाणभूत राहणे शक्य होत असे.

विशेष म्हणजे, या कलाकृतींमध्ये अनेकदा चित्रकारांची नावे पोथ्यांमध्ये मिळत नाहीत, जी अपवादात्मक आहेत. यामागे अनेक कारणे असू शकतात, एकतर कलेची निर्मिती ही वैयक्तिक प्रसिद्धीसाठी नसून, ती धार्मिक पुण्य संचयनासाठी आणि धर्माच्या प्रसारासाठी होती; दुसरे, कलाकारांना समाजात तेवढे उच्च स्थान नसेल जितके भट्टारकांना होते; आणि तिसरे, अनेकदा ही कलाकृती एका व्यक्तीचे काम नसून, अनेक कारागिरांच्या सामूहिक प्रयत्नातून साकारत असे.

या कलाकृतींची निर्मिती अत्यंत खर्चिक असल्याने, ती सर्वसामान्य व्यक्तींच्या आवाक्याबाहेरची होती. अनेकदा, श्रीमंत व्यापारी श्रावकांच्या किंवा समुदायाच्या मोठ्या देणग्यांतूनच हे ग्रंथ साकारत असत. हे व्यापारी धर्मनिष्ठ असत आणि त्यांना 'पुण्य' (मेरिट) मिळवण्यासाठी तसेच त्यांच्या कुटुंबाचे धार्मिक स्थान उंचावण्यासाठी दानधर्माचे महत्त्व पटलेले असे. यामुळे ग्रंथांची निर्मिती कमी प्रमाणात होत असे आणि ते सर्वसामान्य श्रावकांना सहज उपलब्ध नव्हते. आजच्या काळात आपण मंदिरात जाऊन किंवा ग्रंथालयातून पोथी घेऊन वाचू शकतो, पण त्या काळी ही सोय नव्हती. त्यामुळे, धार्मिक तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहोचवण्याचे मुख्य माध्यम भट्टारकांच्या प्रवचनांतूनच होत असे. ही प्रवचने सचित्र ग्रंथातील कथा आणि संकल्पना मौखिक रूपात लोकांपर्यंत पोहोचवत असत, ज्यामुळे चित्रांचे महत्त्व दुय्यम असले तरी, त्यांच्याकडे पाहणे आणि त्यातून प्रेरणा घेणे हे एक पवित्र कार्य मानले जात असे.

तत्कालीन सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमी विचारात घेतल्यास, चित्रांचा प्रभाव श्रावकांवर किती पडत होता आणि ती किती सुलभ होती, हे समजून घेणे महत्त्वाचे ठरते. मध्ययुगीन समाजात साक्षरता कमी असल्याने, दृश्य माध्यमांचा प्रभाव अधिक होता. त्यामुळे, सचित्र ग्रंथ हे केवळ धार्मिक दस्तावेज नसून, ते दृश्यात्मक शिक्षणाचे आणि श्रद्धेच्या दृढीकरणाचे प्रभावी माध्यम होते. आजच्या काळातील दृष्टिकोन ठेवून त्या काळातील चित्रकला समजून घेतल्यास तिचा खरा अर्थ लावणे अवघड होते. तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास करूनच चित्रांचे महत्त्व अधिक स्पष्ट होते, कारण ती केवळ कलात्मक निर्मिती नसून, ती धार्मिक श्रद्धा, सामाजिक स्थिती आणि आर्थिक क्षमतेचे एक जटिल मिश्रण होते.

याव्यतिरिक्त, स्थलांतराचे संदर्भ विचारात घेतल्यास, नवीन प्रदेशात स्थलांतरित झालेल्या जैन समाजाने त्यांच्या कलात्मक परंपरांचे जतन कसे केले, हे देखील अभ्यासण्यासारखे आहे. गृह चैत्यालयातील चित्रांचा अभ्यास केल्यास, स्थलांतरानंतरच्या काळात स्थानिक संस्कृतींशी संवाद साधताना जैन कलाकृतींमध्ये कोणते बदल घडले, कोणती वैशिष्ट्ये टिकून राहिली, आणि कोणत्या नवीन शैली उदयास आल्या, हे स्पष्ट करता येते. या सगळ्या प्रक्रियेत, चित्रकला केवळ धार्मिक साधन राहिले नाही, तर ती निजखूण (identity), सांस्कृतिक संवाद आणि सामाजिक प्रतिष्ठा यांचेही माध्यम बनली. या सर्व प्रक्रियांचा एकत्रित अभ्यास जैन चित्रकलेच्या इतिहासाला अधिक व्यापक आणि सखोलपणे समजून घेण्यास मदत करतो.

## स्थलांतराचा ऐतिहासिक संदर्भ आणि जैन समाजावरील परिणाम

जैन समाजाच्या इतिहासात स्थलांतराला विशेष महत्त्व आहे. प्राचीन काळापासून जैन समाजाने बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेत आपला धर्म टिकवून ठेवला, हे त्यांच्या स्थलांतराच्या इतिहासावरून स्पष्ट दिसून येते. आचार्य भद्रबाहू यांच्या नेतृत्वाखाली उत्तर भारतात पडलेल्या भीषण दुष्काळामुळे दक्षिण भारताकडे झालेल्या स्थलांतराच्या घटनेला विशेष ऐतिहासिक महत्त्व आहे. ह्या घटनेमुळे जैन समाजात दिगंबर आणि श्वेतांबर हे दोन प्रमुख पंथ उदयास आले, ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. या घटनेतून हे दिसून येते की, जैन समाजाने केवळ भौगोलिक सीमा ओलांडल्या नाहीत, तर नैसर्गिक आपत्ती आणि सामाजिक बदलांना प्रतिसाद देत आपल्या अस्तित्वासाठी व धर्मरक्षणासाठी स्थलांतर केल्याचे अनेक ग्रंथात नमूद केले आहे (दोशी :२०२०).

मध्ययुगीन आणि आधुनिक काळातही जैन समाजाने वारंवार स्थलांतर केले. मुख्यत्वे दुष्काळ, राजकीय अस्थिरता आणि आर्थिक संधींच्या शोधात या स्थलांतरांना चालना मिळाली. भारतातील अनेक भागांत, विशेषतः राजस्थानसारख्या प्रदेशांत, वारंवार दुष्काळ पडत असे. पाण्याची टंचाई आणि अन्नधान्याचा अभाव यामुळे शेती करणे अशक्यप्रायः झाले होते. परिणामी, संपूर्ण गावच्या गाव स्थलांतरित होत असे. ही स्थलांतरे तात्पुरत्या स्वरूपाची नसून, अनेकदा ती कायमस्वरूपी ठरायची, कारण मूळ गावी जीवनावश्यक साधनांची टंचाई भासायची.

त्याच काळात, राजकीय अस्थिरतेमुळे आणि पेंढारी, रामोशी, भिल्ल यांसारख्या समुदायांच्या लुटमारीमुळे ग्रामीण जीवन अधिक असुरक्षित झाले. या लुटींमुळे व्यापार आणि वस्त्या सुरक्षित राहिल्या नाहीत. त्यामुळे जैन समाज, जो प्रामुख्याने व्यापारी आणि सावकारी व्यवसायात गुंतलेला होता, त्यांना सुरक्षिततेच्या शोधात स्थलांतर करणे भाग पडले. शांतता आणि सुरक्षितता या त्यांच्या व्यवसायासाठी अत्यंत आवश्यक होत्या. त्यामुळे, त्यांनी अधिक सुरक्षित प्रदेश निवडले आणि तिथे आपले व्यवसाय वसवले. व्यापारी संधी मिळविण्यासाठीही अनेक जैन व्यापारी नवीन भागात स्थायिक झाले, कारण व्यापार हा त्यांच्या उपजीविकेचा व समृद्धीचा मुख्य आधार होता.

आधुनिक काळात, विशेषतः ब्रिटीश राजवटीत, जैन समाजाच्या स्थलांतराला अधिक गती मिळाली. ब्रिटिशांनी 'कायद्याचे राज्य' (Rule of Law) प्रस्थापित केल्याने राजकीय अस्थिरता कमी झाली आणि शांतता व स्थिरता यांना प्राधान्य मिळाले. ब्रिटीश प्रशासनाचा मुख्य उद्देश व्यापार वाढवणे हा होता, म्हणून त्यांनी वाहतुकीची साधने, विशेषतः रेल्वे मार्गामध्ये, मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या. रेल्वेमुळे एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात प्रवास अधिक सुरक्षित, जलद व सुलभ झाला. त्यामुळे कच्च्या मालाची वाहतूक व तयार मालाची विक्री सुलभ झाली, आणि व्यापाराला उत्तेजन मिळाले. परिणामी मुंबई, कोलकाता, मद्रास यांसारख्या शहरांची झपाट्याने वाढ झाली आणि अंतर्गत भागातील लोक मोठ्या प्रमाणावर या शहरांकडे स्थलांतरित झाले, ज्यामुळे ही शहरे महानगरे झाली.

ब्रिटीश प्रशासनाखाली असलेल्या प्रदेशात दुष्काळ, अडचणी आणि अस्थिरता तुलनेने कमी होती. त्यामुळे उत्तम आर्थिक भविष्यासाठी लोक मोठ्या प्रमाणावर ब्रिटीशशासित प्रदेशांकडे, विशेषतः महाराष्ट्राकडे, स्थलांतरित झाले. ब्रिटीश प्रशासनाखालील प्रदेशांत व्यापार, नोकरी आणि सुरक्षिततेच्या अधिक संधी उपलब्ध होत्या, त्यामुळे हे प्रदेश स्थलांतरितांसाठी आकर्षक बनले. या स्थलांतरामुळे जैन समाजाची भौगोलिक व्याप्ती विस्तारली आणि त्यांनी नव्या प्रदेशात आपली आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक निजखूण (Identity) निर्माण केली.

**महाराष्ट्रातील जैन स्थलांतरे : विशिष्ट उदाहरणे**

महाराष्ट्रातील जैन समाजाची स्थलांतरे मुख्यत्वे दोन प्रदेशांतून झाली. राजस्थानमधील मारवाड आणि गुजरातमधील इडर. या प्रदेशांतून स्थलांतरित झालेल्या जैन समुदायांनी महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

**मारवाड प्रदेशातील स्थलांतरे :**

भवरलाल जैन यांच्या 'मरुभूमीतून बाहेर' या पुस्तकात मारवाडमधील जैन समाजाच्या ६००-७०० वर्षांच्या स्थलांतराचा इतिहास सविस्तरपणे मांडण्यात आला आहे. या पुस्तकात दुष्काळग्रस्त 'मरुभूमी'तून लोकांनी सुबत्तेच्या आणि व्यापाराच्या संधी असलेल्या प्रदेशांकडे कसे स्थलांतर केले, याचे तपशीलवार वर्णन आहे. मारवाड प्रदेशात पाण्याचा अभाव आणि वारंवार दुष्काळ यामुळे जीवन अत्यंत कठीण झाले होते. त्यामुळे तेथील लोकांना जगण्यासाठी आणि आर्थिक स्थैर्यासाठी मूळ गाव सोडून बाहेर पडावे लागले. या स्थलांतरांना अनेकदा 'पलायन' असे संबोधले जाते, कारण हे स्थलांतर केवळ उपजीविकेसाठी नव्हे, तर नव्या भविष्यासाठी व सुरक्षिततेसाठी होते.

एकूणच पाहता, जैन समाजाचा स्थलांतराचा इतिहास हा त्यांच्या लवचिकतेचा, जिद्दीचा आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या क्षमतेचा उत्कृष्ट दाखला आहे. परिस्थितीशी जुळवून घेत त्यांनी नवे प्रदेश गाठले, तिथे आपली ओळख निर्माण केली आणि आपल्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरा टिकवून ठेवल्या.

पुस्तकात मारवाडी समुदायाच्या स्वभावविशेषांचा सखोल अभ्यास केला आहे. 'कंजूस मारवाडी' या लोकप्रिय म्हणीच्या मागे असलेली सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमी लेखकाने तपशीलवार उलगडली आहे. खरे पाहता, हा 'कंजूसपणा' म्हणजे केवळ पैशाची बचत नव्हे, तर ती एक जीवनशैली होती, ज्याची मुळे त्यांच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत रुजलेली आहेत. जिथे कुटुंबाच्या जगण्यावरच संकट होते, जिथे पाण्याचा प्रत्येक थेंब आणि धान्याचा प्रत्येक कण अनमोल होता, तिथे काटकसर ही अपरिहार्यतेतून निर्माण झालेली सवय आहे. हेच स्वभाववैशिष्ट्य स्थलांतरानंतरही टिकून राहिले आणि त्यामुळेच मारवाडी लोकांची वेगळी ओळख नव्या प्रदेशात ठळक झाली. म्हणजेच, ही काटकसर केवळ कंजुषी नव्हती, तर ती प्रतिकूल परिस्थितीत तग धरून राहण्यासाठी आणि भांडवल साठवण्यासाठी अवलंबलेली परिणामकारक रणनीती होती. ह्याच भांडवलाच्या आधारावर त्यांनी इतर प्रदेशात व्यापारी साम्राज्य उभे केले. कलकत्ता, आसाम यांसारख्या ब्रिटिशांच्या प्रभावाखालील व्यापार केंद्रांमध्ये मारवाडी लोकांची मोठ्या प्रमाणात स्थलांतरे झाली. ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या नव्या व्यापारसंधी आणि रेल्वे जाळ्याचा फायदा घेत मारवाडी व्यापाऱ्यांनी आपल्या व्यवसायाचे जाळे देशभर पसरवले.

**गुजरातमधील इडर प्रांतातील स्थलांतरे :**

डॉ. रमेश दोशी यांच्या 'गुणवरेचे नथू काका' या ग्रंथात इडरमधून महाराष्ट्रात स्थलांतर केलेल्या जैन समाज, विशेषतः हुम्मड जातीच्या कुटुंबांची कहाणी तपशीलवार सांगितली आहे. ही स्थलांतरे एकाच वेळी न होता, अनेक शतकांमध्ये, विविध लाटांमध्ये (waves) होत राहिली. प्रत्येक दुष्काळानंतर स्थलांतराची नवी लाट निर्माण होत असे. अशा प्रकारे, नैसर्गिक आपत्ती म्हणजे स्थलांतराची काळवेळ ठरवणारे मुख्य कारण. उदाहरणार्थ, ऐतिहासिक आणि मौखिक परंपरांनुसार, शिवाजी महाराजांनी सुरतवर केलेल्या हल्ल्यानंतर काही जैन व्यापाऱ्यांना महाराष्ट्रात आणले गेले. शिवाय, इडर आणि कारंजा येथील भट्टारक हे जैन धर्मगुरु यांच्यातील निकट संबंधही या स्थलांतराला कारणीभूत ठरले. भट्टारकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या अनुयायांनी स्थलांतर केले, ज्यामुळे नव्या प्रदेशात स्थिरावणे आणि समुदायाच्या

एकत्रित अस्तित्वास हातभार मिळाला.

हुम्मड समुदायाच्या महाराष्ट्रातील स्थलांतराचे मुख्य केंद्र म्हणजे फलटण. फलटण हा त्या काळात निंबाळकर संस्थानिकांच्या अधिपत्याखाली असलेला, तुलनेने सुरक्षित आणि सुव्यवस्थित प्रदेश होता. इतर भागांत राजकीय अस्थिरता असताना, फलटणमध्ये शांतता होती आणि त्यामुळे स्थलांतरित जैन कुटुंबांसाठी हा प्रदेश आकर्षक ठरला. प्रारंभी काही कुटुंबे फलटणमध्ये स्थिरावली, त्यानंतर त्यांनी आपल्या नातेवाइकांना व्यापार व शेतीच्या संधींबद्दल माहिती दिली आणि अशा प्रकारे 'साखळी स्थलांतर' प्रक्रियेला गती मिळाली. हुम्मड जैन समाजाने किराणा, भुसार, भांडी आणि शेती या व्यवसायांचा स्वीकार केला आणि स्थानिक अर्थव्यवस्थेत स्वतःला समाविष्ट केले. काही कुटुंबांनी सावकारी केली, परंतु काहींनी (उदा. गुणवरे येथील दोशी कुटुंब) नैतिक व सामाजिक कारणास्तव त्यापासून दूर राहणे पसंत केले.

या स्थलांतरांमुळे महाराष्ट्राच्या विविध भागांत जैन समाज विस्तारला आणि त्यांनी आपली धार्मिक, सांस्कृतिक ओळख कायम राखली. स्थलांतरित समुदाय केवळ भौगोलिकदृष्ट्या स्थलांतरित होत नाही, तर आपल्या संस्कृतीसह, मनोविश्व व भावविश्वासह नवे स्थान गाठतो. मूळ सांस्कृतिक संदर्भ आणि आठवणी जपण्याकरिता साहित्य, भाषा, म्हणी, चित्रकला आणि शिल्पकला हे प्रभावी माध्यम ठरतात. कला हे सांस्कृतिक स्मृतीचे आणि निजखुणेचे (Identity) महत्त्वपूर्ण प्रतीक आहे.

महाराष्ट्रात स्थलांतरित झालेल्या जैन समाजाला मंदिर बांधण्यास अनेकदा राजकीय किंवा धार्मिक अडचणींचा सामना करावा लागला. पुण्यात पेशव्यांच्या काळात मंदिर बांधण्यावर बंदी होती किंवा कठोर अटी लादल्या जात असत. फलटणमध्येही हुम्मड जैनांना 'कळस दिसेल असे मंदिर बांधता येणार नाही' अशी अट घालण्यात आली, असे मौखिक परंपरेत सांगितले जाते. मंदिराचा कळस हा त्याच्या उंचीचे आणि दृश्यमानतेचे प्रतीक असल्याने, त्यावर निर्बंध म्हणजे जैन धर्माच्या सार्वजनिक अस्तित्त्वावर मर्यादा घालणे ठरले.

या परिस्थितीत जैन समाजाने 'गृह चैत्यालय' या संकल्पनेची निर्मिती केली. म्हणजेच, घरातच मंदिराची प्रतिकृती उभारणे. ही संकल्पना केवळ तात्पुरता उपाय नव्हता, तर तो धार्मिक निष्ठा आणि सांस्कृतिक लवचिकतेचा उत्कृष्ट नमुना होता. घराच्या एका भागात देवाची स्थापना, पूजा-अर्चा, धार्मिक ग्रंथांचे वाचन असे सर्व धार्मिक क्रियाकलाप पार पडत असत. सार्वजनिक मंदिरांअभावी ही गृह चैत्यालये समुदायासाठी धार्मिक केंद्रे बनली. या चैत्यालयांतील चित्रे, शिल्पे ही स्थलांतरित समाजाच्या मूळ संस्कृतीचे आणि भावविश्वाचे प्रतिबिंब होते. त्यामुळे ही गृह चैत्यालये केवळ पूजा-अर्चेसाठीच नव्हे, तर सांस्कृतिक सातत्य आणि धार्मिक निष्ठेची प्रतीके होती, जी स्थलांतरित समुदायाला आपली ओळख आणि वारसा टिकवून ठेवण्यास मदत करीत होती.

एकूणच, मारवाडी व जैन समाजाच्या स्थलांतराचा अभ्यास केल्यास हे स्पष्ट होते की, प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी ज्या प्रकारे आपली संस्कृती, अस्मिता आणि सामाजिक-सांस्कृतिक मूल्ये जपली, ती त्यांची लवचिकता, दूरदृष्टी आणि एकात्मता दर्शवते. हे स्थलांतर केवळ भौगोलिक बदल नव्हते, तर सांस्कृतिक पुनर्रचना आणि सामूहिक स्मृतीचा प्रवास होता.

**केस स्टडी : फलटण येथील श्री. दोशी यांच्या गृह चैत्यालयातील चित्रे**

फलटणमधील श्री. दोशी यांच्या घरातील हे गृह चैत्यालय - हे केवळ एक प्राचीन वास्तू नाही, तर स्थलांतराच्या प्रक्रियेत जैन समाजाने आपल्या धार्मिक, सांस्कृतिक आणि कलात्मक अस्मितेची (Identity) केलेली जपणूक आणि नव्या भौगोलिक

संदर्भात तिला दिलेले नवे स्वरूप, याचा अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज ठरतो. हे चैत्यालय, सुमारे शंभर वर्षांपूर्वी (१९२४) व्यापारी आणि सावकार कुटुंबाने आपल्या घरात बांधलेले, आजही मूळ स्वरूपात टिकून आहे, आणि त्यातील चित्रे, त्यांची शैली, व विषय हे समाजाच्या बदलत्या जीवनशैलीचे व सांस्कृतिक प्रक्रियेचे जिवंत पुरावे आहेत.

या चैत्यालयाचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्याची स्थिती –हे घरच्याघरी, किराणा दुकानाच्या वरील मजल्यावर बांधले आहे. जैन गृहस्थांच्या धार्मिक आकांक्षा, व त्यांच्या आर्थिक समृद्धीचा ध्यास, याचा हा एक अनोखा संगम आहे. सन १९२४ साली रंगवलेली चित्रे, आज शंभर वर्षांनीही नूतनीकरणाविना, मूळ रंगरूपात उपलब्ध आहेत, ज्यामुळे त्या काळातील रंगकामाचा स्पष्ट अनुभव घेता येतो.

या गृह चैत्यालयातील चित्रांचे विषय, त्यांची मांडणी, आणि शैली – हे स्थलांतरित जैन समाजाच्या धार्मिक शिक्षण व सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याच्या पद्धतींवर प्रकाश टाकतात. वेदीवरचे दोन हत्ती आणि तीर्थंकर, हे जैन परंपरेतील शुभ चिन्हे असून, या प्रतीकांतून त्यांचा धार्मिक वारसा आणि श्रद्धेची गहिरी जाणीव प्रकट होते. भिंतींच्या प्रत्येक इंचावर चित्रांचे अस्तित्व दिसते – हे त्या जागेला केवळ पूजास्थान न ठेवता, एक प्रकारे अनोख्या कला व सांस्कृतीक वारशात परावर्तित करते. चित्रांचे विषय अत्यंत अर्थपूर्ण आहेत.

**श्री. दोशी यांचे गृह चैत्यालय, फलटण**

जैन धार्मिक चरित्रातील सोळा शुभ स्वप्ने, जी तीर्थंकरांच्या जन्मापूर्वी त्यांच्या मातेला पडतात, हे केवळ पौराणिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीचा भाग म्हणूनही चित्रित झालेले आहे. जन्मकल्याणक प्रसंग – विशेषतः ऐरावत हत्तीवरून मेरू पर्वताकडे जाण्याची प्रतिमा – जैन धर्मातील पंचकल्याणकांतला हा महत्त्वपूर्ण टप्पा, चित्रांच्या माध्यमातून जिवंत केला आहे. कर्मबंध – जैन तत्त्वज्ञानातील आठ प्रकारच्या कर्मांचे चित्रण – हे एकत्रितपणे धार्मिक शिक्षणाचे साधन म्हणून समोर येते. कर्माचे बंध, त्याचे परिणाम, मोक्षाचा मार्ग – हे सर्व दृश्य माध्यमातून स्पष्ट केलेले आहे.

आहारदान – जैन गृहस्थांसाठी अत्यंत पुण्यकारक मानले जाणारे कार्य – त्याचे चित्रण सामाजिक जबाबदारी आणि धार्मिक कर्तव्य यांची सांगड घालते. तसेच, ज्ञानावरणीय कर्माचा विषय, पडद्यामागे ठेवण्यात आलेल्या प्रतिमांच्या माध्यमातून, तत्त्वज्ञानातील गुंतागुंतीच्या संकल्पना सहज, दृश्य स्वरूपात मांडल्या आहेत. या चित्रांमध्ये ब्रिटिशकालीन चित्रशैलीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. व्यक्तीचित्रण, खुर्चीवर बसलेली व्यक्ती, बाजूला ग्रंथ – ही शैली स्थानिक कलाकारांनी आत्मसात केलेली दिसते, ज्यामुळे पारंपरिक जैन कला आणि आधुनिक पोर्ट्रेट शैली यांचा संगम साधला गेला आहे. वेशभूषेतील विविधता – काही पुरुषांनी गुजराती पद्धतीचा फेटा, काहींनी पुणेरी फेटा, स्त्रियांची महाराष्ट्रीयन साडी – हे स्थलांतरित समाजाची सांस्कृतिक ओळख आणि त्यांचा स्थानिक समाजाशी संवाद, दोन्ही दर्शवते.

या चित्रांमधून स्पष्ट होते की, स्थलांतरित जैन समाजाने आपल्या मूळ प्रदेशातील (गुजरात) सांस्कृतिक घटक जपून ठेवले आहेत, परंतु ते महाराष्ट्रातील नव्या सामाजिक-सांस्कृतिक वातावरणाशीही जुळवून घेत आहेत. या चित्रांतून केवळ धार्मिक कथा सांगितल्या जात नाहीत, तर त्या स्थलांतरित समाजाच्या निजखुणेच्या – identity – निर्मितीचे, सांस्कृतिक संकराच्या प्रक्रियेचे, आणि नव्या भूमीशी जुळवून घेताना जपलेल्या परंपरेचे दस्तऐवज ठरतात. तथ्यतः, हे गृह चैत्यालय स्थानिक आणि स्थलांतरित, पारंपरिक आणि आधुनिक, धार्मिक आणि सामाजिक – या सर्व प्रवाहांचा संगम आहे. शंभर वर्षांपूर्वी उभारलेली ही सांस्कृतिक, कलात्मक आणि धार्मिक परंपरा

आजही मूळ स्वरूपात अस्तित्वात आहे, ही गोष्ट या चैत्यालयाच्या ऐतिहासिक आणि कलात्मक मूल्याला अजूनच अधोरेखित करते. या चैत्यालयातील चित्रांचा अभ्यास केल्यास स्थलांतर, सांस्कृतिक जडणघडण आणि जैन समाजाच्या ओळखीचा प्रवास यांचा सखोल अभ्यास करता येतो, आणि हे चैत्यालय त्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाचा अभ्यासविषय ठरतो.

### 'मधुबिंदू' दृष्टांत चित्र

फलटण येथील श्री. दोशींच्या गृह चैत्यालयातील 'मधुबिंदू' कथेचे चित्र हे जैन स्थलांतर आणि सांस्कृतिक स्थानांतरणाच्या अभ्यासासाठी एक महत्त्वाचा दुवा ठरते. वैशिष्ट्य म्हणजे, जैन समाजात यशोधर चरित्र, सुगंध दशमी, आदित्यवार व्रताच्या कथा वारंवार चित्रित केलेल्या असताना, मधुबिंदू सारख्या तुलनेने प्रादेशिक आणि क्वचितच चित्रित होणाऱ्या कथेला येथे स्थान मिळाले आहे. या निवडीमागील प्रेरणा आणि तिच्या सांस्कृतिक अर्थाचे विश्लेषण करणे आवश्यक ठरते. 'मधुबिंदू' कथेचे मूळ १०व्या शतकातल्या आचार्य सिद्धर्षी गणी यांच्या 'उपमितभाव कथा' या संस्कृत ग्रंथात आढळते. या कथेला मारवाड व गुजरात या प्रदेशांत प्रचंड लोकप्रियता लाभली होती, तर इतर भारतीय प्रदेशांत ती फारशी चित्रित किंवा प्रचलित आढळत नाही. यामागे त्या प्रदेशातील जैन समाजाच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनातील विशिष्टता दिसून येते. स्थलांतराच्या प्रक्रियेत या कथांची आणि सांस्कृतिक संकल्पनांचे एकत्रित वहन झाल्याचे हे उदाहरण आहे.

कथेचा सारांश लक्षात घेतल्यास, हा एक प्रवासी आहे जो खोल विहिरीत पडतो, वेल धरून लटकतो, खाली तळ्यात (काही चित्रात विहीर) साप असतात आणि जमिनीवर हत्ती असतो, वेलीला दिवस-रात्र, म्हणजे काळाचे पांढरे-काळे उंदीर कुरतडतात, तर वर मधमाशीच्या पोळ्यातून मधाचे थेंब त्याच्या जिभेवर पडतात. तो त्या मधात रमतो आणि आपली भयावह स्थिती विसरतो. या प्रतीकांच्या आधारे विहीर म्हणजे संसार, वेल म्हणजे आयुष्य, उंदीर म्हणजे काळ, साप म्हणजे मृत्यू/अथवा चार साप हे काही ठिकाणी क्रोध, मान, माया, लोभ यांचे प्रतिक म्हणून दर्शवले आहेत. हत्ती म्हणजे नरक, मध म्हणजे संसारातील क्षणिक सुख असे अर्थ घेता येतात. ही कथा मानवी आयुष्याच्या क्षणभंगुरतेचे, कर्माच्या बंधनाचे आणि मोहाच्या जाळ्यात अडकलेल्या अवस्थेचे चित्रण करते.

मधुबिंदू कथेच्या प्रादेशिक लोकप्रियतेमुळे आणि स्थलांतरित जैन समाजाच्या मनात असलेल्या प्रभावामुळेच ती हुम्मड जातीच्या लोकांसोबत महाराष्ट्रात आली. या समुदायाने केवळ फलटणमधील गृह चैत्यालयात नव्हे, तर वर्धा येथील जैन मंदिरातही ही कथा चित्रित केली आहे. वर्ध्याचे जैनही मारवाड-गुजरात भागातून स्थलांतरित झालेले आहेत. तसेच सोलापूर येथील हुम्मड जैन समाजाशी संबंधित एका सभागृहात असेच चित्र असल्याचे श्री. दिलीप खोबरे यांनी वैयक्तिकरित्या कळवले आहे. वेगवेगळ्या भौगोलिक ठिकाणी ही कथा चित्ररूपात आढळणे, हे स्थलांतराच्या सांस्कृतिक परिणामाचे स्पष्ट उदाहरण आहे. त्यामुळे असे दिसून येते की, स्थलांतरित समाज केवळ भौगोलिक नव्हे, तर सांस्कृतिक आणि धार्मिक संकल्पना, कथा आणि कलात्मक प्रेरणाही नव्या भूमीवर घेऊन जातो.

**'मधुबिंदू दृष्टांत' चित्र श्री. दोशी यांचे गृह चैत्यालय, फलटण**

महत्त्वाचे म्हणजे, अमितगतींच्या संस्कृत 'धर्मपरीक्षा' ग्रंथात ही कथा आहे, परंतु मराठीत उपलब्ध असलेल्या 'धर्मपरीक्षा'मध्ये ती आढळत नाही. याचा अर्थ, या कथेचे स्थान केवळ एका प्रादेशिक जैन समूहात खोलवर रुजलेले होते. चित्ररूपांतर हे त्या कथेच्या प्रभावाची आणि धार्मिक उपदेशातील तिच्या महत्त्वाची साक्ष देणारे ठरते.

'मधुबिंदू' कथेचे चित्रण हे स्थलांतराच्या प्रक्रियेत सांस्कृतिक संकल्पना आणि कथा कशा एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात जातात याचे एक स्पष्ट उदाहरण आहे. स्थलांतरित समुदायाच्या जीवनातील अनिश्चितता, मोक्षाची इच्छा आणि क्षणभंगुर जगाच्या आकर्षणावर असलेली टिप्पणी ही या कथेच्या निवडीमागील मुख्य प्रेरणा असावी. त्यामुळे या चित्रांची निवड केवळ कलात्मक साक्ष नसून मानसिक आणि आध्यात्मिक गरजांचेही प्रतिबिंब ठरते.

**निष्कर्ष**

फलटणमधील गृह चैत्यालयातील चित्रे ही केवळ कलात्मक अभिव्यक्ती नव्हेत, तर जैन स्थलांतराच्या सांस्कृतिक सातत्याची आणि नव्या पारिस्थितिक परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या लवचिकतेची जिवंत साक्ष आहेत. मंदिरांच्या बांधकामावर असलेल्या निर्बंधांमुळे 'गृह चैत्यालय' ही संकल्पना येथे अंमलात आली, ज्याने धार्मिक श्रद्धेच्या जपणुकीला नव्या जागेत नवे रूप दिले. स्थलांतरितांनी आपली घरेच धार्मिक आणि सांस्कृतिक केंद्रे बनवली, आणि त्यात जुने कथानक, श्रद्धा आणि कलात्मक परंपरा पुन्हा जिवंत केल्या.

चित्रांमध्ये, विशेषतः मधुबिंदू कथेच्या चित्रणात, ब्रिटीशकालीन पोशाख आणि चित्रशैलीतील स्थानिक रंग यांचे मिश्रण दिसते, जे स्थानिक संस्कृतीशी संवादी असण्याचे प्रयत्न दर्शवते. हे मिश्रण स्थलांतरित समाजाच्या सांस्कृतिक ओळखीच्या (identity) निर्माण प्रक्रियेत महत्त्वाचे ठरते. त्यामुळे, स्थलांतरित समाजाने केवळ आर्थिक स्थैर्यच नव्हे, तर आपली धार्मिक आणि सांस्कृतिक ओळखही नव्या भूमीत दृढ केली.

एकूणच, फलटणच्या गृह चैत्यालयाचा अभ्यास हा स्थलांतर, धर्म आणि कलेच्या परस्पर संबंधावर प्रकाश टाकणारा एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरतो. स्थलांतर म्हणजे केवळ व्यक्तींचा स्थानबदल नाही, तर त्यात त्यांच्या सांस्कृतिक, मानसिक आणि कलात्मक विश्वाचाही प्रवास सामावलेला असतो. 'चित्राश्रय' संकल्पनेच्या अभ्यासातून हे दिसते की स्थलांतरित जैन समाजाने आपल्या मूळ प्रदेशातील कलात्मक परंपरा नव्या भूमीत जपल्या व पुनरुज्जीवित केल्या. स्थानिक व ब्रिटीशकालीन प्रभावांचा संगम, चित्रशैलीतील बदल, हे सर्व स्थलांतराच्या प्रक्रियेत सांस्कृतिक निजखुणेच्या (identity) पुनर्रचनेचे निदर्शक आहेत.

म्हणून, फलटणमधील 'मधुबिंदू' कथेचे चित्र हे एकत्रितपणे सामाजिक बदल, सांस्कृतिक सातत्य आणि स्थलांतरित समाजाच्या निजखुणेचे (identity) एक महत्त्वपूर्ण प्रतीक आहे. हा अभ्यास जैन कलेच्या इतिहासाला स्थलांतराच्या दृष्टिकोनातून नवी दिशा देतो व भविष्यातील संशोधनासाठी उपयुक्त ठरतो.

**संदर्भ–**


* सिद्धर्शी गणी, आचार्य. उपमितभाव कथा.
* अमितगती, धर्मपरीक्षा (संस्कृत).
* साठे, श्रीनिवास. मरुभूमीतून बाहेर. पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१२.
* दोशी, रमेश. गुणवरेचे नथू काका. सुमेरू प्रकाशन, मुंबई, २०२०.
* श्री. दोशी यांचे गृह चैत्यालय, फलटण (प्रत्यक्ष निरीक्षण).


**ऋणनिर्देश –**


श्री. दोशी, फलटण यांनी मला ही चित्रे दाखवली त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार. गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिझम, कारंजा यांनी मला या विषयावर शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेत हा शोधनिबंध वाचण्याची परवानगी दिली त्याबद्दल त्यांचे आभार. माझे मार्गदर्शक प्रा. उमेश बगाडे यांच्याशी केलेल्या चर्चेची मदत हा शोधनिबंध लिहिताना झाली त्याबद्दल सरांचे आभार.


**( छायाचित्रे आतील रंगीत पृष्ठ क्र. ०४वर)**

*****

# महाराष्ट्रातील जैन पुरातत्त्व : एक संक्षिप्त आढावा

**ओशिन बंब,** प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्त्व विभाग,
डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था (अभिमत विद्यापीठ), पुणे.

ओशिन बम्ब हे भगवान शीतलनाथ चेअर फॉर जैन आर्किऑलॉजीमध्ये (प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्व विभाग, डेक्कन कॉलेज पोस्ट-ग्रॅज्युएट अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे - डीम्ड टू बी युनिव्हर्सिटी) मध्ये सहाय्यक प्राध्यापक आहेत. सध्या ते विदर्भातील जैन धर्मावर पीएच.डी. (Ph.D) करीत आहेत. त्यांनी इतिहास विषयात बी. ए. (फर्ग्युसन कॉलेज, पुणे, २०१९) आणि प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्त्व विषयात एम. ए. (डेक्कन कॉलेज, पुणे, २०२१) 'ज' ग्रेडने पूर्ण केले आहे. त्यांना व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियम-नेहरू ट्रस्ट फॉर इंडियन कलेक्शन्सकडून, तसेच इंडियन कौन्सिल फॉर हिस्टॉरिकल रिसर्चकडून जैन अभ्यासासाठी ट्रॅव्हल-कम-स्टडी ग्रँट मिळाले आहे. अनेक प्रतिष्ठित शोध नियतकालिकांमध्ये त्यांचे संशोधन लेख प्रकाशित झाले आहेत. तसेच त्यांनी जैन धर्म, आयकॉनोग्राफी, कला, मेगालिथिक स्थळे इत्यादी विषयांवर अनेक राष्ट्रीय परिषदांमध्ये व कार्यशाळांमध्ये व्याख्याने दिली आहेत.

शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच सामान्य लोकांमध्ये वारसा-जागृती निर्माण करण्यासाठी ते कार्यरत आहेत. खैरवाडा व यसंबा मेगालिथिक सर्कल्स (विदर्भ प्रदेश) वरील त्यांचे संशोधन शैक्षणिक क्षेत्र, प्रसारमाध्यमे आणि स्थानिक समाजामध्ये खूप चर्चेत आले आहे. भारतीय धर्मांचे पुरातत्त्व (विशेषतः जैन धर्म आणि बौद्ध धर्म संदर्भात), पश्चिम दख्खन येथील लेणी (Rock-cut Caves) व Public Archeology यामध्ये ते विशेष संशोधन करीत आहेत.

**विषय प्रवेश :**

जैन धर्म आणि परंपरा यांचा अभ्यास करताना अनेक ग्रंथ, पुराण, हस्तलिखिते, काव्य, टीका यांचा आढावा घेतला जातो. अक्षरं आणि ग्रांथिक उल्लेख हे व्यक्ती , जागा आणि कालानुरूप बदलल्या जाऊ शकतात, किंबहुना इतिहासाचे साधन म्हणून त्या बदलतच असतात. त्या होणाऱ्या बदलांना व त्यांच्या कारणांना समजून घेणे, म्हणजेच इतिहासाचा अभ्यास करणे होय. जैन धर्मीय म्हणून आपण अनेक गोष्टी लहानपणापासूनच विश्वास आणि श्रद्धा म्हणून मानत आलेलो असतो. श्रद्धा हा मानवीय स्वभावाचा महत्त्वाचा घटक आहेच, परंतु शास्त्रशुद्ध इतिहास हाच जगाला मान्य असतो, ग्रांथिक उल्लेख किंवा श्रद्धेपोटी मानलेल्या गोष्टी सहज इतर धर्मीय व्यक्ती स्वीकारणार नाही. पुरातत्त्व, हे असे साधन आहे जे मूर्त पुराव्यानिशी लिहिले जाते. या शास्त्रशुद्ध पद्धतीने जो इतिहास लिहिला जातो, तो अनेक पैलू उलगडतो जे कदाचित कुठल्याच ग्रंथांमधून आपल्याला माहीत होत नसतात. परंपरा ही विश्वासावर अवलंबून असते, पुरातत्त्व हे मूर्त साक्षांवर; अशा पुरातत्त्वाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील जैन धर्माचा संक्षिप्त आढावा घेणे, हे या ललित लेखाचे उद्देश्य आहे. खरंतर अशा विषयावर अनेक खंडांमध्ये लेखन अपेक्षित आहे, ते भविष्यात होईलच, परंतु त्या आधी हा एक छोटा प्रयत्न म्हणून लिहितोय.

**जैन धर्माची प्राचिनता :**

शाश्वत धर्म अशी आपण लहानपणापासून जैन धर्माची ओळख देत आलो आहोत, जगातील सगळेच धर्म स्वतःला शाश्वत म्हणवून घेतात, धार्मिक आख्यायिका मांडण्याची ती एक पद्धत आहे. जैन धर्माचे पुरातत्त्वीय पुरावे महाराष्ट्रात इसवी

सन पूर्व दुसरे-पहिले शतक, म्हणजे आज पासून अंदाजे २२००-२१०० वर्षा आधी पाले (छायाचित्र १) आणि लोहगडवाडी (जि. पुणे) या लेण्यांमध्ये आढळतात. अगदी साध्या असणाऱ्या या लेण्या त्या काळाच्या जैन धर्माची साक्ष देत आजवर उभ्या आहेत. डेक्कन कॉलेज, पुणे येथील प्रा. डॉ. ह. धी. सांकलिया आणि डॉ. शोभना गोखले (१९७१) यांनी पाले येथील शिळालेखाचे वाचन केले आणि जैन धर्माचे दक्खन प्रदेशातील सर्वात जुने पुरातत्त्वीय पुरावे जगासमोर आले. अगदी अलीकडे, कोविडच्या काळात डॉ. श्रीकांत प्रधान, श्री. काळे आणि टिम (२०२०) यांनी लोहगड किल्ल्याच्या अवतीभवती असलेल्या लेण्यांमध्ये तसेच एक शिळालेख प्रकाशित केले. महत्त्वाचे म्हणजे, दोन्ही शिळालेखांची सुरुवात 'नमो अरहंतानं' अशी आहे आणि दोन्ही शिळालेखांमध्ये 'भयंत इदरखीत' यांचा उल्लेख आहे. इसवी सन पूर्व दुसरे-पहिले शतक, हे महाराष्ट्रातील बौद्ध व वैदिक समाजाचे वाढते महत्त्व दाखवणारा काळ आहे, त्याच काळात हे (प्राकृत) इदरखीत (संस्कृत : इंद्ररक्षित) नावाचे जैन मुनि/आचार्य या भागामध्ये जैन धर्माचे प्रचार करीत होते, असे या दोन शिळालेखांवरून दिसते. भद्रबाहुचरित्र, कालकाचार्यकथा, कुवलयमाला, विविधतीर्थकल्प, पुराण, तीर्थवंदना इत्यादि अनेक ग्रांथिक उल्लेख महाराष्ट्राच्या जैन धर्मीय परंपरेबद्दल माहिती देतात. अगदी सुरुवातीच्या काळात, अंदाजे इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकामध्ये आचार्य भद्रबाहू दक्षिणेस आल्याचे सर्वांना माहित आहे, तसेच कालकाचार्य यांनी सातवाहन राजाच्या विनंतीवरून संवत्सरीची तिथी बदलल्याचे सुद्धा उल्लेख आहेत. इंग्रजकाळात अनेकदा जैन धर्माला हिंदू आणि बौद्ध धर्माची एक शाखा म्हणून संबोधणारे काही तज्ज्ञ होते, परंतु आज या दोन शिळालेखांवरून जगभरातील अभ्यासकांनी जैन धर्माचे अस्तित्व अगदी प्राचीन काळातसुद्धा महाराष्ट्राच्या भूप्रदेशामध्ये होते, हे मान्य केले आहे. जैन धर्माच्या पुरातत्त्वीय अभ्यासाचे एवढे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**महाराष्ट्रातील जैन वारसा :**

महाराष्ट्राला 'लेण्यांच्या देशा' सुद्धा म्हटले जाते. भारतातील सर्वात जास्त जैन लेण्या या महाराष्ट्रात आहेत. डॉ. विराज शाह (२००६; २००८) यांनी महाराष्ट्रातील जैन लेण्यांवर सविस्तर लिखाण करून या विषयावर महत्त्वाचे संशोधन केले आहे. अंदाजे वीसच्या जवळपास जैन लेणी समूह महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागांमध्ये आढळतात (छायाचित्र २). धाराशीव, खरोसा, अंबेजोगाई, वसे, पाटणे, भामेर, मोहिदा, चांभार लेणे, अंजनेरी, चांदवड, त्रिंगलवाडी, अंकई-टंकई, मांगी-तुंगी, दौलताबाद, एलोरा (वेरूळ), इत्यादि अनेक लेण्यांवर डॉ. शाह यांनी पुरातत्त्वीय दृष्टिकोनातून सविस्तर लिहिले आहे. सुरुवातीच्या काळात या लेण्या अगदी साध्या बनावटीच्या होत्या. कदाचित काही ठिकाणी या लेण्यांचा उपयोग मुनींच्या निवासासाठीसुद्धा होत असेल असे अभ्यासकांचे मत आहे. आज ज्या चौकटिबद्ध शिळाविण्यासाला व वास्तुशास्त्राला महत्त्व आहे, त्या काळी स्थापत्याचे नियम साचेबद्ध झालेले नव्हते. एखाद्या वास्तूची निर्मिती ही तत्कालीन आचार्य, मुनी, दानकर्ता, शिल्पी, स्थपति आणि प्रदेशाची भौगोलिक रचना व उपलब्ध साधने यावरून ठरत असे. स्थापत्य हे धर्मसापेक्ष नसतात, म्हणून या नंतरच्या काळातील लेण्यांचे तळविण्यास हिंदू, बौद्ध आणि जैन लेण्यांमध्ये थोड्या फार बदलासह सारखेच बघायला मिळते. धर्मानुसार स्थापत्याच्या परिकल्पना आणि त्यांच्या संरचना गरजेनुसार थोड्या फार बदलल्या जातात. यातील काही लेण्यांमध्ये (खरोसा, अंबेजोगाई- अंदाजे इसवी सनाचे सहावे-सातवे शतक ) समोरच्या भागात एक उंचवटा असलेला चौथरा दिसतो तर काही ठिकाणी (एलोरा- अंदाजे इसवी सनाचे आठवे-दहावे शतक) मानस्तंभ/ब्रह्मस्तंभ असल्याचे दिसते. या जैन लेण्या किंवा मंदिर तीर्थंकरांच्या समवसरणाचे प्रतिकात्मक प्रतिकृती असतात, असे डॉ. लिझा

ओवेन (२०१२) यांच्या एलोरा येथील जैन लेण्यांवरील अभ्यासावरून सिद्ध झाले आहे. अगदी अनेक हस्त असलेले आनंद नृत्य करीत असलेले सौधर्म इंद्र (छायाचित्र ३), सर्वतोभद्र असे चौमुखी जिन, पशू-पक्षी, देव-देवी, उपासक-उपासिका असे अनेक अंकन मूर्ति व भित्तिचित्र स्वरूपामध्ये एलोरा येथे बघावयास मिळतात. एवढेच नव्हे, तर चौबीसी, कमठोपसर्ग, बाहुबली यांचे तप, मुनी आणि आर्यिका संघ, दानकर्ते, ब्रह्मचारी, मुनींचे आहारदान, पद्मावती, चक्रेश्वरी, सर्वानुभूती यांचे कलात्मक चित्र व मूर्ती एलोरा येथे पाहावयास मिळतात. पहाड मंदिर (अंदाजे इसवी सनाचे तेरावे शतक), एलोरा येथील शिळालेखावरून या पहाडाचे नाव चारणाद्री असल्याचे देखील समजते. अनेक जिनमूर्त्या आणि मंदिरांमध्ये असलेले शिळालेख महत्त्वाची ऐतिहासिक माहिती देतात. महत्त्वाचे म्हणजे विशेष काळजीपूर्वक विचार करूनच लेणी कोरण्याचे स्थान निश्चित केले जात असे. अनेकदा व्यापारी मार्ग जात असलेल्या ठिकाणांवर या लेण्या कोरल्या गेल्या आहेत. जैन धर्मीय लेण्या अगदी चौदाव्या-पंधराव्या शतकापर्यंत कोरल्या जात होत्या असे मांगी-तुंगी, मुक्तागिरी (बंब २०२४: १३५-१५०) येथील उदाहरणांवरून समजते.

आज सगळीकडे जुनी मंदिरे उतरवून नवीन मंदिरं बांधणे आणि जुन्या मंदिरांचे गैरशास्त्रीय व ओबडधोबड पद्धतीने (unsystematic) जीर्णोद्धार सुरू आहे. जीर्णोद्धार ही काळानुरूप करावयाची प्रक्रिया आहेच, परंतु शास्त्रशुद्ध पद्धतीने जुन्या स्थापत्याचे दस्ताऐवजीकरण न करता किंवा गरज नसताना मंदिराचे मूळ स्वरूप पूर्णपणे बदलल्या जात आहेत. मंदिरांचे खरे ऐतिहासिक रूप बदलून अनावश्यक खर्च करून पुरातत्त्वीय महत्त्व खंडित केल्या जात आहेत. समाजामध्ये पुरातत्त्वाविषयी जागरूकता निर्माण करणे म्हणूनच गरजेचे आहे. मूर्त्यांना, दगडी मंदिरांना सीमेंट, ऑइल पेंट अशा गोष्टी वापरुन अनेक ठिकाणी विद्रूप केल्या जात आहेत. यामुळे फक्त इतिहासाचे नुकसान होत नाही, परंतु तत्कालीन आचार्यांनी, संघांनी आणि स्थपतींनी केलेल्या निर्मितीचा ऱ्हास होतो आणि त्या स्थापत्याचे आयुष्य सुद्धा कमी होत जाते. महाराष्ट्रात अशी दगडी स्थापत्याची जैन मंदिरे कोल्हापूर, पद्मपुर (बंब २०२५ : ३०-३७), अंजनेरी, दौलताबाद (देवगिरि), शिरपूर, फलटण, भद्रावती, गढचांदूर इत्यादि अनेक ठिकाणी आढळतात. सामान्यतः हेमाडपंती म्हणून आपण या मंदिरांना संबोधतो, परंतु असा कुठला शब्द स्थापत्य आणि वास्तुशास्त्राच्या ग्रंथांमध्ये नाहीये. यादव राजवट असताना इसवी सनाच्या बाराव्या-तेराव्या शतकामध्ये या मंदिरांची निर्मिती झाल्याचे समजते. दिगंबर आणि श्वेतांबर दोन्ही संप्रदायांचे पुरातत्त्वीय साक्ष आपल्याला या काळात दिसतात. लातूर जिल्ह्यामध्ये एकेकाळी अस्तित्वात असलेल्या यापनीय संप्रदायाचे शिळालेखिय पुरावे सुद्धा सापडतात. या काळातील जैन मंदिरांचे स्वरूप तत्कालीन नागर किंवा भूमिज शैलीचे असायचे ज्यात मुखमंडप, मंडप, अंतराळ, गर्भगृह हे घटक सामील होते. परंतु चौदाव्या-पंधराव्या शतकानंतर आपल्याला शिखर नसलेले किंवा वर उल्लेखिलेले स्थापत्याचे घटक नसलेले जैन मंदिर अनेक ठिकाणी बघायला मिळतात. चुना, माती, विटा, लाकुड अशा वस्तूंचा उपयोग करून काळ, धार्मिक स्थिति, समाज, आर्थिक स्थिति, राजकीय घडामोडी अशा अनेक कारणांमुळे स्थापत्य सुद्धा बदलत जातो हे लक्षात येते. या काळात मूर्त्या व मंदिरे घडविण्यासाठी स्थानिक शिल्पी व स्थपती यांचा सहभाग असायचा. परंतु महाराष्ट्रात आज ही परंपरा अबाधित असल्याचे दिसत नाही, किंबहुना प्रतिष्ठांमध्ये सगळ्या मूर्त्या राजस्थानवरूनच बोलवल्या जात आहेत, असे दिसते. स्थानिक कला आणि स्थापत्य यांना महत्त्व न दिल्यामुळे ही स्थानिक शैली आणि परंपरा आज अस्तित्वात राहिली नाही.

अनेक गृहचैत्यालये याच मध्ययुगीन आणि

उत्तर मध्ययुगीन काळात उदयास आलेली दिसतात. या मध्ययुगीन आणि उत्तर मध्ययुगीन मंदिरांचा स्थापत्याच्या दृष्टीने अभ्यास महत्त्वाचा आहे. अनेक मंदिरांमध्ये ज्ञानभांडार, विहिर, भुयार, पंचमेरू, मानस्तंभ, चरण, यंत्र, लाकडी कला, धातूच्या प्रतिमा आणि सहस्रकूट यांसारख्या गोष्टी हमखास आढळतात. धातूच्या महत्त्वाच्या प्रतिमा विदर्भातील राजणापुर खिनखीनी, खानदेशातील चोपडा इत्यादि ठिकाणावरून सापडल्या आहेत. अशा धातूच्या 'चल' प्रतिमा घडविताना अनेक क्रिया केल्या जात होत्या, मानसार सारख्या ग्रंथामध्ये त्याचे सविस्तर वर्णन आले आहे. मधुच्चछिष्टविधान असे या धातू प्रतिमा घडवण्याच्या पद्धतीचे नाव होते ज्यात मेणापासून मूर्ती घडवून त्यावर मातीचा लेप लावून साचा बनवून त्यात वितळलेले धातू टाकून मूर्ती घडवल्या जायची. तत्कालीन धार्मिक क्रिया, व्यवस्था, समाजाच्या गरजा अशा गोष्टींना अनुसरून या घटकांना मंदिरांमध्ये स्थान दिल्या गेले. आज जरी सगळीकडे स्थानिक स्थापत्य शैलीला न समजता, गुजरात-राजस्थान येथील मारू-गुर्जर शैलीतील मंदिरांना पसंती दिल्या जात असल्या, तरी महाराष्ट्रातील विविध प्रदेशांमध्ये आपापली स्वतंत्र शैली आणि स्वरूप होते, ते समजून घेणे आणि त्यांचे जतन-संवर्धन करणे हे आपले कर्तव्य आहे.

**समाजाची भूमिका काय असावी :**

जैन समाजाचा मोठा वर्ग आर्थिक दृष्ट्या समृद्ध आहे. एकीकडे पंचकल्याणक प्रतिष्ठांमध्ये लाखो रुपये लावून ठिकठिकाणी नवीन जिनालयांची निर्मिती होत आहे, जे समाजाला गरजेचे आहेच, परंतु हे सगळे होत असताना दुसरीकडे अनेक जैन वारसास्थळे आज खंडहर झालेली आहेत (छायाचित्र ४). अनेक ठिकाणी जिनमूर्त्या- ज्यांची प्रतिष्ठा मुनि, आचार्य, भट्टारक, चतुर्विध संघाने अत्यंत श्रद्धेने केली होती, आज मोडक्या आणि वाईट अवस्थेत असून इकडे तिकडे विखुरल्या आहेत. मूर्त्या किंवा जिनमंदिर हे पूजनीय आहेतच परंतु या खंडित गोष्टीसुद्धा इतिहासाची आणि तत्कालीन समाजाकडून आपल्याला मिळालेला वारसा आहे. त्यांना सुस्थितीत म्युजीयम बनवून सविनय ठेवल्या जायला हवे. इतिहास, पुरातत्त्व ही त्या-त्या संस्कृतीची ओळख असते, या विषयांवर अधिक संशोधन, संवर्धन होणे काळाची गरज आहे. समाजाने पुढे यावे, पुरातत्त्व विभाग आणि सरकारी यंत्रणांचा सहयोग करावा, शास्त्रशुद्ध पद्धतीने या वारसाची जोपासना करून धर्म आणि देशाप्रती आपले ऋण व्यक्त करावे आणि पुढच्या पिढीला हा वारसा सुस्थितीत सुपूर्द करावा अशी अपेक्षा आहे.

**संदर्भ :**


✻ Bamb, Oshin. 2024. "A Unique Partially Rock-cut and Partially Structural Jain cave temple : Cave no. 10 at Muktagiri." Ancient Asia 15 (1): 135-150.

✻ Bamb, Oshin. 2025. "Forgotten Jain Sacred Centre of Padamur, District Gondia, Maharashtra: An Iconograhic Study." Sanmati 75 (9) : 30-37.

✻ Owen, Lisa. 2012. Carving Devotion in the Jain Caves at Ellora. Leiden and Boston: Brill.

✻ Pradhan, Shrikant, Abhinav Kurkute, and Vivek Kale. 2020. "Recently Noticed Inscrition from Lohagadwadi (Fort Lohagad), District Pune, Maharashtra, India." Ancient Asia 11: 1-7.

✻ Sankalia, H. D., and S. Gokhale. 1971. "A Brāhmī Inscrpition from Pale." Epigraphia Indica 38 (4): 167-68.

✻ Shah, Viraj. 2006. "Jainism in Maharashtra, India: History and Development." In Kevala Bodhi Buddhist and Jain History of the Deccan vol. II, edited by Aloka Parasher-Sen, 242-65. Delhi: Bharatiya Kala Prakashan.

✻ Shah, Viraj. 2008. Jaina Rock-Cut Caves in Western Deccan. New Delhi: Agam Kala Prakashan.


**( छायाचित्रे आतील रंगीत पृष्ठ क्र. ०४वर)**

✻✻✻✻✻

# छ. संभाजीनगर येथे दि.२६-२७ जुलै २०२५ला संपन्न झालेल्या जैन दृश्य वारसा- चित्रे, पुरातत्त्व आणि मूर्तिशास्त्र या राष्ट्रीय परिषदेविषयी प्राप्त निवडक अभिप्राय....

१)

जय जिनेन्द्र !

छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय (इतिहास विभाग) व श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकुल) कारंजा-लाड द्वारा संचलित गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिझम यांच्या संयुक्त विद्यमाने जैन दृश्य वारसा- चित्रे, पुरातत्व व मूर्तिशास्त्र ही दोन दिवसीय परिषद आयोजित केली होती. ही परिषद यशस्वी करण्याची जबाबदारी आमच्या शाखेवर देण्यात आली होती. आपण ही परिषद यशस्वी करण्यास हातभार लावू शकतो की नाही असा संभ्रम सुरुवातीला निर्माण झाला होता, परंतु उत्साहात पुढील तयारीला लागलो.

उद्घाटन सत्र न्यायमूर्ती श्री. चांदीवाल सर, विभागीय आयुक्त श्री. पापळकर सर, प्राचार्य श्री. नवल थोरात सर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

परिषदेतील वेगवेगळ्या सत्रांतून डॉ. मनीषा पाटील (नागपूर), जैन तत्त्वज्ञानाचे अभ्यासक अमलप्रभ चवरे (कारंजा), प्रा. रूपेश मडकर, प्रज्ञाताई डोणगावकर, डॉ. प्रणोती लाड(पुणे), युवा प्रो. ओशिन बंब, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. महावीर शास्त्री आदि मान्यवरांचे विचार ऐकण्याची संधी मिळाली. विदर्भातील दिगंबर जैन भांडारातील सचित्र ग्रंथ, अंतरिक्ष मूर्तीबद्दल असणारे वैज्ञानिक दृष्टिकोन, भित्तिचित्रांचा अभ्यास, कारंजा येथील पंचकल्याणक पटाचे पावर पॉइंट द्वारे सुंदर सादरीकरण, जैन मंदिरांच्या स्थापत्यशैली बद्दल सादरीकरण, पुरातत्त्व शास्त्राचे जैन समाजाच्या परिप्रेक्ष्यातून महत्त्व इ. विषय हाताळण्यात आले. अनेक मान्यवंत, कलावंत, ज्ञानवंत व प्रज्ञावंतांच्या ओळखी झाल्या. मन आणि बुद्धी यांना मनसोक्त ज्ञानामृत प्राशन करता आले. विचारांना नवी दिशा मिळाली.

प्रज्ञाताई व त्यांच्या टीमचे खूप खूप अभिनंदन! त्यांच्या पुढील कार्यासाठी अगणित शुभेच्छा!! अशा राष्ट्रीय परिषदा वारंवार व्हावयास हव्यात. मान्यवर व्याख्याते व कलाभ्यासक करीत असलेल्या कार्यात जमेल तसे योगदान देण्याचा निश्चय करून दोन दिवसीय परिषदेचा समारोप झाला. ही परिषद संभाजीनगर येथे घेतल्याबद्दल आयोजकांचे व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मदत केल्याबद्दल संभाजीनगरच्या सदस्यांचे खूप खूप धन्यवाद!!

दोन दिवसीय परिषदेत जी बौद्धिक व तेवढीच रंजक मेजवानी मिळाली, त्या मेजवानीने ज्ञानग्रहणाची भूक काही अंशी भागली व काही अंशी अजून वाढली. शेवटी असे म्हणावेसे वाटते की,
जे जे येथे अनुभवले ते सदैव काळजात राहील,
पुन्हा पुन्हा आपल्या भेटीची मन सदैव वाट पाहील!
सर्वांना परत एकदा खूप खूप शुभेच्छा!

**सौ. दीपा प्रवीण जिंतूरकर**
अध्यक्ष, जैन बघेरवाल संघ,
(छ. संभाजीनगर)

२)

सन्माननीय अधिकारी वर्ग व पाहुणे यांच्या उपस्थितीत जैन मंगलाचरणाने भारदस्त उद्घाटन हे परिषदेचे वैशिष्ट्यच! या परिषदेतील प्रत्येक विषय, विषयावरील भाष्य करणारे माहिती देणारे प्रभावी व प्रगल्भ विषयतज्ज्ञ पाहून खरे म्हणजे ही ज्ञानियांची मांदियाळीच होती, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही! प्रत्येक विषयातील तज्ज्ञ अभ्यासकांनी विषयांतर्गत केलेले सूक्ष्म संशोधन तत्त्वनिष्ठ, विज्ञानाधिष्ठित व अभ्यासपूर्ण असल्यामुळे उपस्थित जैन व जैनेतर शिबिरार्थींची उत्सुकता शिगेला पोहोचलेली आढळली. जैन दृश्य वारसा, चित्रे, पुरातत्त्व व मूर्तिशास्त्र या विषयीची अभिरूची वाढतच गेली. सकाळी साडेनऊ ते सायंकाळी पाचपर्यंतचा वेळ सुद्धा अपूर्ण पडत गेला. प्रत्येक वक्त्याजवळ असलेली भरपूर माहिती पाहून

परिषदेचे दोन दिवस कमी पडले की काय, असे वाटणे स्वाभाविक आहे.

उपस्थितांना जैनदर्शन, तत्त्वज्ञान, इतिहास, संस्कृती, परंपरा, साहित्य कला, स्थापत्य कला, मूर्तिकला, त्याबाबतचे तात्त्विक विज्ञाननिष्ठ निरुपण प्रत्यक्ष पुराव्यानिशी केल्याने या बद्दलची आस्था, ज्ञानाची ओढ, माहितीचा प्रभाव किती पडला, हे उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांवरून कळून येते. जैन धर्मात चमत्काराला नमस्कार नाही. या संशोधनात्मक कार्याने समाजाची धर्मावरील श्रद्धा अधिक वाढते, कारंजा लाड, छ. संभाजीनगर, मुंबई, पुणे, सोलापूर, कोल्हापूर येथील सर्व तज्ज्ञ अभ्यासकांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो व आभार मानतो. खरे तर आजच्या काळात आपले हे धर्मकार्य धर्मप्रभावनाच आहे, आजच्या काळातील सत्कर्म, पुण्यकर्मच आहे.

प.पू. श्री समंतभद्रजी महाराज आमच्या टोपरे कुटुंबियांचे आद्य दैवत आहेत. पूज्य महाराजांनी आमच्या आईवडीलांना आश्रमशाळेत शिक्षक म्हणून सेवा करण्याची संधी दिली. आमच्या जीवनाचे सार्थक झाले.

आज आश्रमतर्फे अतिशय प्रशंसनीय धर्मप्रभावनेचे कार्य होत आहे. माझ्या वयाच्या ८०व्या वर्षात आम्हाला या परिषदेला उपस्थित राहण्याची सुवर्ण संधी आमचे बालपणापासूनचे सन्मित्र श्री. कीर्तिकुमार भोरे यांनी दिली, त्यांचे, सर्व संबंधितांचे व प्रा. श्री. रुपेश मडकर सर यांनी मार्गदर्शन केले त्याबद्दल सर्वांना मनस्वी धन्यवाद!

**सुदर्शन के.टोपरे**
(राष्ट्रीय व राज्य पुरस्कार प्राप्त माजी प्राचार्य)
अंजनगाव सुर्जी, ९४२१७३६३७८

३)

जैन दृश्य वारसा : चित्रे, पुरातत्त्व व मूर्तिशास्त्र ही परिषद छ.संभाजीनगर येथे घेण्यासंदर्भात प्राथमिक माहिती देणारा आईचा (प्रज्ञा डोणगावकर) फोन आला व सगळी सूत्रे फिरू लागली. लहानपणापासून गुरुकुल संस्थेशी असलेले ऋणानुबंध व आई आणि कीर्तिकाका भोरे ह्यांची हक्काची सूचना ह्यामुळे मी ह्या परिषदेशी जोडली गेले.

ह्या परिषदेत प्रस्तुत झालेले विषय, वक्त्यांनी त्यांची केलेली अभ्यासपूर्ण मांडणी, व्यवस्थापन ह्याबद्दल अनेक प्रतिक्रिया आल्या आहेत, पण मी मात्र माझा अनुभव मांडत आहे.

आई व कीर्तीकाका ह्या परिषदेच्या पूर्वतयारीसाठी आमच्या छ. संभाजीनगरला येणार असे ठरताच स्थानिक जैन समाजाची एक मिटिंग घेऊ या, असे ठरविले आणि तसा मेसेज आमच्या 'हम सब एक है' ह्या whatsapp group वर टाकला आणि खरोखरच ह्या नावाला जागत सगळे औरंगाबादकर या मिटिंगसाठी फक्त उपस्थितच नव्हते तर पहिल्याच दिवशी प्रत्येकाने आपापली जबाबदारी उचलली व ती शेवटपर्यंत उत्साहाने निभावलीसुद्धा!!

या निमित्ताने एक परिषद यशस्वी होण्यासाठी लागणारी विविध पातळ्यांवरील तयारी, दोन वेगवेगळ्या संस्थांमधील समन्वय, बारकावे, मानपान, छोट्या-मोठ्या चुका अशा अनेक गोष्टी शिकायला व अनुभवायला मिळाल्या.

ज्यांच्या उल्लेखाशिवाय हा लेख अपूर्ण राहील असे नाव म्हणजे, प्रा. रुपेश मडकर सर. स्वतःच्या इतिहास विषयाचा व्यासंग, शासकीय महाविद्यालयात काम करताना करावी लागणारी कसरत, प्रोटोकॉल सांभाळून करावे लागणारे काम....यापेक्षाही जैन धर्माविषयीची त्यांची आंतरिक तळमळ हेच ही परिषद यशस्वी होण्याचे प्रमुख कारण! कारंजा गुरुकुल, शासकीय महाविद्यालय व प्रत्यक्ष काम करणारी औरंगाबादकर मंडळी ह्यांच्यातील एक महत्त्वाचा दुवा म्हणजे मडकर सर! 'मी आपल्यातलाच एक' असं प्रत्येकाला वाटायला लावणारा हा माणूस!

परिषदेची तारीख, रूपरेषा ठरवण्यापासून ते शेवटच्या आवराआवरी पर्यंतची कित्येक कामे अथकपणे, वेळकाळ न बघता, कुठलीही पद-प्रतिष्ठा मध्ये न आणता करण्याची त्यांची तयारी वाखाणण्याजोगीच! त्यांच्या उच्च अधिकारी असणाऱ्या पत्नी व संपूर्ण कुटुंबाच्या साधेपणाने मी प्रभावित झाले.

७५व्या वयात असणारा कीर्तिकाकांचा उत्साह, संस्थेप्रति तळमळ व माझ्यावर टाकलेला नि:संदिग्ध विश्वास माझ्यासाठी फार मोलाचा होता.

आई म्हणून व एक व्यक्ती म्हणून आईकडून अजूनही खूप शिकण्यासारखे आहे, हेदेखील या निमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले.

माझ्या कुटुंबाची साथ व आमच्या छ. संभाजीनगर बघेरवाळ संघाने दाखविलेला एकोपा व जबाबदारीची जाणीव तर अतुलनीयच!!

मी ह्या परिषदेचे फक्त एक co-ordinater होते. तरीही हे वेगळे काम करण्याचा अनुभव मला बरेच काही शिकवून व सर्वार्थाने समृद्ध करून गेला.

**–मेधावी मिश्रिकोटकर,** (छ.संभाजीनगर)

४)

या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेबद्दल मला श्री. भरत काका भोरे यांनी जवळपास दीड महिन्यापूर्वी मेसेज करून सांगितले होते. सुरुवातीला या परिषदेला जावं की नाही, असा संभ्रम मनात होता.... नंतर मात्र आपल्याला आवड आहे, तर आपण आवर्जून जायलाच हवं, असे वाटून जायचे ठरवले.

पहिलं सेशन होतं ग्रेट आर्टिस्ट डॉ. मनीषा पाटील मॅडमचं. पाटील मॅडम सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट( मुंबई) येथे कलेचा इतिहास या विषयाच्या माजी प्राध्यापिका आहेत. मनीषा पाटील यांनी 'विदर्भातील दिगंबर जैन भांडारातील सचित्र ग्रंथ व चित्रे– एक कला ऐतिहासिक अभ्यास' या विषयावर अगदी सविस्तर अभ्यासपूर्ण विवेचन सादर केले. त्यानंतर श्री. अमलप्रभ चवरे यांनी नेमगिरी, जिंतूर व शिरपूर येथील अंतरिक्ष पार्श्वनाथ भगवंताच्या मूर्तींचे अंतरिक्षात म्हणजेच हवेमध्ये तरंगत असण्या किंवा नसण्याबद्दलचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून विश्लेषण केले. अनेक तथ्ये त्यांनी सर्वांसमोर ठेवली. माझ्यासारख्या अनेकांना एक नवा वैज्ञानिक दृष्टिकोन मिळाला. त्याबरोबरच अनेक प्रश्न सुद्धा निर्माण झाले.

या सत्रानंतर लगेचच प्रा. रूपेश मडकर सरांनी भित्तीचित्रांवरील त्यांच्या अभ्यासाचे सुंदर सादरीकरण केले. त्यानंतर  प्रश्नोत्तरांचे सत्र घेण्यात आले आणि मग परिषदेच्या पहिल्या दिवसाची समाप्ती झाली.

पहिल्या दिवशीच 'आपण येथे आलो, या परिषदेला उपस्थित राहिलो ते बरेच झाले..' असे सार्थकी समाधान घेऊनच घरी गेलो....!

दुसऱ्या दिवशी सुद्धा ज्ञानाची, विचारांची मेजवानी मिळणार म्हणून उत्साहाने लवकर परिषदेच्या स्थळी पोहोचलो. दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात प्रज्ञा काकू डोणगावकर यांनी दिगंबर जैन सेनगण मंदिर (कारंजा लाड) येथील विस्तृत अशा पंचकल्याणक–पटाचे पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे सुंदर सादरीकरण करून माहिती दिली. हे सादरीकरण बघून तर सर्वजण थक्कच झाले होते... संपूर्ण सत्रामध्ये पंचकल्याणकपटाची माहिती ऐकताना–समजून घेताना, कोण असेल बरं ते थोर महान चित्रकार ज्यांनी इतके अप्रतिम सुंदर असे चित्रिकरण केले आहे, असा प्रश्न सतत मनात येत होता. तो पंचकल्याणकपट जेवढा म्हणून डोळ्यांत आणि मनात साठवता येईल, तेवढा साठवण्याचा प्रयत्न करत होतो. आणि हा पट प्रत्येकाने आवर्जून प्रत्यक्ष बघायलाच हवा व याचे कायमच अगदी काळजीपूर्वक जतन संवर्धन सुद्धा व्हायला हवे. कारण ही अशी अप्रतिम सुंदर कला आपल्या धर्म व समाजाचा अभिमान वाटावा असा संचित ठेवा आहे. यामध्ये प्रज्ञा काकू डोणगावकर यांचे सुद्धा कौतुक आणि आभार मानावे तेवढे कमीच.. त्यांनी त्या पटाची माहिती अतिशय सुंदर रीत्या समजावून सांगितली.

यानंतर दुसरे सत्र सिंहगड स्कूल ऑफ आर्किटेक्चर, पुणे येथील आर्किटेक्चरल कंजर्वेशनच्या विभागप्रमुख डॉ. प्रणोती लाड यांनी घेतले. यांनी महाराष्ट्रातील जैन मंदिरांच्या स्थापत्यशैलीबद्दल सादरीकरण व मार्गदर्शन केले. डॉ. प्रणोती लाड मॅडमच्या मार्गदर्शनामुळे जैन मंदिरांकडे बघण्याची, त्यांचं निरीक्षण करण्याची एक नवीन कलात्मक व ऐतिहासिक दृष्टी मिळाली.. आजपर्यंत जैन मंदिरांचा असा कधी विचारच केला नव्हता..

तिसरे सत्र डेक्कन कॉलेज, पुणे येथे असिस्टंट प्रोफेसर असणारे ओशीन बंब सर यांचे झाले. ओशीन बंब सरांनी पुरातत्त्व शास्त्र म्हणजे काय..? इतिहासात पुरातत्व शास्त्राचे काय महत्त्व आहे..? जैन धर्म व समाजाच्या परिप्रेक्ष्यातून पुरातत्त्व शास्त्राचे महत्त्व, अशा जैन धर्म व पुरातत्व शास्त्राशी संबंधित अनेक मुद्द्यांवर त्यांनी केलेले संशोधन व अभ्यास सविस्तर विवेचन करून पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे समजावून सांगितले. हे विवेचन एकांगी किंवा धार्मिक न होता अगदी ॲकॅडेमिक पद्धतीने अस्खलित वक्तृत्वातून झाले. यातूनच अगदी कमी वयात ओशीन बंब सरांचा या क्षेत्रातील प्रचंड व्यासंग व ज्ञान निदर्शनास आले. हे सत्र सुद्धा खूप खूप छान झाले.

यानंतर समारोपाचा कार्यक्रम झालात

अनेकांनी या परिषदेबद्दल आपल्या मनोगतातून अभिप्राय व्यक्त केले. आभार प्रदर्शन झाले. अनेक मान्यवरांचा, ज्ञानवंतांचा, प्रज्ञावंतांचा सत्कार करण्यात आला.. व त्यानंतर सर्व टीमचे ग्रुप फोटो घेऊन राष्ट्रीय परिषदेची सांगता करण्यात आली..

खरेच मी तर धन्य धन्य झालो होतो या परिषदेला येऊन अनेक मान्यवर, ज्ञानवंत, प्रज्ञावंतांच्या ओळखी झाल्या. त्यांच्याशी संवाद साधता आला, प्रश्न विचारता आले. मनसोक्त अगदी मन आणि बुद्धी भरून ज्ञानामृत प्राशन करायला मिळाले. एक नवी दृष्टी मिळाली. विचारांना नवी दिशा मिळाली आणि जैन कला, जैन इतिहास व जैन पुरातत्व या क्षेत्रात भरपूर काम करण्याचे प्रोत्साहन मिळाले. या राष्ट्रीय परिषदेच्या ठिकाणी इतिहास विषयक विविध ऐतिहासिक पुस्तकांचा स्टॉल सुद्धा लागला होता. तेथून भरपूर ज्ञानसंपदा खरेदी करता आली.. अगदी लुटता आली..

अशा राष्ट्रीय परिषदा पुन्हा पुन्हा व्हायला हव्या. दरवर्षी विविध ठिकाणी या परिषदा व्हायला हव्या. पुढील परिषदेच्या कामात व मान्यवर व्याख्याते इतिहास व कला अभ्यासक करत असलेल्या कामात जमेल तसे योगदान देऊ, असे आश्वासन देऊन व निश्चय करून दोन दिवसांच्या वैचारिक व कलात्मक विश्रांतीनंतर जड मनाने रोजच्या पोटापाण्याच्या धावपळीच्या जगात प्रवेश केला!

पुन्हा एकदा इतिहास विभाग, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छ. संभाजी नगर, आणि श्री. म. ब्र. आश्रम द्वारा संचालित गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिजम, कारंजा लाड यांच्या सर्व टीमला तसेच छ. संभाजीनगरच्या जैन बघेरवाल शाखेला सुद्धा अनेक धन्यवाद! कारण या शाखेच्या सदस्यांनी सुद्धा ही परिषद यशस्वी होण्यास खूप खूप मोठा हातभार लावला. तर अशी ही जैन दृश्य वारसा : चित्रे, पुरातत्व व मूर्तिशास्त्र ही कलात्मक व वैचारिक राष्ट्रीय परिषद आयोजित केल्याबद्दल खूप खूप धन्यवाद...! खूप खूप आभार...

**–रजत विनय दर्यापूरकर,**
कला शिक्षक, अमरावती

५)

या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत अनेक वक्त्यांनी आपआपल्या विषयानुसार पुरातत्त्व काळातील जैन संस्कृती, समाज त्यांची वेशभूषा, ग्रंथसंपदा जैन मूर्तिकला, चित्रकला, स्थापत्य इतिहास, यांची महत्त्वपूर्ण माहिती विशद केली.

प्रा. मडकर सरांनी मूर्तिशास्त्राबद्दल सखोल माहिती तर मनीषाताईंनी जैन मंदिरातील लघुचित्रे, कारणपरत्वे जैन समाजाचे राजस्थान गुजरात राज्यातून विदर्भात कसे स्थलांतर झाले याचे सुंदर वर्णन केले. त्या वेळेला त्यांनी जैन संस्कृतीचे रक्षण करून, त्यांनी स्वहस्ते लेखन केलेले शास्त्रज्ञान, जैन सचित्र कथा, पुराणपद्धती याची महत्त्वपूर्ण माहिती दिली.

डॉ. प्रणोतीताईंनी जैन इतिहास, वास्तु–कलेतील विविधता, भट्टारक परंपरा व त्यांनी जैन समाजाला केलेले मार्गदर्शन, मंदिराची सुरक्षा, त्या काळातील राजकीय घडामोडी यांचे सुंदर शब्दात सादरीकरण केले.

प्रज्ञाताईंनी जैन काशी, कारंजा–लाड येथील जैन सेनगण मंदिराचा जीर्णोद्धार करताना निघालेला सुरक्षित, ऋषभनाथांचा 'स्वर्ण–पंचकल्याणक पट' याविषयी उत्कंठा वाढवणारी, माहिती सादर केली. प्रत्येक दृश्यातील सूक्ष्मता, कारणकार्य–मीमांसा, योग्य शब्दांच्या माध्यमातून, श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या, वक्तृत्वशैलीने समजावून सांगितल्यामुळे अननुभूत, अवर्णनीय आनंद झाला. आपले पूर्वज सर्वच कलेनी समृद्ध, संपन्न होते, याची साक्ष हा पट देतो. तज्ज्ञानुसार राजस्थानी घाटाचा, नावीन्यपूर्ण, अद्भुत, पुरातन पट, अनुपम, मार्गदर्शक, नि प्रेरकही आहे.

या दोन दिवसीय सेमिनारचे योग्य संचलन आयोजकांनी केलेल्या उत्कृष्ट नियोजनामुळे, टेन्शनरहित आम्हा सर्वांना सेमिनारचा आनंद घेता आला.

पुनश्च सर्व वक्त्यांचे विद्वानांचे अभिनंदन मी मनःपूर्वक आभार मानून, योग्य मार्गदर्शनासाठी औरंगाबादला जरूर यावे, ही इच्छा व्यक्त करते.

या राष्ट्रीय परिषदेतून आचार्य लिखित शास्त्रांच्या माध्यमातून, जैनतत्त्व प्रणालीचे ज्ञान करून काही अंशी जीवनात उतरवून अत्युत्तम शास्त्राचे मनन, करून या पुरातन जैन दुर्लभ ठेव्याचे रक्षण करून, आपले जीवन सार्थक करून काही प्रमाणात आत्मकल्याण करण्याचा प्रयत्न करूया.

**सौ. विजया यावलेकर**

*****



# तारदाळची जिगरबाज अधिकारी – लेफ्टनंट प्रियंका खोत

– श्री.जितेंद्र आणुजे,
सन्मति विद्यालय, तारदाळ

कर्तृत्वाच्या शिरपेचात मानाचा तुरा.. तारदाळची माती वीरांची, संतांची आणि शौर्यशाली परंपरेची आहे. याच मातीतून वाढलेली एक धैर्यशील कन्या आज भारतीय सैन्यदलातील शौर्याचा नवा अध्याय लिहित आहे. ती म्हणजे – लेफ्टनंट प्रियंका खोत.

दुःखातून उगवलेले धैर्य म्हणजे प्रियंका मॅडम. दोन वर्षांपूर्वी त्यांचे पती निलेश खोत यांनी देशासाठी सर्वोच्च बलिदान दिले. शहीद झाल्यानंतर पहिली रॅली व पहिल्या घोषणेचा आवाज बाहुबली विद्यापीठ संचलित सन्मति विद्यालय तारदळाच्या कमानी पासून दुमदुमला. हे पुण्य कार्य आम्हास लाभले.

निलेश साहेबांच्या जाण्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. परंतु प्रियंका खोत यांनी त्या दुःखाच्या जखमा कवटाळून न बसता त्यातूनच शौर्याचा मार्ग शोधला. त्यांनी ठरवलं –पतीचे अपूर्ण स्वप्न मी पूर्ण करेन... देशासाठी माझेही जीवन समर्पित करेन. या जिद्दीच्या मशालीला सर्व खोत परिवार ज्येष्ठ अध्यापक व्ही. एम. खोत सर, खोत वहिनी, सर्व कुटुंबीय, निलेशचे आई–वडील, प्रियंका मॅडम यांचे आई–वडील सर्व कुटुंबीय यांच्यासह सर्वांनीच आधार दिला.

चार वर्षांच्या चिमुकलीला हातात धरून त्यांनी चेन्नई येथे कठोर सैनिकी प्रशिक्षण सुरू केले. उष्णतेच्या लाटेत, खडतर सरावात, शरीर थकले तरी मनोबल मात्र तसूभरही ढळले नाही. प्रत्येक पाऊल, प्रत्येक घामाचा थेंब, हा देशासाठीच वाहिला. आणि अखेर – लेफ्टनंट पदावर नियुक्त होऊन त्यांनी पतीच्या शौर्यगाथेला स्वतःच्या धैर्याची जोड दिली. खोत परिवाराच्या घरी सोन्याचा दिन आला. अभिमानाचे अश्रू तरराळे. या यशाची बातमी मिळताच आई आणि सासूबाईंच्या डोळ्यांतून अश्रू अलगद गालावरून ओघळले. पण ते अश्रू होते दुःखाचे नव्हे, तर अभिमानाचे!

त्या मोत्यांसारख्या थेंबांनी सांगितले – आमची प्रियंका केवळ मुलगी नाही, तर राष्ट्राची कन्या आहे. प्रेरणेचा दीपस्तंभ आहे. अनेक मुलींसाठी ती एक प्रेरक अशेचा किरण आहे.

लेफ्टनंट प्रियंका खोत यांचा प्रवास म्हणजे – प्रत्येक स्त्रीच्या सामर्थ्याला उजाळा देणारा दीप. त्या फक्त आई, सून किंवा पत्नी नाहीत, तर संघर्षातून उभी राहिलेली रणरागिणी आहेत.

हातकणंगले तालुक्याच्या तारदाळ नगरीतून या नवदुर्गेने हे सिद्ध करून दाखवले की स्त्री धैर्याची शिखरे गाठू शकते, जर तिच्या मनात राष्ट्रसेवेचा दिवा पेटलेला असेल.

आज तारदाळच नाव संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशभर अभिमानाने घेतलं जातं, कारण तिथे जन्मली आहे – कर्तृत्वाच्या शिखरावर पोहोचलेली, राष्ट्रसेवेला समर्पित झालेली लेफ्टनंट प्रियंका खोत... शहीद निलेश खोत....त्यांच्या या शौर्यकथेला प्रत्येक नागरिकाचा सलाम. आणि त्यांच्या धैर्याला, त्यांच्या जिद्दीला, त्यांच्या राष्ट्रनिष्ठेला अखंड सॅल्यूट!

*****

## शालेय जीवनातील संस्कार, प्रामाणिक अभ्यास व प्रयत्नातील सातत्य यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्यातील व्यक्तिमत्त्व घडत असते. – जिल्हाधिकारी अमोल येडगे



जयसिंगपूर, (३० ऑगस्ट २०२५) : विद्यार्थी हा शालेय जीवनातच घडत असतो. शाळेमध्ये विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होत असतात. शालेय जीवनातील संस्कार, प्रामाणिक अभ्यास, प्रयत्नातील सातत्य यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्यातील व्यक्तिमत्त्व घडत असते, असे प्रतिपादन कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले. ते येथील श्री बाहुबली विद्यापीठ संचालित जनतारा कल्पवृक्ष विद्यामंदिर व आक्काताई नरसाप्पा नांद्रेकर ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रज्ञावंत विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्याप्रसंगी बोलत होते. जीवनामध्ये यश मिळवण्यासाठी कष्टाची तयारी ठेवावीच लागते. यशाला कोणताही शॉर्टकट नसतो. जिद्द, चिकाटी, ध्येयाप्रती समर्पण भावना या गोष्टी यशासाठी कारणीभूत ठरतात. याबरोबरच शालेय जीवनामध्येच चांगल्या सवयी अंगी बाणवा. चांगल्या संगती करा. शालेय जीवन आनंदीपणे जगा. चांगल्या गोष्टी आत्मसात करा. आपल्या आवडत्या क्षेत्रामध्ये आपलं करिअर घडवा. यातून एक सुजाण नागरिक बनून देशाच्या प्रगतीसाठी हातभार लावा. शिक्षणाबरोबरच इतर कला-क्रीडा क्षेत्रामध्ये यश मिळवा. मोबाईल ऐवजी वाचन संस्कृती जपा. देशातील थोर महापुरुषांच्या चरित्रांमधून बोध घेऊन भविष्यामध्ये सकारात्मक वाटचाल करा, असे आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले.



कार्यक्रमाची सुरुवात गुरुदेव समंतभद्र महाराज यांच्या प्रतिमापूजनाने झाली. प्रास्ताविक मुख्याध्यापक दीपक वाडकर यांनी केले. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, शिरोळचे तहसिलदार अनिलकुमार हेळकर यांचा प्रशालेकडून सत्कार करण्यात आला. यावेळी ५वी, ८वी स्कॉलरशिप व एनएमएमएस, १० वी, कला-क्रीडा व संगीत क्षेत्रामध्ये राज्य व राष्ट्रीय स्तरावर यशस्वी विद्यार्थ्यांचा जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष धनपाल देमापुरे, नांद्रेकर ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन राजेंद्र नांद्रेकर व सर्व कमिटी सदस्य, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. आभार पर्यवेक्षक विनोद मगदूम यांनी मानले तर सूत्रसंचालन श्रेया आवटी, अन्विक्षा पाटील, मैथिली चौगुले व श्रेयसी ककडे यांनी केले.

## बाहुबली येथील दशलक्षण महापर्व

बाहुबली गुरुकलात दशलक्षण महापर्व अत्यंत उत्साहाने व आनंदाने संपन्न झाला. यामध्ये सकाळच्या सत्रात श्री. गोमटेश बेडगे व पं. श्री. प्रदीप धोतरे शास्त्री यांच्या मार्गदर्शनानुसार गुरुकुलच्या मुलांनी अभिषेक, दशलक्षण पर्वपूजन व तत्त्वार्थसूत्राचे पठण केले. ,ाकेन श्रावकांनी याचा लाभ घेतला. सायंकाळच्या सत्रात आरती, सामायिक, विद्यार्थ्यांची भाषणे, अनेकांनी कथा सांगितल्या आणि प्रत्येक दिवशी एक अध्याय याप्रमाणे तत्त्वार्थसूत्र ग्रंथाचे सामान्य विवेचन नेमिनाथ शास्त्री यांनी केले. अनंत चतुर्दशीला १४ तीर्थंकरांची पूजा करण्यात आली. ऋषिमंत्राचे २४ तास जाप्य झाले. तसेच अनंत पौर्णिमेला पालखी मिरवणूक सानंद संपन्न झाली. गुरुकुलच्या मुलांच्या समोर क्षमावाणी हा पर्व देखील संपन्न करण्यात आला.

चालू वर्षी बाहुबली विद्यापीठातर्फे संचालित बाहुबली, जयसिंगपूर, तारदाळ, अकिवाट, निमशिरगाव, कवठेसार, टाकळीवाडी, अब्दुललाट इत्यादी प्रशालेतील अनेक अध्यापक-अध्यापिका या दशलक्षण महापर्वात आसपासच्या गावात व्याख्यानासाठी गेले होते. सुमारे ९६ अध्यापक-अध्यापिका यांनी यात सहभाग नोंदविला होता. तर सुमारे ७०हून अधिक गावात या लोकांनी उद्बोधन केले. खूप चांगल्या प्रकारे धर्माची प्रभावना करण्याचे कार्य या लोकांनी केले आहे. ते खरोखरच प्रशंसनीय आहे.

## श्री. देवकुमारजी रुखबदासजी चवरे



कारंजा येथील प्रतिष्ठित चवरे परिवारातील ज्येष्ठ-श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व असणारे ध. श्री. देवकुमारजी रुखबदासजी चवरे यांचे बुधवार दि. ३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजून ४० मिनिटांनी णमोकार मंत्रोच्चारामध्ये देहपरिवर्तन झाले. ९२ वर्षांच्या दीर्घायुष्यातील धर्मसाधनेचे हे फलित म्हणावे लागेल.

Born with silver spoon अर्थातच घरी सर्व सुबत्ता, परंतु राहणी मात्र अतिशय साधी ! स्वभाव शांत ! धर्मकार्याप्रति जागरूक ! कारंजा येथील सेनगण मंदिरचे ते सुमारे ३२ वर्षे अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकालामध्ये मंदिरमध्ये नूतन मानस्तंभ निर्माणानिमित्त तसेच नंदीश्वर काचमंदिर निर्माणानिमित्त भव्य पंचकल्याणक महोत्सव पार पडले. पूजा विधानांचे यशस्वी आयोजन झाले. टोडरमल स्मारक ट्रस्ट, जयपूर द्वारा संचालित उपक्रमांमध्ये त्यांना विशेष रुची होती. मंदिरला दानस्वरूपात प्राप्त होणाऱ्या प्रत्येक पैशाचा योग्य विनियोग करण्याकडे त्यांचे काटेकोर लक्ष होते.

लौकिक जीवनामध्ये ते एक कुशल उद्योजक आणि कृषितज्ज्ञ होते. घरचे परंपरागत व्यवसाय सांभाळतानाच पाय कायम जमिनीवर असणाऱ्या दादांची येथील मातीशी सुद्धा नाळ एवढी घट्ट जुळली होती की, शेकडो एकर शेती ते अगदी मन लावून आवडीने करत होते. आयुष्यातील शेवटच्या कालखंडापर्यंत शेती हा त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता.

कारंजा एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित जिनवरसा चवरे हायस्कूल या कारंजा शहरातील नावाजलेल्या शाळेचे ते अनेक वर्षे अध्यक्ष होते आणि त्यांच्या कार्यकाळामध्ये शाळेने सर्वांगीण प्रगती केली. तद्वतच अनेक ट्रस्टच्या अध्यक्षपदावरून त्यांनी भरीव सामाजिक कार्य केले.

अगदी काही महिन्यांपूर्वी पर्यंत सक्रियतेने ते श्रावकाची नित्य कर्तव्ये सजगतेने पार पाडत होते. या अंतर्गतच काही दिवसांपूर्वी मंदिरला देणगी दिली. तसेच कारंजातील सर्व जैन मंदिरे, गुरुकुल आणि भारतातील विविध तीर्थक्षेत्रांना त्यांनी भरीव दानराशी दिलेली आहे. प.पू. आचार्य विद्यासागरजी महाराज, पू. वीरसागरजी महाराज, पू. समतासागरजी महाराज, पू. आचार्य विरागसागरजी महाराज, पू. विशेषसागरजी महाराज आदि त्यागींचे आशीर्वाद त्यांना लाभले.

यशस्वी उद्योजक शिरीष चवरे, सन्मति मासिकाच्या विद्यमान संपादिका प्रज्ञा डोणगावकर तसेच भोपाळ निवासी सुनिता नांदगावकर यांचे ते वडील होते. या बहिण – भावंडांनी, स्नुषा सौ. रेखा तसेच सर्व कुटुंबीयांनी अंत्यसमयी त्यांची सुश्रुषा करून त्यांचे परिणाम धर्मभावनेत स्थित राहतील याची पुरेपूर काळजी तर घेतलीच, शिवाय मरणोत्तर नेत्रदान करून सामाजिक दायित्व पार पाडले. पर्यावरणाचे भान जागृत ठेऊन नदीपात्रात अस्थिविसर्जन न करता शेतातील मातीमध्ये ते करून तेथे वृक्षारोपण करण्यात आले.

## **सौ. अनिता राजगोंडा पाटील**, अंकली



अंकली, ता. मिरज येथील श्री. राजगोंडा रायगोंडा पाटील यांच्या धर्मपत्नी सौ. अनिता यांचा ३१ ऑगस्ट २०२५ रोजी अल्पशः आजाराने वयाच्या ५६व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात् त्यांचे पती, सुपुत्र अक्षय व स्नुषा सौ. स्नेहा हे दोघे इंजिनियर आहेत. तसेच सौ. पूजा चपने सांगली, सौ. आरती देसाई वारणानगर, सौ. शैलजा मुके इचलकरंजी या त्यांच्या सुकन्या आहेत. सोलापूर कॉलेजचे माजी प्राचार्य व ज्येष्ठ पत्रकार श्री. जी. के. पाटील यांच्या घराण्यातील त्या होत्या. त्यांच्या आत्म्यास सुख-शांती लाभो, हीच भावपूर्ण श्रद्धांजली....

## प्रथमाचार्य श्री शांतिसागर जी महाराज दीक्षा शताब्दी महोत्सव टोंक, राजस्थान के कार्यक्रम में प्रस्तुत, अरविन्दराव दोशी का भाषण- दि. ०४/१०/२०२५



श्री आदिनाथ भगवान की जय, चारित्र चक्रवर्ती प्रथमाचार्य शान्तिसागरजी महाराज की जय, वात्सल्यवारिधि आचार्य श्री वर्धमानसागर जी महाराज की जय एवं सम्पूर्ण संघ की जय....

१) टोंक शहरवासियों का मैं अभिनन्दन करता हूँ कि, उन्हें प्रथमाचार्य श्री शांतिसागरजी महाराज के दीक्षा का शताब्दी महोत्सव और आचार्य श्री वर्धमानसागरजी के संघ सहित चातुर्मास का लाभ मिला है।

२) आचार्यश्री ने इस अवसर पर हम जैसे प्रथमाचार्य श्री शांतिसागरजी की सेवा करने व परिवार की आगे की पीढ़ी के सदस्यों को आमंत्रित कर इस पुनीत अवसर पर सम्मिलित होने का पुण्यलाभ प्रदान किया है, इसकी जितनी सराहना की जाय, वह कम है। यह अवसर हम सभी के लिए जीवनपर्यंत स्मरणीय रहेगा!

३) सौभाग्य से मेरे पिताजी और माताजी प्रथमाचार्य श्री शांतिसागरजी महाराज की आजीवन सेवा करते रहे, उनके विहार में चौका लगाते थे, सेठ दाडमचंदजी और सेठ गेंदमलजी घासीलाल संघपति के साथ श्री सम्मेदशिखरजी की यात्रा करके आये। वे जैन बोधक पाक्षिक के संपादक एवं जैन संस्थाओं के ट्रस्टी बने। अक्टूबर १९३९ को उनका देहावसान हो गया और एक महीने बाद नवम्बर १९३९ में मेरा जन्म हुआ!

४) प्रथमाचार्य श्री शांतिसागरजी महाराज को मैंने बचपन से लेकर मेरे उम्र के १५-१/२ (साढ़े पंद्रह साल) की आयु तक उनकी सल्लेखना के २२ वें दिन तक मैंने दर्शन कर आशीर्वाद प्राप्त किया, उनके अलग-अलग गावों में हो रहे विहार, जिसमें मेरी माताजी चौका लगाया करती थी, जिसका मुझे भी निरंतर लाभ मिलता रहा!

५) मैं अपने स्कूल के शिक्षा के दिनों में बम्बई में निवासरत मेरे चाचा श्रीमान सेठ लालचंद हिराचंद के परिवार में पला-बड़ा हुआ हूँ, इन दिनों छुट्टियों में मैं अपनी माताजी के साथ रहने गाँव आता था। तब में अपनी माताजी के साथ पूज्य प्रथमाचार्यजी की सेवा में उनके विहार के दरम्यान चौका लगाने व आचार्य श्री के दर्शन, आशीर्वाद और पुण्यलाभ ले लिया करता था।

६) आज मुझे यह स्मरण हो रहा है, महाराष्ट्र के उन गाँव का जिसमें बारामती, नीरा, फलटण, सोलापुर, मोंडलिब, कवलाणा (नाशिक जिल्हा) कुंथलगिरि आदि, आचार्य श्री सल्लेखना के पहिले और संल्लेखना के २२वे दिन तक / और उनके अन्नत्याग के दिनों में गजपंथा, रावलगाँव और कवलाणा में रहें हैं, पूज्य आचार्य श्री ने जैन धर्म हिन्दू धर्म से अलग है, यह मुद्दा सुप्रीम कोर्ट में चल रहा था, उसका निर्णय होने तक करीब २० महीने अन्नत्याग किया था!

७) प्रथमाचार्य श्री शांतिसागरजी के १९५५ में सल्लेखना पर्व के बाद, मैं पूज्य आचार्य श्री समंतभद्र महाराजजी, एलाचार्य श्री विद्यानंदजी महाराज और आचार्य आर्यनंदी महाराजजी के मार्गदर्शन एवं आशीर्वाद से सभी कार्यों का निर्वहन करता आ रहा हूँ।

८) १९९३ के श्रवणबेलगोल महामस्तकाभिषेक से आचार्य श्री वर्धमानसागरजी महाराज के आशीर्वाद व उनके मार्गदर्शन पर विशाल महामस्तकाभिषेक का कार्य सँभालने का अवसर मिला, तब से तीन महामस्तकाभिषेक हुए हैं और अगला चौथा २०३० में भी उन्हीं के मार्गदर्शन से होवे, ऐसी मैं शुभकामना करता हूँ।

आज इस मंगल प्रसंग पर वात्सल्यवारिधि आचार्य श्री वर्धमानसागरजी हमारे चाचाजी के ब्र. जीवराज जैन ग्रंथमाला से प्रकाशित हो रहे धवला ग्रंथ का प्रकाशन करके अपने को धन्य अनुभव करने का सौभग्य प्राप्त हुआ है, आज से करीब १० वर्ष पहले २०१५ में किशनगढ़ में अक्षय तृतीया के पावन दिन पर धवलाखण्ड ७ और ८ का प्रकाशन किया था और अगले २ महीने में धवलाग्रंथ के खण्ड १४-१५ तथा प्रथमाचार्य श्री शांतिसागरजी के चारित्र का प्रकाशन आचार्य श्री वर्धमानसागर जी के करकमलों से करने का प्रयोजन है।

इन्हीं शब्दों से मैं अपनी वाणी को विराम देता हूँ! पूज्य ससंघ के पावन श्री चरणों में त्रिवार नमोऽस्तु नमोऽस्तु नमोऽस्तु! धन्यवाद!

अरविन्द आर्. दोशी

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 16-10-2025

प. पू. गुरुदेवश्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित
श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम, कारंजा-लाड येथील
गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिझम आणि
शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालय, छ. संभाजीनगर
यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित
दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदवर आधारित
जैन दृश्य वारसा परिषद विशेषांक
या सन्मतीच्या दीपावली विशेषांकास
हार्दिक शुभेच्छा..!!

Kshemankar Bhore
Software Development, IT Architecture and Technology Consultancy
IT Infrastructure Management, Electronic Security Solutions

KSHEM SOFTWARE
across all verticals...

16A, Swastik Niwas, Opp Pramod Nagar, Near Nirmala Convent, Off Gangapur Road, Nashik 422013
+91 8007027722 kshem@kshemsoftware.com
www.kshemsoftware.com

Merchant Name : BAHUBALI BRAHMACHARAY ASH
UPI ID : schoolbahubali@sbi
BHIM UPI

भगवान महावीर निर्वाणकल्याणक महोत्सव : दीपावली महापर्वानिमित्त किंवा विविध पारिवारिक समारंभानिमित्त बाहुबली गुरुकुलातील विद्यार्थ्यांना सद्दानराशी, पुरस्कार राशी, धर्मिक गतिविधीस प्रोत्साहन देण्यासाठी अथवा बाहुबली संस्थेस देणगी देण्यासाठी किंवा सन्मती मासिकाची वाढीव वर्गणी पाठवून देण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा आणि ट्रांझक्शन आयडी पाठवून द्यावे. जेणेकरून पावती करता येईल. आपल्या देणगीस आयकर सवलत मिळते. आपल्या सर्वांचे सहकार्य मिळावे, हीच सद्भावना...!!

प्रेषक, www.sanmatimasik.com
सन्मति प्रकाशन
पो. बाहुबली,
जि. कोल्हापूर–४१६ ११०
फोन : ९० ४९ ४७ ३४ ३४
E-mail : sanmatimasik@gmail.com

प्रति,

प्रकाशक : श्री. गोमटेश बेडगे, मालक : श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली
मुद्रण स्थळ : शिव इम्प्रेशन्स्, कोल्हापूर. प्रकाशन स्थळ : बाहुबली
सन्मति : दीपावली विशेषांक- जैन दृश्य परिषद :
वर्ष- ७६वे, पुष्प- तिसरे-चौथे : ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२५ : ८० (७२+४+४=८०)